९८६२ .
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध .
सं. क्र. २८७६



# स… हित्यांतील विनो…

REFBK-0012305

## डॉ. के. ना. वाटवे

# संस्कृत साहित्यांतील विनोद

12304

लेखक
डॉ. के. ना. वाटवे

REFBK-0012305
REFBK-0012305

केदार प्रकाशन : पुणें २.

किंमत चार रुपये

प्रकाशक :
सौ. सुनीति दुबळे
केदार प्रकाशन
थोरले बाजीराव रस्ता पुणें २

●

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

●

प्रथमावृत्ति मार्च १९६२

●

मुद्रक :
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव, पुणें

ज्यांच्यामुळें माझ्यामध्यें संस्कृताची
गोडी उत्पन्न झाली त्या
माझ्या परमपूज्य

**कै. ना. ग. लेले**

**या गुरुवर्यांच्या परम पवित्र
स्मृतीस अर्पण**

—के. ना. वाटवे

# प्रस्तावना

चोवीस वर्षांपूर्वीची गोष्ट. सप्टेंबर १९३७ सालीं साहित्यसम्राट् न. चिं. उर्फ तात्यासाहेब केळकर यांनीं ' हास्यविनोद-मीमांसा ' हा आपला साडेपांचशें पानांचा ग्रंथ प्रसिद्ध केला. त्या ग्रंथासाठीं त्यांना संस्कृत साहित्यांतील विनोदाचें सर्वांगीण विवेचन करणारें एक प्रकरण पाहिजे होतें. तें प्रकरण लिहिण्यास त्यांनीं मला सांगितलें. लगेच तें लिहून मीं त्यांना वाचून दाखविलें. तें त्यांना फार आवडलें. व त्यांनीं मला संस्कृत वाङ्मयांतील एखाद्या विषयावर पीएच्. डी. साठीं प्रबंध लिहावयाची सूचना केली. या सूचनेप्रमाणे मी माझा 'रसविमर्श' हा प्रबंध १९४२ सालीं लिहिला. त्याला मार्गदर्शकहि तात्यासाहेबच होते. त्यावेळची आठवण झाली कीं आज मनाला मोठा आनंद वाटतो. मी लिहिलेला संस्कृतांतील विनोदाचा संक्षिप्त आढावा तात्यासाहेबांनीं आपल्या ग्रंथाचें एक परिशिष्ट म्हणून प्रसिद्ध केला. या माझ्या परिशिष्टाबद्दल माझे आभार मानतांना तात्यासाहेब म्हणतात,—

" आतां शेवटीं आभार प्रदर्शनाचें काम उरलें. या बाबतींत मला प्रा. के. ना. वाटवे एम्. ए. सर परशुरामभाऊ कॉलेजांतील संस्कृत व मराठी या विषयांचे शिक्षक, यांचे आभार मानावयाचे आहेत. प्रा. वाटवे यांचें साहाय्य संस्कृत वाङ्मयांतील हास्यविनोदाचें समालोचन करण्यांत झालें. या ग्रंथाच्या प्रास्ताविक अध्यायांत उल्लेखिल्याप्रमाणें मीं पूर्वी ' सुभाषित व विनोद ' हें पुस्तक लिहीण्याच्या वेळींच, संस्कृत वाङ्मयांतील हास्य-विनोद दर्शविणाऱ्या अनेक स्थळांचीं अवतरणें काढून ठेविलीं होतीं. तीं हा ग्रंथ छापावयास घेण्याच्या वेळीं प्रा. वाटवे यांजकडे तपासावयास दिलीं. परंतु वाटवे यांनीं या विशिष्ट विषयाचा स्वतंत्र अभ्यास केलेला असल्यामुळें त्यांना त्यांत आणखीहि पुष्कळ भर घालतां येईल असें वाटलें. म्हणून 'हा अध्याय तुम्हीच पुन्हां वेगळा स्वतंत्र लिहून द्या ' अशी विनंती मी त्यांना केली व त्याप्रमाणें तो समर्पक व विद्वत्तापूर्ण असा त्यांनीं लिहून दिला.

म्हणून त्या अध्यायाचें श्रेय मी त्यांना देईन. मराठींतील हास्य—विनोद हा वाचकांच्या दृष्टीला या नाहीं त्या रीतीनें पडण्याचा संभव असतो. परंतु अलीकडे संस्कृत भाषेचा अभ्यास कमी. त्यांतूनहि जुनीं संस्कृत नाटकें व प्रहसनें हीं केवळ या विषयाच्या गोडीखातर हुडकून काढून वाचणारा वाचक

कोण भेटणार ? यामुळें संस्कृत वाङ्मयांतील हास्यविनोद या विषयाला सहजच अन्याय होणार होता. पण प्रा. वाटवे यांनीं त्याच्या समालोचनाचें काम इतक्या परिश्रमानें व पूर्णतेनें केलें आहे कीं, आतां त्यावर आणखी लिहिण्याचें फारसें उरलें असेल असें वाटत नाहीं. ''

त्यावेळीं मी घेतलेला संस्कृत – हास्य विनोदाचा आढावा अगदीं संपूर्ण नसला तरी प्रातिनिधिक होता. हें त्या आढाव्याचा पुढील स्वरूपावरून लक्षांत येईल. मी संस्कृतवाङ्मयांतील पुढील ठिकाणांहून विनोद वेंचून घेतला आहे:—

वेद – ब्राह्मणग्रंथ – उपनिषदें – संस्कृतन्याय – संस्कृतसाहित्य शास्त्रांतील हास्यरस – संस्कृत नाटकांतील विदूषक – संस्कृत मृच्छकटिक, शाकुंतल इत्यादि नाटकें – संस्कृत प्रहसनें व भाण, संस्कृत लघुकाव्यें, – संस्कृत महाकाव्यें – अमरुशतक – विश्वगुणादर्शचंपू – माहीषशतक – अन्योक्ति समस्या – प्रहेलिका – विनोदी सुभाषितें – कलि विडंबन – कलाविलास विडंबन काव्यें – कलिवृत्तादर्शपुराण – चहागीता – काकदूत –कथासरित्सागर – पंचतंत्र– हितोपदेश – बाणाची कादंबरी – वासवदत्ता – दशकुमारचरित – इत्यादि इत्यादि.

'हास्यविनोदमीमांसा' या ग्रंथाची द्वितीयावृत्ति नुकतीच प्रसिद्ध झाली. ती प्रसिद्ध करतांना श्री. तात्यासाहेबांचे चिरंजीव श्री. का. न. ऊर्फ बापूसाहेब केळकर यांनीं माझ्या विनोदाच्या परिशिष्टाचा समावेश तींत केला नाहीं आणि मलाच हें प्रकरण स्वतंत्र प्रसिद्ध करण्यास अनुज्ञा दिली. त्याप्रमाणें मी तें आज प्रसिद्ध करीत आहें. पूर्वीच्या माझ्या या आढाव्याला मी एक नवें परिशिष्ट जोडिलें आहे. त्यांत मी संस्कृत साहित्यशास्त्रांतील हास्यविनोदाची उपपत्ति शक्य तेवढी सुलभ करून मांडली आहे. याप्रमाणें संस्कृत साहित्यांतील हास्यविनोदाचें हें सोपपत्तिक विवेचन मी मराठी वाचकांसमोर मांडीत आहें. तें त्यांनीं गोड करून घ्यावें अशी विनंति त्यांस करून मी हें प्रास्ताविक निवेदन पुरें करतों.

योगकुंज, चिमणबाग,<br>
टिळकरोड, पुणें २<br>
१२–२–६२

के. ना. वाटवे

# डॉ. के. ना. वाटवे यांचीं इतर पुस्तकें

१. रसविमर्ष
२. संस्कृत काव्याचे पञ्चप्राण*
३. पंचतंत्रकथा भाग १ ते ३
४. हितोपदेश कथा
५. रघुवंशांतील राजे
६. कुमारसंभव कथा
७. किरातार्जुनीय कथा
८. शिशुपालवध कथा
९. नलदमयंती कथा
१०. कादंबरी कथा
११. दशावतार कथा
१२. भागवतांतील कथा भाग १ ते ६
१३. मेघदूत कथा
१४. संस्कृत सुबोधिनी भाग १ ते ३
१५. संस्कृत मुक्ताहार भाग १ ते ३

* या ग्रंथास दोन पारितोषिकें मिळालीं असून याचीं दिल्लीच्या नॅशनल बुक ट्रस्ट, इंडियातर्फे हिंदी, बंगाली व तामीळ या भाषांत भाषांतरें झालीं आहेत.

☆ ☆ ☆

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५६३६ वि: निबंध
क्रमांक ... नों: दि: २८-५-६३
ना. क्र. 12306

# संस्कृत साहित्यांतील विनोद

वेद हें आमचें जुन्यांतलें जुनें आणि अगदीं पहिलें संस्कृत साहित्य. यांत आपल्या आर्यपूर्वजांनीं आपल्या भावना मोकळेपणानें व्यक्त केल्या आहेत. ते देवतांना भक्तीनें आळवीत आहेत. इंद्रादि देवतांचें शौर्य वर्णन करीत आहेत. तसेंच हर्ष, विषाद, वात्सल्य इत्यादि भावनाहि प्रगट करीत आहेत. या सर्व भावनांबरोबरच त्यांनीं हास्य-विनोदाची भावनाहि मधून मधून व्यक्त केली आहे. म्हणून संस्कृत साहित्यांतील विनोदाची पहाणी करतांना तिचा आरंभ वेदापासूनच करावा हें योग्य.

वेदकालीन ऋषींच्या उत्तम विनोदबुद्धीचें निदर्शक असें एक सूक्त नमुन्यासाठीं दाखवतों. यास ‘मण्डूकसूक्त’ म्हणतात. तें ऋक्संहितेच्या सातव्या मण्डलांतील १०३ वें सूक्त आहे. वसिष्ठ ऋषींनीं पाऊस पडावा म्हणून पर्जन्य-स्तुति केली. त्याला मंडुकांनीं अनुमोदन दिलें, म्हणून त्यांनीं त्या बेडकांचें स्तवन सदर सूक्तांत केलें आहे. वरून दिसण्यांत जरी ही बेडकांची स्तुति असली तरी यांत उपमादिकांनीं यज्ञकर्मांत असलेल्या ब्राह्मणांचें मण्डुकांशीं साम्य मोठ्या उच्च विनोदवृत्तीनें शेवटपर्यंत सारखें दाखविलें आहे.

संवत्सर-सत्रात्मक कर्म करणारे ब्राह्मण वर्षभर तप करीत एका बाजूला पडून राहतात तसेच मण्डूकहि बिळांत कोठें तरी बसून राहतात व ब्राह्मणां-प्रमाणेंच एकदम पर्जन्यप्रेरित शब्द करूं लागतात ( **वाचं पर्जन्यजिन्वितां प्र मण्डूका अवादिषु :।** ). एका मोठ्या बेडकानें प्रथम मोठ्या आवाजांत

गळा फुगवून ओरडावयाचें व लागलीच दुसऱ्यानें त्याचें अनुकरण करावयाचें याची, गुरूनें वेदमंत्र सांगावयाचा व शिष्यानें तो उच्चारावयाचा याच्याशीं तुलना केलेली आहे. ( **यदेषामन्यो अन्यस्य वाचं शाक्तस्येव वदति शिक्षमाणः ।** ) या बेडकांत निरनिराळ्या रंगांचे बेडूक असून त्यांतील कांहींचा आवाज बैलाच्या आवाजासारखा तर कांहींचा अजाच्या आवाजासारखा असतो. अतिरात्र नांवाच्या सोमयागांत जसे ब्राह्मण तसे पूर्ण सरोवरांत बेडूक असतात. असें सांगून आठव्या ऋचेंत भरपावसांत ओरडत राहणाऱ्या बेडकाला मंत्रपठनानें घामाघूम झालेल्या ( स्विद्यमान ) अध्वर्यूंची मोठी मार्मिक उपमा दिली आहे.

विद्यामण्डित व आदरणीय याज्ञिक आणि क्षुद्र बेडूक यांच्यामधील हें चमत्कृतिजनक व पूर्ण साम्य दाखविण्यांत या सूक्ताच्या ऋषीचा काय हेतु असावा हें समजणें कठीण आहे. त्याच्या केवळ निरागस विनोदबुद्धीचा हा विलास तरी मानावा किंवा कांहीं युरोपियन पंडित सुचवितात त्याप्रमाणें ब्राह्मणांवरील ही उपरोधिक टीका तरी समजावी ! ! ग्रीसमधील आद्य उपरोधकांनींहि ईलियडमधील वीरांना याच आमच्या ऋग्वेदकालीन मण्डूकराजांची उपमा दिली आहे, ही गोष्ट वाङ्मयक्षेत्रांतील एक गमतीचा योगायोग म्हणून ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

अथर्वसंहितेंतील खिल सूक्तामध्यें असेंच एक विनोदी सूक्त ( अ. ९. १३४ ) आहे. पूर्वीं अश्वमेध यज्ञ चालू असतां दर दिवशीं निरनिराळे करमणुकीचे कार्यक्रम चालत असत. कधीं गायन तर कधीं वादन, कधीं जादूचे प्रयोग तर कधीं संवाद किंवा नाट्यप्रयोग अशी मौज चाले. अशांपैकीं एका नाट्य-संवादांत पुढील विनोदी कल्पना मूलभूत असून तिचाच विस्तार केला आहे. या संवादांत दोन पात्रें : एक कुमारी व दुसरा एक ब्रह्मचारी. ब्रह्मचाऱ्याशीं प्रथमच संवाद करूं पाहणारी ही कुमारी लज्जान्वित होत्साती परपुरुषाशीं भाषणादि प्रकार गर्हणीय होत असें हावभावांनीं दर्शविते. पण ब्रह्मचारीबुवा थोडेसे चळूं लागून तिची समजूत घालतात कीं, "हे कुमारी, तुला वाटतें तसें हें कांहीं ( वाईट किंवा चमत्कारिक ) नाहीं." "**न वै कुमारि तत् तथा यथा कुमारि मन्यसे**" हा चरण या सूक्ताचें पालुपद आहे !

सदर कुमारि-ब्रह्मचारीसंवाद विनोदी अभिनयाला अत्यंत अनुकूल असून त्या काळच्या कडक शिस्तीला व याज्ञिकांच्या रूक्ष राहणीला एक थारेपालट म्हणून गमतीनें करून दाखवला जात असावा !

तशीच कुन्तापसूक्तांत एक दानस्तुति आहे. त्या दानस्तुतींत पुढील मिकिलपणा आढळतो. एका ब्राह्मण कवीला त्याच्या डोक्यावरून जाईना आणि मनालाहि तोलेना असें भलें मोठें दान एका मातब्बर दात्याकडून मिळालें. साहजिकच या कवीची जीभ आतां चुरुचुरु स्तुति बोलूं लागली. त्याला उद्देशून सदर सूक्तांत म्हटलें आहे, " कविराज ! आतां जीभ चालूं द्या. करा स्तुतिपाठ. जशीं पिकल्या वृक्षावरील पांखरें गोड फळांनीं भरल्या-तोंडीं किलबिलतात तसेंच गोड बोलाना. पण जर दानाचा रतीब कमी पडला तर मात्र ( तुमची ) जीभ कात्रींत सांपडलेल्या वस्तऱ्याप्रमाणें अडखळते !! "

**" वच्यस्व रेभ वच्यस्व वृक्षे न पक्के शकुन : ।**
**नष्टे जिव्हा चर्चरीति क्षुरो न भुरिजोरिव ॥ "**

वेदवाङ्मयांत ' ब्राह्मण ' नामक ग्रंथांचाहि समावेश होतो. ब्राह्मणांतून वेदमंत्रांचा विनियोग व महत्त्वहि सांगितलेलें असतें. तें सांगतांना देवा-सुरांच्या व इतरांच्याहि मजेदार कथा मधूनमधून उपयोगांत आणिल्या आहेत. कांहीं वैदिक विधींचेंहि वर्णन आहे. यामधून मजेदार विनोद कोठें-कोठें आढळतो. उदाहरणार्थ, सोम विकणाऱ्या व्यापाऱ्यामध्यें व तो घेणाऱ्या अध्वर्यूमध्यें सोमाच्या किंमतीबद्दल चाललेली व्यावहारिक घासाघीस मोठी मौजेची आहे. तिचें पुढील वर्णन शतपथ ३. ३. ३. मध्यें आहे.

अध्वर्यु–कायहो ! सोम विकायचा काय ?

व्यापारी–हो तर.

अध्वर्यु–हें पहा. तो आम्ही गाईच्या $\frac{१}{१६}$ भागाला मागितला.

पण व्यापाऱ्यास ही किंमत अर्थातच अमान्य होई व अध्वर्यूकडून ती क्रमानें वाढविली जाई. ती वाढ अगदीं गणितानें $\frac{१}{८}$ नंतर $\frac{१}{४}$, $\frac{१}{२}$, $\frac{१}{१}$ शेवटीं व्हावयाची. मग व्यापाऱ्यानें म्हणावयाचें, " अहो, असें कसें म्हणतां–सोम-राजाची किंमत याहूनहि जास्त यावयास पाहिजे. " त्यावर अध्वर्यूनें

म्हणावें, " हें पहा, गाय काय कमी समजतां होय ? अहो, तिच्यापासून ताजें दूध, दुधापासून खरपूस तापलेलें दूध, त्यापासून साय, तिच्यापासून दही, त्याच्यापासून ताक, त्यांतून लोणी, त्यापासून तूप असे एकएक नामी पदार्थ मिळतात ! ! " अखेरीस तो सौदा गाईवर ठरतो. मग त्या गाईबद्दल एक सुवर्ण नाणेंच द्यावयाचें ठरतें. पण तें व्यापाऱ्याचे हातावर एकानें ठेवावयाचें व दुसऱ्यानें त्याच्या हातावरून उडवून लावून परत घ्यावयाचें ! व अखेरीस त्या व्यापाऱ्यास काठीनें झोडपून हाकलून लावावयाचा ! !

गायत्रीनें पक्षिरूप धारण करून गंधर्वांजवळील सोम स्वर्गांतून हिरावून आणला अशी कथा आहे. अर्थात् सोम न देणाऱ्या गंधर्वांबद्दलचा मागचा द्वेष सोमाच्या व्यापाऱ्यावर लादून हें असें वड्याचें तेल वांग्यावर काढण्याचा प्रघात पडला असावा !

ताण्ड्यमहाब्राह्मणांत ' शैशव ' नांवाच्या मंत्राची महती पुढील कथेनें वर्णिली आहे. आंगिरसगोत्रांत ' शिशु ' म्हणून एक ऋषि होता. तो वयानें फार लहान असला तरी महाविद्वान् व मंत्रद्रष्टा होता. त्यानें एकदां आपल्यापेक्षां वडील असलेल्या आपल्याच वृद्धमंडळीस ( त्यांच्या चुकीमुळें ) ' लेकांनो ' असें म्हटलें. वृद्धांना संताप आला व " हा आमचा अपमान होत आहे " असें ते त्यास बजावूं लागले. त्यानें त्यांस तेंच विशेषण हट्टानें लाविलें व म्हणाला, " मी मन्त्रद्रष्टा असल्यानें ( ज्ञानाच्या नात्यानें ) मी तुमचा बापच आहे. " वृद्ध लोक काय हें ऐकतात ? ते हा तंटा घेऊन देवांकडे गेले. पण देवांनीं शिशूच्या बाजूनें निर्णय दिला ! यावरूनच मनुस्मृतीमध्यें ( अ. २. १५०–१५६ ) ही कथा आली आहे व " डोक्याचे नुसते केंस पिकले म्हणजे वृद्धपणा येत नाहीं " हा निष्कर्ष तेथें निघाला आहे.

तसेंच ऐतरेय ब्राह्मणांतील ( ७-१३-१६ ) हरिश्चंद्र राजानें आपल्या पुत्रास बळी देण्याबद्दल वरुणास दाखविलेल्या हुलकावण्या मोठ्या विनोदी वाटतात. " प्रथम मुलगा दहा दिवसांचा होऊं द्या, नंतर त्याला दांत येऊं द्यात; नंतर ते पडूं द्यात, तोंपर्यंत थांब, " असे वायदे व चाळवण्या वरुणाला तो देऊं लागला. तसेंच हा रोहित मरण चुकविण्यास रानांत गेल्यावर त्यास इंद्रहि ब्राह्मणरूपानें सतत फिरत राहण्याचा सल्ला देतो व जें फिरत राहण्याचें मोठें शास्त्र सांगतो तेंहि विनोदी आहे. कारण यांत वरुणाला रोहित

लौकर मिळूं नये असा इंद्राचा हेतु दिसतो.

गंभीर वृत्तीच्या तत्त्वज्ञान्यांना सुद्धां बाल्यसुलभ विनोदाची लहर एखादे वेळीं कशी येई, याचें एक गमतीचें उदाहरण बृहदारण्यकोपनिषदांत आहे ( अध्याय ३-१-२ ). विदेहदेशच्या ब्रह्मनिष्ठ जनकराजानें एकदां एक यज्ञ केला. त्यांत मोठाल्या दक्षिणा ब्राह्मणांस वांटल्या. त्या वेळीं कुरुपांचाल देशांतील तमाम ब्राह्मण जमले होते; पण यांत आपल्या ब्रह्मविषयक प्रश्नांचीं उत्तरें देणारे किती व नुसतेच दक्षिणा उचलणारे किती हें अजमावण्यास त्यानें पुढील युक्ति केली. त्यानें प्रत्येक गाईच्या शिंगाला सुवर्णाचीं दहादहा नाणीं याप्रमाणें एक हजार गाई शृंगारून गोशाळेंत सज्ज ठेविल्या व ब्राह्मणांस तो म्हणाला, "हे विद्वान् ब्राह्मणहो ! तुमच्यांतील जो ब्राह्मणश्रेष्ठ असेल त्यानें या गाई घेऊन जाव्या." ती अट ऐकून एकाहि ब्राह्मणाचें पाऊल पुढें पडेना. तेव्हां भगवान् याज्ञवल्क्यानें आपल्या शिष्यास बिनधोक सांगितलें, "बाळा समश्रवा, आपल्या घरीं या गाई घेऊन चल बघूं." शिष्यहि गाई हांकून नेऊं लागला. तेव्हां त्याच्या या धिटाईनें विस्मित होऊन इतर ब्राह्मण व जनकाचा होता अश्वल यांनी त्यास हटकून म्हटलें, "रे याज्ञवल्क्या, तूं काय आपल्यास ब्रह्मनिष्ठ समजून गाई नेत आहेस ?" यावर खऱ्या विनोदी वृत्तीनें हे तत्त्वज्ञ उद्गारतात, "छे, छे, आम्ही कसले ब्रह्मनिष्ठ नि काय, जो कोणी ब्रह्मनिष्ठ असेल त्याला आपण वंदन करतों. आम्हांला आपली गाई घेण्याचीच इच्छा ! ! '**स होवाच नमो वयं ब्रह्मिष्ठाय कुर्मो गोकामा एव वयँ स्म इति**।" या याज्ञवल्क्याच्या उक्तींत जितका आत्मविश्वास सांठविलेला आहे, तितकीच तीमध्यें सामान्य वृत्तीच्या लोभी ब्राह्मणाच्या मनोवृत्तीची व असलें विलोभन दाखविणाऱ्या जनकाचीहि नाजुक थट्टा आहे. पुढें याज्ञवल्क्यानें जनकाच्या प्रश्नांचीं उत्तरें देऊन त्याचें पूर्ण समाधान केलें हें सांगावयास नकोच.

तसेंच आरुणीचा मुलगा श्वेतकेतु बारा वर्षें गुरुगृहीं राहून मोठा विद्वान् होऊन आला. त्याला वाटलें कीं, 'ज्ञाता काय तो एकटा मी ( महामनाः ) व कोणींहि कांहीं विचारलें तर माझीं उत्तरें त्याला तयार ( अनूचानमानी )'. त्यामुळें तो गर्विष्ठपणा करूं लागला. त्याची विद्वत्ता—कोरडी—ब्रह्मज्ञानाविरहित होती व त्यामुळें त्याच्या शिक्षणाचा फोलपणा त्या बापास ( हल्लींच्या

बापाप्रमाणेंच ) चांगला ठाऊक होता. त्यानें मोठ्या खुबीनें व प्रेमळ विनोदानें ( त्याच्या त्या नसत्या आढ्यतेची गंमत वाटून ) त्यास विचारलें, " बाळा ! तुला तुझ्या विद्वत्तेबद्दल मोठा अभिमान वाटतो आहे तें ठीकच ! पण कायरे ! ज्या ज्ञानानें अश्रुत गोष्टी श्रुत होतात तें ब्रह्मज्ञान तुला झालें काय ? " ( छांदोग्य, ६-१ )

न्याय, वेदान्त, मीमांसा, व्याकरण अशांसारख्या रूक्ष विषयांतहि चर्चांची आणि वादविवादांची झोड उठून राहिली असतां त्या गंभीर वातावरणांतहि विनोदाच्या कांहीं तेजस्वी ठिणग्या मधूनमधून उडत असत, हें पाहून आश्चर्य वाटतें. पतंजलीचें महाभाष्य, कुवलयानंद, ब्रह्मसूत्र शांकरभाष्यावरील टीका, आपस्तंब-गृह्यसूत्र अशांसारख्या गंभीर ग्रंथांतील चर्चेंमध्यें उदाहरणें, उपमा, दाखले किंवा लौकिक म्हणी या रूपानें उत्कृष्ट विनोद ठिकठिकाणीं प्रगट झाला आहे; व त्या रूक्ष चर्चा करणारे ते ते पंडितहि तुमच्याआमच्याप्रमाणें विनोदांत रमणारे मानवच होते हें पाहून एक प्रकारचें समाधान वाटतें. मेघराजीवर लखलखणाऱ्या एखाद्या विद्युल्लेखेप्रमाणें सदर विनोद शास्त्रचर्चेच्या गंभीर पार्श्वभूमीवर अधिकच खुलून दिसतो. या प्रकारास संस्कृतांत न्याय ( म्हणी किंवा सर्वमान्य तात्त्विक वचनें ) म्हणतात व यांचा संग्रह भुवनेशाची लौकिकन्यायसाहस्री, जेकबनें संपादिलेली लौकिकन्यायांजली इत्यादि पुस्तकांत दिलेल्या न्यायांत सांपडतो.

सदर न्यायांपैकीं कांहीं विनोदी न्याय पुढें दिले आहेत.

**अहिभुक्कैवर्तन्याय** :—अफूबाज व नावाडी यांचा न्याय.

कोणीएक अफूबाज एकदां एका नावेंत चढून पैलतीरीं चालला. त्या नावेंत त्याच्यासारखेच पुष्कळ उतारू होते. सदर राजेश्रीस अफूची जोराची गुंगी येत होती. तें ध्यानांत येऊन त्यांनीं विचार केला कीं, न जाणों अफूच्या धुंदींत आपण पडलों असतां आपण इतर उतारूंत गळपटून जाऊं. आपण कोण व ते कोण हें कदाचित् ओळखतां यावयाचें नाहीं. म्हणून सदर राजेश्रींनीं तेथें पडलेला दोरीचा तुकडा खूण म्हणून आपल्या आंगठ्यास बांधला व स्वतः अफूच्या गुंगींत स्वस्थ पहुडले. तेथल्या नावाड्यानें हें सर्व चरित्र पाहिलें, व त्याची गंमत करण्यासाठीं म्हणून त्याच्या आंग-

ऱ्याची दोरी सोडून आपल्या आंगठ्यास त्यानें बांधिली. नांव पैलतीरास पोंचल्यावर उतारूंच्या गडबडीनें शुद्धीवर येऊन अफुबाज उठून पाहातात तों खुणेची दोरी आपल्या आंगठ्यास नसून नावाड्याच्या आंगठ्यास आहे असें त्यांस आढळून आलें. तेव्हां "मीच्च नावाडी आहें" या बुद्धीनें ते त्याच्याशीं भांडूं लागले कीं, "मी मी नसून तूंच मी आहेस." या गमतीच्या गैरसमजाचा उपयोग परमात्मा व जीवात्मा यांचा अध्यारोप होऊन त्यानें उत्पन्न होणाऱ्या अदलाबदलीच्या चर्चेच्या वेळीं वेदान्तांत करीत असतात.

**घट्टकुटीप्रभातन्याय**–टोलनाकेवाल्याच्या झोंपडीजवळील पहाट.

एका गाडीवाल्यास रात्रीं नाकेवाल्याच्या हातावर तुरी देऊन दस्तुरी चुकवावयाची होती. म्हणून तो मोठ्या चतुराईनें आपल्या समजुतीप्रमाणें लांबच्या मार्गानें गाडी हाकूं लागला. सबंध रात्रभर गाडी दामटून पहाटेच्या सुमारास आपण नाकेवाल्याच्या कचाट्यांतून कसे सुटलों या विचारानें प्रफुल्ल होऊन तो जों सडकेस लागतो तों त्यास तेंच नाकें समोर दिसलें. हा प्रकार गोल्डस्मिथनें वर्णन केलेल्या She Stoops to Conquer मधील टॉनि लंकिनप्रमाणेंच झाला म्हणावयाचा. सदर न्यायाचा उपयोग सर्वदर्शनसंग्रहांतील पाणिनीय दर्शनामध्यें केलेला आहे. तसेंच श्रीभाष्यांतहि याचा उल्लेख आहे. व याचें तात्पर्य, जें मुद्दाम टाळावयास जावें तेंच कधींकधीं पुढें दत्त म्हणून उभें राहतें, असें आहे.

**कफोणिगुडन्याय**—कोपराला चिकटलेल्या गुळाचा न्याय.

एकाद्याच्या कोपरास गूळ चिकटलेला असूनहि भुकेच्या वेळीं त्यास तो सहज खातां येत नाहीं. यांतील विनोदहि थोडा उत्तान असला तरी मार्मिक आहे. इंग्रजींतील Tantalization चें हें एक देशी उदाहरण आहे. या न्यायाचा उपयोग उदयनाचार्याच्या आत्मतत्त्वविवेकामध्यें केलेला आढळतो. तसेंच **काकदन्तपरीक्षान्याय**–कावळ्याचे दांत मोजण्यासारखें अत्यंत निष्फळ काम करीत राहणें. **स्वेदजनिमित्तेन शाटकत्यागन्याय**–म्हणजे एक छोटीशी ऊ वस्त्रावर दिसल्याबरोबर तें सबंध वस्त्रच फेंकून देणें. **श्वश्रुनिर्गच्छोक्तिन्याय**–ताक नाहीं म्हणावयाचें असल्यास "नाहीं म्हणणारी तूं कोण? मी नाहीं म्हणेन हवी तर," असें सुनेस म्हणणारी सासू. **तस्करकंदुन्याय** म्हणजे चोरानें चोरी करण्याची चांगली संधि मिळावी म्हणून आचाऱ्याच्या

वेषानें एखाद्याच्या घरीं राहावें व सैपाक चांगला न साधल्यामुळें ओघा-ओघानें त्याची लबाडी बाहेर फुटावी ! असे पुष्कळ गमतीचे न्याय सांपडतात.

आणखी एकच **वधूमाषमापन** या नांवाचा न्याय देऊन हें न्यायप्रकरण आटोपतें घेतों. कोणीएक कंजूष म्हातारा दररोज आपल्या कुरूप पत्नीकडून दारीं आलेल्या भिकाऱ्यास मूठमूठ उडीद घालवी. पुढें त्याच्या मोठ्या मुलाचें लग्न होऊन नवीन सूनबाई घरीं आल्या. या कंजूष म्हाताऱ्यास वाटलें सूनबाई लहान असल्यामुळें त्यांच्या मुठीनें भिकाऱ्यास उडीद घातल्यास उडीद कमी लागून आपली बचत होईल. पण म्हाताऱ्याच्या कमनशीबानें सूनबाई अप्रतिम लावण्यसंपन्न होत्या. त्यामुळें केवळ त्यांना पाहण्याच्या लोभानें दरोबस्त भिकारी व भिकाऱ्याच्या वेषानें इतर संपन्न लोकांच्या झुंडीच्या झुंडी याच्या दारांत लोटूं लागल्या; व म्हाताऱ्याची बचत एकीकडे राहून शतपट उडीद खर्च होऊं लागले. हाहि न्याय आत्मतत्त्वविवेकामध्यें उपयोगिला आहे.

ब्रह्मसूत्रशांकरभाष्यांत ( ३–३–५४ ) पुढील विषयाची गंभीर चर्चा चालू आहे. रूप, रस, गंध आदिकरून भौतिक पदार्थांचे गुण स्वतःच आपल्यास जाणूं शकत नाहींत म्हणजे आपणच आपल्या ज्ञानाचा विषय होऊं शकत नाहींत. ( त्यांना जाणण्यास कोणी निराळा चैतन्यविशिष्ट पुरुष लागतो. ) हें तत्त्व सुलभ करून सांगण्यास आचार्यांनीं पुढील विनोदी उदाहरण योजिलें आहे. ते म्हणतात, " कोणी मोठा कुशल नट आपल्या विद्येंत कितीहि तरबेज असला तरी तो कांहीं स्वतःच स्वतःच्या खांद्यावर बसूं शकत नाहीं ! "

तर्कच्युतीमुळें उत्पन्न होणारा विनोद न्यायावरील ग्रंथांतून दिलेल्या अनुमानप्रकरणांत पांहावयास सांपडतो. या तर्कविरहित दोषास्पद विचारसरणीस हेत्वाभास ( Logical fallacy ) म्हणतात. त्याचीं कांहीं मासलेवाईक विनोदी उदाहरणें पुढीलप्रमाणें आहेत.

१. **भीष्मपुत्रो बाहुबलशाली, क्षत्रियत्वात्।** म्हणजे भीष्माचार्यांचा मुलगा मोठा पराक्रमी आहे, कां तर तो क्षत्रिय आहे म्हणून !! जो क्षत्रिय असतो तो पराक्रमी असतो अशी व्याप्ति खरी मानली तरी ( व भीष्म क्षत्रिय होता ही

गोष्ट निश्चित असली तरी ) ब्रह्मचारी भीष्माला पुत्र होता ही गोष्ट गृहीत धरून त्यावर क्षत्रियाच्या पोटीं उत्पन्न होण्यामुळें अनायासें येणारें बाहुबलशालित्व लादलें आहे. त्यामुळें खालीं दुधासाठीं भांडें आहेच असें समजून त्यांत ओतलेलें दूध फुकट जावें किंवा पाया नसता त्यावर बांधलेलें घर कोसळावें तशी या कोटिक्रमाची अवस्था होते ! व विनोदोत्पत्तीशिवाय त्यांत कांहींच हातास लागत नाहीं ! !

२. **देवसेनः असंशयं रणे हतः, अनागतत्वात्** । म्हणजे देवसेन नांवाचा वीर खात्रीनें रणाङ्गणावर मारला गेला आहे. कां ? तर तो आतां येथें आला नाहीं ! ! तो येथें आला नसला तर घरांत विश्रान्ति घेत पडला असेल. त्याचें येथें येणें हें एकच त्याच्या जिवंत असण्याचें लक्षण जोंपर्यंत सिद्ध झालें नाहीं तोंवर वरील तर्क विक्षिप्तपणाचा म्हणून हास्यकारक होय.

३. **शस्त्रवैद्यो दण्ड्यः, शस्त्रप्रयोजनात्** । शस्त्रवैद्याला ( सर्जनला ) शिक्षा केली पाहिजे. कारण तो इतरांवर शस्त्रें चालवितो. पण सर्वच शस्त्र चालविण्याच्या क्रिया दोषास्पद नसतात. अन्यायानें केलेली शस्त्रक्रियाच तेवढी शिक्षार्ह होईल !

४. **अहिफेनो निद्राजनकः, निद्राजनकत्वात्** । अफू झोंप आणते. कारण ती झोंप आणते म्हणून ! ! यावर टीका नकोच. गोल्डस्मिथ एकादे वेळीं " whatever is, is " हा सिद्धांत जोरानें सिद्ध करूं लागे. त्यापैकींच हाहि प्रकार !

न्यायमञ्जरी या न्यायसूत्रावरील टीकेंत न्यायशास्त्राहून इतर शास्त्रांचें खण्डन करतांना जयन्तभट्टानें अनेक ठिकाणीं लागट विनोद केला आहे.

उदाहरणार्थ–मीमांसकांच्या अनुपलब्धि नांवाच्या प्रमाणाचें सोपपत्तिक खण्डन शास्त्रीय पद्धतीनें केल्यावर शेवटीं हा ग्रंथकार त्यांना एक विनोदी टोला लगावीत म्हणतो :—

**त्वदेकशरणां बालां इमामुत्सृज्य गच्छत :**
**कथं ते तर्कयिष्यन्ति मुखमन्यापि वै स्त्रियाः ।।**

" अरे मीमांसका, केवळ तुझ्यावरच अवलम्बून असलेली ही अनुपलब्धि बाला, तिला सोडून तूं जर जाऊं लागलास तर इतर स्त्रिया तुझ्यासारख्या-

( विश्वासघातक्या ) चें तोंड तरी कशा पाहतील ? ”

पाणिनीय दर्शनाचें खंडन केल्यावर अखेर विनोदाचा तडाखा देऊन आपला जय जाहीर करण्यास जयन्तभट्ट म्हणतात:—पाणिनीचें व्याकरणशास्त्र, तीळ, उडीद वगैरे पदार्थ एकत्र मिसळून चांगल्या बुद्धिवान् माणसाला खायला द्यावेत. म्हणजे तो लौकरच खास मंद बनेल !

महाभारत व रामायण हे जे आर्यांचे दोन राष्ट्रीय ग्रन्थ, यांमधील नायक व खलनायक हेहि फार मोठ्या योग्यतेचे. या कारणानें या दोन्ही ग्रन्थांत उदात्तता व गाम्भीर्य यालाच अधिक अवकाश आहे. भांडणें, लढाया, वनवास व अज्ञातवास अशांसारख्या गम्भीर प्रसङ्गांनीं या दोन्ही ग्रंथांचा बराच मोठा भाग व्यापला आहे. त्यामुळें खुद्द विनोदी प्रसङ्गांना त्यांत फारसा अवकाश नाहीं. झालेल्या गोष्टी सांगणें यावर यांत मुख्य कटाक्ष असून काव्य, चम्पू इत्यादींप्रमाणें सांगण्याच्या पद्धतीवर व वर्णनावर यांत भर नसल्यानें मुद्दाम वठवलेला असा कोणताहि रस त्यांत नाहीं. जें काय येईल तें ओघांत व साहजिक तऱ्हेनें. त्यामुळें त्यांत कथेच्या केवळ ओघांत कांहीं ओझरते उल्लेख व क्वचित् कांहीं उपाख्यानें यांत तुरळक विनोद सांपडतो. गरुडानें अमृत आणल्यावर सापांची झालेली फजिती ( आदिपर्व ३४ ), भीमबलाचें वर्णन ( आदिपर्व, १२८. दुर्योधनादि कौरव झाडावर चढलेले पाहून हा दांडगा भीम सबंध झाडासकट त्यांना गदगदा हालवी, तें इतकें जोरानें कीं त्या झाडाचीं फळें व कौरव एकदमच खालीं पडत ! ), तसेंच ‘ पंचेन्द्रोपाख्यान ’ यांतहि विनोदाच्या छटा आहेत. पण स्वतन्त्र विनोद एके ठिकाणीं असा ‘ कणिकनीतीं ’त सापडतो. शठाशीं शठच बनावयाचें, मनांत एक व बाहेर एक दाखवावयाचें, हीं जीं मॅकिव्हेली यानें प्रतिपादिलेलीं राजनीतीचीं तत्त्वें तींच यांत सांगितलीं असल्यामुळें यांत साहजिकच विनोद आला. कणिक म्हणतो, “ आंधळेपण स्वीकारण्याची वेळ आली असतां आंधळें व्हावें, बहिरेपणा दाखवावा, आपलें धनुष्य गवताचें आहे असें भासवावें व हरणास फसवूं पाहणाऱ्या पारध्याप्रमाणें खोटेंच पडून राहावें. अग्निहोत्र घेऊनहि शत्रुपक्षाचा विश्वास संपादन करून त्यावर लांडग्याप्रमाणें झडप घालावी. ” आपलीं तत्त्वें विशद करण्यासाठीं त्यांनीं सांगितलेली एका धूर्त कोल्ह्याची

गोष्ट फारच विनोदी आहे. कोल्ह्यानें नाना हिकमती लढवून वाघ, उंदीर, लांडगा व मुंगूस या चौघांस फसवून हरणाचें मांस स्वतः कसें खाल्लें हा प्रकार या गोष्टींत वर्णन केला आहे.

याच प्रकारचा विनोद महाभारताच्या अफाट विस्तारांत कोठें कोठें आला आहे हें दाखवीत बसल्यास फारच विस्तार होईल. म्हणून नमुन्यासाठीं वरील ठिकाणेंच दाखवून महाभारताची येथेंच रजा घेणें इष्ट होय.

तीच गोष्ट रामायणाची. त्यांतहि, अरण्यकांड सर्ग १७-१८ यांत रामानें केलेली शूर्पणखेची थट्टा, सुंदर काण्डांतील सर्ग ४ मधील राक्षसांतील दीक्षित, राक्षसविप्र यांचें वर्णन व ५ मधील राक्षसींचीं वर्णनें इत्यादि विनोदी स्थळें सांपडतात, यांत विनोदी छटा आहे.

इतर पुराणांचा व्याप फारच मोठा असल्यानें व त्यांची गणना प्रायः ललितवाङ्मयांत करतां येत नसल्यानें त्यांचा परामर्ष येथें घेतां येत नाहीं. भागवतांतील दशमस्कन्धांत कृष्णाच्या बाललीलांत भरपूर विनोद आहे, पण तो सर्वांच्याच परिचयाचा असल्यामुळें त्यासंबंधीं येथें अधिक लिहिण्याची जरुरी नाहीं.

येथपर्यंत दाखविलेला संस्कृत वाङ्मयांतील विनोद सहज प्रेरणेनें, ओघानें आणि कोणतींहि विशिष्ट बंधनें अथवा संकेत न पाळतां त्या त्या ठिकाणीं आलेला दाखविला आहे. काव्य हें एक शास्त्र बनून त्यास एक निश्चित आणि ठराविक स्वरूप भरतमुनींच्या नाट्यशास्त्रानंतर येऊं लागलें. त्यामुळें विनोदाची वरील मोकळी वृत्ति जाऊन तो थोडासा ठरीव आणि संकेतरूप होऊं लागला. पण त्याच कारणांनीं पूर्वीपेक्षां त्याचें वैपुल्यहि झालें. नाटकांतून प्रायः विदूषक योजावा व त्याचे तोंडीं विनोद असावयासच पाहिजे अशी स्थिति उत्पन्न झाली. ‘ त्रोटक ’ नांवाच्या नाटकप्रकारांत तर प्रत्येक अंकांत विदूषक आणावाच लागतो असा नियम आहे. त्यामुळें सर्वच नाटककारांस—मग त्यांतील कोणाची प्रवृत्ति विनोदप्रवीण असो वा नसो—विनोद हा आणावाच लागला. तीच गोष्ट रसचर्चेमध्येंहि झाली. शृंगारापासून उत्पन्न होणारा म्हणून कां होईना हास्यास ‘ रस ’ पदवी देणें भरतमुनीस अवश्य वाटलें. ‘ शृंगाराद्धि भवेत् हास्यः ! ’ त्यामुळें पुढील सर्व आलंकारि-

कांनीं हास्यास रसपदवीस चढवून त्याची चर्चा त्रोटकपणें कां होईना पण उदाहरणें देऊन केली आहे. अर्थात् हास्यरस हा मोठ्या संकोचानें संस्कृत वाङ्मयांत वावरत होता हें मात्र ध्यानांत ठेविलें पाहिजे. शृंगार, करुणादि रसांप्रमाणें त्याला गौरवाचें स्थान कधींच मिळालें नाहीं व जें थोडें मिळालें आहे तेंहि फारशा चांगल्या व अभिलषणीय पद्धतीचें नाहीं. असंबद्ध वडबड करणें व विचित्र वेष घालून अंगें वेडींवांकडीं करणें यांमुळें उत्पन्न झालेलें हास्य हें या रसाचें सामान्य स्वरूप संस्कृत साहित्यशास्त्रांत दर्शविलें आहे. पण संस्कृत नाटककारांच्या व इतर ग्रंथकारांच्या अभिजात विनोदबुद्धीमुळें संस्कृतांतील विनोदास थोडेसें उच्च स्वरूप प्राप्त झालें, नाहीं असें नाहीं. पण तो गुण त्या व्यक्तींचा आहे; साहित्यशास्त्राचा मात्र नव्हे. हास्यरसांत हास्य हा स्थायीभाव. तें उत्पन्न करणारा आलंबनविभाव. विसंगतीमुळें हास्य उत्पन्न करून तें वाढविण्यास कारणीभूत होणारी भोंवतालची परिस्थिति हा उद्दीपनविभाव. हांसतांना चेहेऱ्यावर दिसणारीं लक्षणें व हस्तपादादिकांची हालचाल हे त्याचे अनुभाव व करुण, शृंगार वगैरे रसांचें थोडें मिश्रण यांत होईल तेथें त्या भावना याचे व्यभिचारी भाव होत.

संस्कृत काव्यापेक्षां संस्कृत नाटकांत विनोदाचें अधिक प्रमाण आहे; व हा विनोद करण्याचें मुख्य साधन प्रायः नाटकांतील विदूषकच होय. म्हणून संस्कृत नाटकांतील विनोदाचें दिग्दर्शन करण्यासाठीं त्यांतील विदूषकाचें विनोदी पात्रच विवेचनासाठीं प्रथम घेतलेलें बरें.

भरतमुनीनें आपल्या नाट्यशास्त्रांत विदूषकाचें वर्णन ( अध्याय २४ १०६ ) असें केलें आहे, " तो खुजा, दांताड्या, कुबड्या, वक्रतुंड टकल्या व घाऱ्या डोळयांचा ब्राह्मण असावा. " ( अध्याय १२, १२१ ते १२५ ) या श्लोकांमध्यें विदूषकाच्या या विचित्र स्वारीनें तीन तऱ्हेचें हास्य उत्पन्न करावें असें सांगितलें आहे.

१. **अंगहास्य**–म्हणजे हस्तपादादि अवयव वेडेवांकडे करून.

२. **काव्यहास्य**–म्हणजे वात झाल्यासारखें वाटेल तें असंबद्ध बडबडून.

३. **नेपथ्यहास्य**–म्हणजे विचित्र पोषाख करून.

विदूषकानें निखालस टकल्या तरी असावें, नाहींतर काकपदाप्रमाणें

कोचकीचे केस तरी त्यानें राखावे, असें भरतमुनीचें म्हणणें होतें ( अध्याय २१-१२६ ). म्हणूनच मृच्छकटिकांतील शकार त्यांतल्या मैत्रेय नांवाच्या विदूषकास ' काकपदशीर्षमस्तक ' असें म्हणत असतो. साहित्यशास्त्रावरील पुढील ग्रंथकारांनीं विदूषकाच्या वरील लक्षणांत आणखी थोडी भर टाकिली आहे व ती विदूषकाच्या पात्राच्या विकासाची द्योतक आहे. कारण पूर्वीप्रमाणें केवळ वांकुल्या दाखवून लोकांस हंसविण्यापेक्षां व निरर्थक बडबडीनें त्यांची करमणूक करण्याऐवजीं तो अधिक मार्मिक बनला. कथानकाच्या विकासांतहि त्याचा उपयोग होऊं लागला. मालविकाग्निमित्र नाटकांत वर्णन केल्याप्रमाणें तो कधीं भांडणें लावून चतुराईनें नाटकांतील नायकाचें कार्य सिद्धीस नेऊं लागला, तर कधीं स्वतःच्या प्रमादानें नाट्यकथानकें अधिक गुंतागुंतीचीं व आकर्षक बनविण्यास उपयोगी पडूं लागला. उदाहरणार्थ, विक्रमोर्वशीय, मृच्छकटिक व रत्नावली या नाटकांत भूर्जपत्र, अलंकार व चित्रफलक त्या त्या विदूषकांनीं गबाळेपणानें हातांतून टाकून दिल्यामुळें नाट्यकथानकांस खरा रंग चढला आहे. विदूषकास असा रंगवून कवींनीं द्विविध विनोद साधला; विदूषकाचा विसरभोळेपणा, भाबडेपणा व बावळटपणा दाखवून स्वभावनिष्ठ विनोदाचा मासला त्यांस दाखवितां आला हें एक व त्याचेचबरोबर ते नाट्यप्रसंगहि गमतीचे झाल्यामुळें तेथें चांगला प्रसंगनिष्ठ विनोदहि निर्माण झाला हें दुसरें.

बहुतेक सर्वांनीं विदूषक हा खादाड दाखविला आहे. पण त्याच वेळीं तो अत्यंत प्रेमळ, स्वामिभक्त व निरुपद्रवी असल्यानें संस्कृत नाटकांतील हास्यरसांत क्वचित् प्रसंगीं करुणाचीहि गोड छटा आलेली आहे. शकुंतलेच्या प्रेमाबद्दलचें गुपित दुष्यंतानें प्रथम विदूषकास सांगितलें व शेवटीं त्यास म्हणाला कीं, " ही सारी थट्टा आहे. " पण पुढें शकुन्तलेस झिडकारल्यावर पश्चात्ताप पावून तोच विदूषकास म्हणतो, " शकुंतलेचें तुलासुद्धां विस्मरण कसें झालें ? " यावर " मयापि मृत्पिण्डबुद्धिता तथैव गृहीतम् " असें विदूषक राजास म्हणतो ( अंक ६ ). त्यांत विनोदापेक्षां करुणच जास्त आहे. शेक्सपिअरच्या नाटकांतील ' किंग लिअर ' मधील Fool प्रमाणें मृच्छकटिकांतील मैत्रेय चारुदत्तासाठीं अखेरीस मरावयासहि तयार झाला आहे. तसेंच Touchstone या As You Like It मधील Fool प्रमाणें संस्कृत नाटकांतील कांहीं विदू-

षकांचे विचार स्थलविशेषीं मर्मभेदक व उद्बोधक असतात. पण Touchstone इतकी तत्त्वज्ञानप्रवणता यांच्यांत नाहीं. तरी ते आनंदी, उत्साही, संकटास तोंड देणारे आहेत. कंचुकीच्या पात्रासारखे ते रडगाणें गाणारे व जिवास कंटाळलेले नसतात. आलेली कठिण वेळहि विनोदानें सह्य करून घ्यावयाची हा त्यांचा बाणा आहे. 'ॲज यू लाइक इट' यांतील विदूषकाप्रमाणें नागानंदांतील विदूषकानेंहि आपल्या नायकाबरोबर अरण्यवास पत्करला आहे.

'किंग लियर' मध्यें विदूषकास 'Boy' म्हटलें आहे तसें आमच्या विदूषकास नेहमींच 'बटु' असें संबोधितात. पण शेक्स्पिअरच्या नाटकांतील Fools मध्यें व संस्कृत नाटकांतील विदूषकांमध्यें मुख्य फरक आहे तो हा कीं, शेक्स्पिअरनें आपल्या Fools चा संबंध कथानकाच्या विकासासाठीं व गुंतागुंतीसाठीं फारसा ठेविला नाहीं. त्याचे विदूषक कथानकांत प्रायः दुय्यम असतात. कोणत्याहि महत्त्वाच्या घटनेंत त्यांचें प्रमुख अंग नसतें. केवळ त्यांच्यामुळें नाटकास विशेष कलाटणी मिळाली आहे असें कधीं होत नाहीं.

संस्कृत नाटकांतील सर्व विदूषक नजरेसमोर धरून त्यांचें पुढीलप्रमाणें साकल्यानें लक्षण करतां येईल:

**प्रत्युत्पन्नमतिर्द्विजोऽति चतुरो मौर्ख्यं बहिर्दर्शयन्**
**सर्वत्रौदरिको विरूपसवनो यो ग्राम्यवच्चेष्टते ।**
**शृंगारे सचिवश्च नर्मनिपुणो यो भक्तिमान्नायके**
**ज्ञेयो ह्येष विदूषकः सुचरितः हास्यः स्वयं हास्यकृत् ॥**

म्हणजे विदूषक हा एक चतुर व हजरजबाबी ब्राह्मण असून लोकांची केवळ करमणूक करण्यासाठीं तो मूर्खासारखा व क्वचित् गांवढळासारखाहि वागत असतो. तो नेहमींच खादाड, कुरूप व विचित्र पोषाक केलेला असावयाचा. नाटकांतील नायकास त्याची प्रेमविषयांत मोठी मदत व्हावयाची. नायकाच्या स्तुतीचीं विनोदपर व क्वचित् मर्मभेदक वचनेंहि तो बोलावयाचा. तो स्वतः आचरणानें फार चांगला, विश्वासू असून नाटकांतील नायकावर त्याची अतिशय भक्ति असावयाची व शेवटीं स्वतःच्या बोलण्यानें व कृतीनें स्वतःस हास्यास्पद बनवून घेऊनहि तो हंशा पिकवावयाचा हें त्याचें प्रमुख काम.

विदूषकाचे हे वरील सर्व गुण कोठेंकोठें व कसेकसे प्रगट झाले आहेत हें

आतां क्रमानें दाखवितों.

संस्कृत नाटकांतील बहुतेक विनोदाचें अधिष्ठान विदूषकच असल्यामुळें किंवा तो विनोद लोहचुंबकाच्या कांबीला लोखंडाच्या कणांप्रमाणें त्याला चिकटूनच राहिला असल्यामुळें विदूषकाचा परामर्ष घेतला कीं बहुतेक संस्कृत नाटकांतील विनोदाचा परामर्ष घेतल्यासारखें होणार आहे.

**विदूषकाचें प्रत्युत्पन्नमतित्व**—संस्कृतांतील सर्व विदूषकांत कालिदासाच्या मालविकाग्निमित्रांतील विदूषकास या बाबतींत पहिलें स्थान द्यावें लागेल केवळ चित्रांत दिसलेली मालविका राजाच्या प्रत्यक्ष नजरेस आणण्यासाठीं त्यानें हरदत्त व गणदास या दोन संगीताचार्यांमध्यें लाविलेला कलह त्याच्या चतुराईची उत्तम साक्ष देतो. पण त्याहि पुढें या दोघांच्या वादविवादास राणीनें मोडता घातल्यामुळें सदर भांडण पेटत नाहीं असें पाहिल्यावर विदूषकानें त्या भोळ्या ब्राह्मणास—गणदासास—तेथल्या तेथें जें चेतविलें आहे त्यामुळें विदूषकाचा हजरजबाबीपणा पूर्णपणें व्यक्त होतो. हरदत्त व गणदास यांच्या वादाच्या प्रकरणांत मालविकेसारखी सुंदर मुलगी राजाच्या नजरेस पडणार व राजाची स्वारी तिच्यावर आसक्त होणार अशी धारिणी राणीची बालंबाल खात्री असल्यामुळें ती आपला आश्रित जो गणदास ( मालविकेचा संगीतशिक्षक ) यास " या वादाच्या भानगडींतच पडूं नकोस " असा उपदेश करीत होती. आपण हरदत्तापेक्षां कमी नाहीं व तें आपण आपल्या शिष्येचें कौशल्य दाखवून प्रत्यक्ष सिद्ध करूं, या कल्पनेच्या आहारीं गणदास चांगलाच गेला होता; व त्यास वाटत होतें कीं " तें सिद्ध करण्याच्या भानगडींत पडूं नकोस " असें जें राणी आपल्यास सांगते तें आपण या कामांत पराभूत होऊं म्हणून. ही त्याची मनोभूमिका बरोबर ताडून त्यास अधिक त्वेष आणण्यासाठीं राणीच्या वरील बोलण्यानंतर तो गणदासास एकदम म्हणतो, " बा गणदासा, राणीसाहेबांचें बोलणें रास्त आहे. आपलें श्रेष्ठत्व प्रयोगानें सिद्ध करण्याच्या भानगडींत राणीसाहेब म्हणतात त्याप्रमाणें तूं कशास पडतोस ? मालविकेस संगीताचे धडे द्यावे व सरस्वतीपूजनाच्या वायनाचे मोदक झोडावे अशी तुझी चैन चालली असतां ज्यांत तुझा पराजय ठेवलाच आहे अशा वादांत तूं तरी कशास पडतोस बाबा ?" समयसूचकपणानें केलेल्या या एकाच चिथावणीनें गणदासाचा सारा

अभिमान जागा होऊन तो हट्टास पेटला व " वादविवाद झालाच पाहिजे केवळ पगारासाठीं ज्ञानदान करणारा वाणी मी नव्हें, " असें तो म्हणूं लागला. त्यास या हट्टापासून परावृत्त करणें राणीच्या आटोक्यांत राहिलें नाहीं व अखेर विदूषकाची युक्ति फळास आली

या नाटकांत याहिपुढें अनेक प्रसंगीं या गौतम नांवाच्या विदूषकाचा हजरजबाबीपणा व चतुराई पूर्णपणें निदर्शनास येतात. मालविका रंगभूमीवर आल्यावरहि ती बराच वेळपर्यंत निरनिराळ्या मनोहर स्थितींत राजाच्या नजरेसमोर राहावी म्हणून गौतमानें स्वतः मूर्खपणा पत्करून तिची चूक झाली असें सांगितलें, व तिला बराच वेळ तेथेंच थांबविली आहे. ती चूक काय असेल याबद्दल गणदास, परिव्राजिका व खुद्द मालविका यांचें औत्सुक्य वाढत जाऊन गणदासानें विदूषकास विचारलें कीं, " मालविकेनें केलेली कोणती ती चूक ? " त्यावर गौतम उत्तर करतो, " सर्वांत मोठी चूक म्हणजे माझ्यासारख्या ब्राह्मणाची प्रथम पूजा केली नाहीं ! " तें ऐकून सर्व हंसतात व मालविकाहि त्याच्याबरोबर हंसते. या स्थितींत मालविकेला पाहून आपल्या डोळ्यांचें पारणें फिटल्यासारखें राजाला होतें. तसेंच पुढें धारिणी राणीच्या दर्शनास आपण निघालों असतां व त्यासाठीं उपायनपुष्पें आपण तोडीत असतां आपल्यास ' साप चावला ' असा बहाणा करून गौतमानें राणीकडून तिची आंगठी मिळविली व तिच्या साह्यानें बंदींत पडलेल्या मालविकेची सुटका करविली. यावरूनहि त्याचा हिकमती स्वभाव व समयसूचकपणा व्यक्त होतो. खरें म्हणावयाचें झाल्यास या नाटकांतील सर्व घटना विदूषकानेंच घडवून आणलेल्या असून राजा केवळ तयार झालेल्या फळाचा भोक्ता आहे.

हर्षाची रत्नावली व भासाचें स्वप्नवासवदत्त या दोन्ही नाटकांत विदूषकाच्या प्रत्युत्पन्नमतित्वाचीं उदाहरणें आहेत. " सागरिकेच्या शेजारीं उदयन राजाचें चित्र कसें ? " असा प्रश्न वासवदत्ता राणीनें रागानें केल्यावर राजा बुचकळ्यांत पडला. सागरिकेवरील प्रेमाचें आपलें बेंड बाहेर पडतें म्हणून तो गोंधळला. पण विदूषकानें ताबडतोब पुढील उत्तर दिलें, " राणीसाहेब दुसरें कांहीं नाहीं. मी राजेसाहेबांस सहज म्हटलें कीं, ' स्वतःनें स्वतःचें चित्र काढणें हें फार कठीण आहे. ' ( **आत्मा किल दुःखमालिख्यते ।** )

तेव्हां हेंहि चित्रकौशल्य आपल्यांत आहे हें दाखविण्याकरितां राजेसाहेबांनीं आपली प्रतिमा या चित्राशेजारीं काढली. ”

विदूषक हा आपण मूर्ख व अविद्वान् आहों असें नेहमीं सांगत असतो· कदाचित् तो फारसा विद्वान् नसेलहि. पण विद्वत्तेच्या बाबतींत त्यानें केलेल्या हास्यास्पद चुका व इतर ठिकाणीं दाखविलेला मूर्खपणा हा मुद्दाम राजाची खुषमस्करी करण्यासाठीं व इतरांस हंसविण्यासाठीं त्यानें केलेला असावा. तसेंच आपण फार भित्रे आहोंत असें दाखवूनहि विदूषकांनीं विनोद निर्माण केल्याचीं पुष्कळ स्थळें आहेत.

प्रथमतः आपण मठ्ठ, विसराळू व विकटोपर्यंत अध्ययन केलेले आहोंत असें दाखवून विदूषकानें केलेला विनोद पुढीलप्रमाणें आहे. श्रीहर्षाच्या प्रियदर्शिकेमध्यें विदूषक दासीस म्हणतो, “ म्हणजे, तूं काय मला अविद्वान् समजतेस काय ? राणी मला इतका मान देते कीं या राजवाड्यांतील आश्रित-वर्गांत चार वेद, पांच वेद व सहा वेद जाणणारे ब्राह्मण असूनहि ती प्रथम मलाच बोलावून मोदकाचें वाण देते. ”

भासाच्या ‘ अविमारक ’ नाटकांत आपल्या स्मरणशक्तीबद्दल व विद्वत्तेबद्दल एकाच वाक्यांत विदूषक पुढील ग्वाही देतो, “ मला कोणी सामान्य समजूं नये. रामायण नांवाचें नाट्यशास्त्र आहे. त्यांतील सबंध पांच श्लोक मी एका वर्षाच्या फारच थोड्या काळांत मुखोद्गत केले आहेत.”

स्वप्नवासवदत्तांत विदूषक राजाला बरें वाटावें म्हणून एक गोष्ट सांगत असतां पुढील उद्गार काढतो. वास्तविक कांपिल्य हें नगरीचें नांव व ब्रह्मदत्त हें राजाचें नांव असतां त्यांची उलटापालट करून तो म्हणतो, “ एक होतें ब्रह्मदत्त नांवाचें नगर व त्यांत कांपिल्य नांवाचा राजा राज्य करीत होता.” ही चूक “ जॉर्ज नांवाच्या नगरांत इंग्लंड नांवाचा राजा राज्य करीत आहे ” असें म्हणण्यासारखीच आहे.

मालविकाग्निमित्रांतहि विदूषकानें आपल्या विद्वत्तेवर व स्मरणशक्तीवर आपण होऊनच पुढील टीका केली आहे. विदूषकानें सर्वत्र पसरलेलें कपटजाल ओळखून अग्निमित्राची दुसरी राणी इरावती विदूषकावर जळफळून म्हणाली, “ हा सगळा प्रकार शृंगार–राज्यांतील कपटनीति करणाऱ्या या गौतम प्रधानानें घडवून आणला आहे. ” ( **इयमत्र कामतंत्र-**

**सचिवस्य नीतिः ।**) यावर विदूषक " नीति " हे त्यांतील शब्द धरून इरावतीस चट्दिशीं उत्तर करतो, " राणीसाहेब, राजनीतिशास्त्रबित्र कुठलें घेऊन बसलां ? त्याचें अध्ययन माझ्याच्यानें कसलें होतें ! मी स्मरणाचा इतका धड आहे कीं, त्या राजनीतींतलें एकादें अक्षर एका बाजूनें माझ्या स्मृतींत कोंबीन तर तींतच जपून ठेवलेला माझा ब्राह्मणाचा गायत्रीमंत्र दुसऱ्या बाजूनें बाहेर पडावयास लागेल ! " ( **यदि नीत्यां एकमपि अक्षरं पठेयम् ततो ननु गायत्रीं अपि विस्मरेयम्** । )

अज्ञानाचें पांघरूण घेऊन विनोद उत्पन्न करण्याचा विदूषकाचा दुसरा मौजेचा मार्ग म्हणजे शृंगारविषयांतील आपली अनभिज्ञता मुद्दामच प्रगट करणें हा होय. शृंगारांत प्रेमी जनांचीं मनें कशीं हळवीं होतात, प्रेमविषयच त्यांचें सर्वस्व कसा बनतो, ते वेडे बनून काव्यमय कसे बोलूं लागतात, त्या बोलण्याचे नाजूक अर्थ कसे जाणले पाहिजेत, ' निषेध म्हणजे अनुमति ' कशी समजली पाहिजे, ' ता ' म्हणजे ताकभात कसा ओळखला पाहिजे, या सर्व गोष्टी विदूषक विसरतो, व कसलाहि प्रसंग व कसलेहि शब्द असले तरी त्याचा निकाल सरळ वाच्यार्थानें व धसमुसळेपणानें लावतो. त्यामुळें विनोद सर्वत्र उत्पन्न झालेला आहे. नाटकांतील नायकास नायिकेच्या सौंदर्याची मोहिनी पडल्यामुळें तिजवांचून त्याला क्षणभरहि करमत नाहीं. अशा वेळीं " मनास विरंगुळा पडेल असें कांहीं करमणुकीचें साधन सांग, " असें राजानें म्हणतांक्षणींच विदूषक आपल्या स्वभावानुरूप मुद्दामच म्हणतो, " मित्रा, स्वैंपाकघरांत जाऊन कांहीं खाऊनपिऊन आपलें मन रमीव." उदाहरणार्थ, विक्रमोर्वशीयामध्यें विदूषक अशाच वेळीं राजास सल्ला देतो कीं, " अरे, स्वैंपाकघरांतील मौज तुला काय सांगूं ! तेथें भक्ष्य, भोज्य, लेह्य वगैरे पांच प्रकारच्या अन्नांची चाललेली सिद्धता पाहून कोणाच्याहि मनाची सहज करमणूक होईल. " तसेंच उर्वशीची आणि पुरूरवा राजाची भेट झाल्यावर उर्वशीस तेथेंच राजाजवळ सोडून तिची सखी चित्रलेखा स्वर्गास जाऊं लागली, व जातांना राजास म्हणाली, " महाराजांनीं माझी मैत्रीण जी उर्वशी हिच्याशीं अशा प्रेमळपणानें वागावें कीं, तिला स्वर्गाची आठवण होऊं नये. " यावर विदूषकमहाराज उद्गारतात, " अहो बाई, स्वर्गाची

आठवण होण्याची गोष्ट तुम्ही सांगतां, पण त्या स्वर्गात असें आठवण होण्यासारखें आहे तरी काय? तेथें काय खावयास आहे का प्यावयास आहे? नेहमीं माशासारखे डोळे उघडे ठेवून टक लावून बसावयाचें. ”

प्रियदर्शिके’त असाच प्रसंग आहे. वत्सराज उदयन प्रद्योताच्या कारागृहांतून वासवदत्तेस घेऊन पळून येतो. व वासवदत्तेसारख्या स्त्रीरत्नाची प्राप्ति झाल्यामुळें हें बंधन मला मोठें उपकारक झालें अशी तो बंधनाची स्तुति करतो. अशी बंधनाची स्तुति करण्यांत शृंगाराची मोहिनीच राजाच्या मनावर जास्त होती ही नाजूक बाब न जाणून ( किंवा न जाणण्याचा बहाणा करून ) विदूषक त्यास धसमुसळेपणानें म्हणतो, “ अरे बाबा, तुला कारागृह जर इतकें प्रिय आहे तर तुझा मित्र दृढवर्मा यास कलिंग राजानें बंदींत घातलें म्हणून रागावतोस कां ? ” याहिपेक्षां शृंगाराविषयीं विदूषकाच्या अनभिज्ञतेची मौज मृच्छकटिकांत आहे. भर पावसांतून, भयंकर काळोख पडला असतां वसंतसेना चारुदत्ताकडे कां आली हें जणू काय आपल्यास समजत नाहीं असा बहाणा करून ती तेथें आल्यावर चारुदत्ताच्या अनुज्ञेनें तो तीस असा सरळ सवाल करतो कीं, “ बाई, असल्या काळोखांत तूं येथें कां बरें आलीस ? ” त्यावर वसंतसेनेच्या चेटीस मैत्रेय ब्राह्मण खरोखरच फार साधाभोळा आहे असें वाटतें व तसें ती म्हणतेहि. पण त्यावर वसंतसेना विदूषकाचा खरा स्वभाव ओळखून तिला म्हणते, “ अग, या ब्राह्मणास साधाभोळा कां म्हणतेस ? चांगला घालवेडा व मोठा धूर्त म्हण कीं. ” येथें वसंतसेना आपल्या दागिन्यांचें मूल्य घेण्यास आली असावी या अर्थानें विदूषकानें वरील प्रश्न केला असें जरी मानलें, तरी त्यांत चारुदत्ताच्या घरीं वसंतसेनेनें येण्यांत तिचा जो शृंगारिक हेतु होता त्याची प्रच्छन्न सूचना विदूषकास करावयाची नव्हती असें नाहीं. रोहसेनास वसंतसेनेच्या खऱ्या स्वरूपाचें ज्ञान झालें नाहीं हें त्याच्या बाल्यसुलभ अज्ञानाचें निदर्शक मानतां येईल. पण विदूषकास मात्र वेश्या म्हणजे कोण व ती चारुदत्ताकडे कशास आली हें कळण्यासारखें नव्हतें असें नाहीं.

याचें प्रत्यंतर म्हणजे पुढें या रत्नावली प्रकरणाचा सर्व खुलासा झाल्यावरहि विदूषक चेटीस सरळच विचारतो, “ काय, आज वसंतसेनेचा येथेंच निजण्याचा विचार दिसतो आहे ? ” व त्यावर तीहि हंसून म्हणते, “ आतां

मात्र, मैत्रेया, फारच भोळसटपणा (शृंगारविषक अज्ञान) दाखविलास बरें का!"

शाकुन्तलांत दुष्यन्ताचें मन शकुन्तलेवर बसलेलें ऐकून विदूषकानें त्यावर प्रथम थोडी घसमुसळेपणाची विनोदी टीका केली आहे. रतीसारख्या सुंदर स्त्रिया अन्त:पुरांत असतां राजाचें प्रेम एका रानवट पोरीवर बसावें ही गोष्ट विदूषकाला चमत्कारिक वाटून तो राजास स्पष्टच म्हणतो, "उत्तम खजूर खाऊन तोंडाला गोडाची मिठी बसली म्हणजे (किंवा जिलबी फार झाल्या-वर मध्यें मठ्ठयाचा भुरका मारावा त्याप्रमाणें) जशी एखाद्याची चिंचेवर वासना जावी त्याप्रमाणें हें तुझें शकुन्तलाप्रेम दिसतें." तसेंच सहाव्या अंकांत राजानें म्हटलें, "माझा मोह दूर होऊन शकुन्तलेवर माझें प्रेम होतें ही गोष्ट मला स्मरली मात्र तों मदनानें मजवर 'चूतशर' हा पंचबाणांपैकीं बाण रोखिला." यावर पुढें असलेल्या चूत (आम्र) मंजरीवर आपल्या वांकड्या दांडक्याचा रोख धरून विदूषक त्यास म्हणतो, "थांब हां. तुला त्रास देणाऱ्या या मदनबाणाचा फडशाच पाडतो."

कुरूपता व खादाडपणा या आपल्या दोन बहुमोल गुणांचें वर्णन खुद्द विदूषकानेंच ठिकठिकाणीं केलेलें असल्यामुळें बराच विनोद संस्कृत नाटकां-मध्यें उत्पन्न झाला आहे.

विक्रमोर्वशीयामध्यें पांचव्या अंकांत पुरूरवा राजा व त्याचा मुलगा आयु यांची गांठ पडली. तो आपला मुलगा आहे हेंहि राजास त्या वेळींच कळलें. तेव्हां त्यानें आयूस सांगितलें कीं, "हे पहा बाळ, हे विदूषकमहाराज. हे माझे प्रियमित्र आहेत, व शिवाय ते जातीनें ब्राह्मण. यास्तव त्यांना (त्यांच्या विचित्र रूपाला न भितां) तूं खुशाल वंदन कर." यावर विदूषक आपल्याच कुरूपतेवर आपणच पुढील विनोदी टीका करतो.

"कां, मला नमस्कार करण्याची भीति राजपुत्रास काय म्हणून वाटावी? च्यवनऋषींच्या आश्रमांत असतां यांना तेथील झाडांवरील वानरांचा परिचय झालाच आहेना?"

विदूषकाची वानराशीं तुलना करणें हा प्रकार प्राय: सर्वत्रच आढळतो. तसेंच कांहीं ठिकाणचे विदूषक आपल्यास बाजारांत हिंडणाऱ्या पोळाचीहि

उपमा देतात. मृच्छकटिकांतील मैत्रेय व अविमारकांतील संतुष्ट या दोन विदूषकांनीं आपली तुलना पोळाशीं केली आहे. मालविकाग्निमित्रांतील गौतम विदूषकाचें निपुणिका दासीनें असेंच वर्णन केलें आहे. ती म्हणते, "तो पहा विदूषक बाजारांतल्या पोळाप्रमाणें बसल्या बसल्याच झोंपला आहे!" तसेंच "यज्ञोपवीतामुळेंच आपण ब्राह्मण. ब्राह्मण्याचे इतर गुण आपल्यांत नाहींत," असें स्वतः तो व इतर पात्रेंहि म्हणतात. त्यामुळें 'ब्रह्मबंधु' म्हणजे भटुरगा किंवा 'महाब्राह्मण' ही शिवी विदूषकास वापरली आहे. मृच्छकटिकांतील मैत्रेय म्हणतो, "जसा सर्व नागांमध्यें गांडूळ (डुण्डुभः) तसा मी सर्व ब्राह्मणांत (आचारहीन व तेजोहीन) ब्राह्मण आहे!" ब्राह्मणवर्गाची ही नालस्ती न खपूनच कीं काय भट्ट नारायण, भवभूति इत्यादि ब्राह्मण नाटककारांनीं ब्राह्मण विदूषकाचें हें पात्र आपल्या नाटकांत मुळींच घातलें नसावें. कारण कित्येक वेळीं विदूषक हा वेडावांकडा नाचणारा व स्वतःस अत्यंत हास्यास्पद करून घेणारा असा वर्णिला आहे. दासींनीं त्यास इकडेतिकडे ओढावें, ढकलून द्यावें अशी त्याची फरपट रत्नावलींत वर्णन केली आहे; व मृच्छकटिकांत तर तो स्पष्टच म्हणतो कीं, "मी ब्राह्मण चव्हाट्यांतून चाललों म्हणजे कुत्रीं जसा भाकरीवर हल्ला करतात तसे मजवर लोक करतील." शाकुन्तलांत तर मातलीनें त्या बिचाऱ्यास फार क्षुल्लक कारणासाठीं यज्ञांतल्या बोकडाप्रमाणें बुकलला आहे!

**रत्नावलींत** अंगावर प्रत्यक्षच वानर चालून आल्यामुळें सागरिका भ्याली होती असें वर्णन आहे, व पुढें राजाबरोबर विदूषकास येतांना पाहून पुन्हां 'तो दुष्ट वानर आला' असें तीस खरोखरच वाटून ती भिऊं लागली, असें वर्णन आहे. पण याहिपेक्षां विदूषकाच्या वानरत्वामुळें उत्पन्न झालेला अधिक गमतीचा विनोद मालविकाग्निमित्रांतील पुढील प्रसंगांत आहे.

मालविकेशीं लघळपणाच्या गोष्टी व अतिप्रसंग करीत असतांना इरावती अग्निमित्र राजास पकडते. त्या कपटनाटकाचा सूत्रधार विदूषकही जवळ असतो. ते दोघेहि कसेबसे कांहींतरी खोटेंनाटें सांगून इरावतीच्या पेंचांतून सुटावयास पाहत असतात तोंच बातमी येते कीं, राणीच्या धाकट्या बहिणीस पिंगल नांवाच्या एका दांडग्या वानरानें भेडसाविलें, त्यामुळे ती मुलगी भेदरली आहे. अर्थात् राजास तिकडे जाणें प्राप्त झालें व त्या निमित्तानें इरावतीच्या

कचाट्यांतून त्याची व विदूषकाचीहि आयतीच सोडवणूक झाली, तेव्हां त्या वानराच्या बहुमोल कामगिरीवर संतुष्ट होऊन विदूषकाची स्वारी उद्गारते, "शाबास, रे पिंगल वानरा, शाबास ! कसा अगदीं आयत्या वेळीं तूं तुझ्या जातभाईच्या ( माझ्या ) मदतीस धांवलास!" राजाबरोबर विदूषकाचेंहि इरावतीनें कडकपणें पारिपत्य केलें असतें हें पक्कें जाणून विदूषकानें वानरास वरील शाबासकी दिली आहे.

तसेंच मृच्छकटिकांतील मैत्रेयानेंहि आपल्या कुरूपपणावर आपणच पुढील प्रमाणें विनोदी शेरे मारले आहेत व ते विशेष मौजेचे वाटतात. याचें कारण असें कीं, त्यानें स्वतःच्या कुरूपतेला चारुदत्त व वसंतसेना या सुंदर जोडप्याच्या लावण्याची पार्श्वभूमि केली आहे. पहिल्या अंकाच्या शेवटीं एकमेकांचे गुण जाणून, एकमेकांविषयींच्या अनुरागानें प्रेरित होऊन व एकमेकांस सन्निध येऊन चारुदत्त आणि वसंतसेना आपलीं सुंदर मस्तकें रमणीय विनयानें लववून एकमेकांस प्रणाम करतात, त्यावर त्या दोघांसहि नमस्कार करावयास मैत्रेय सरसावतो. पण त्यांचें सौंदर्य व आपली कुरूपता ध्यानीं येऊन तो पुढील उद्गार काढतो. "तुम्हीं दोघांनीं पिकलेल्या भाताच्या दोन शेतांप्रमाणें आपलीं मस्तकें साळीच्या लोंबींप्रमाणें लववून व एकमेकांस चिकटवून मोठ्या प्रेमानें एकमेकांस नमस्कार केला. मीसुद्धां उंटाच्या गुडघ्यासारखें खडबडीत व टेंगळें आलेलें माझें मस्तक नमवून तुम्हां दोघांस प्रणाम करतों." तसेंच "वसंतसेनेस तिच्या घरीं पोचवावयास तूं जा." असें चारुदत्तानें त्यास म्हटलें असतां तो म्हणतो, " नाहीं रे बाबा ! तूंच तिच्याबरोबर जा. या हंसगामिनी वसंतसेनेच्या मागून तूं जाऊं लागलास म्हणजे तूं राजहंसारखा शोभशील. पण तोच मी एक दरिद्री व कुरूप ब्राह्मण तिच्यामागून जाऊं लागलों तर माझ्यावर थट्टेखोर लोक तुटून पडून माझी दशा करतील." एखाद्या सुंदर व तरुण वेश्येबरोबर मैत्रेयासारखा कुरूप व दरिद्री ब्राह्मण जात असलेला पाहून त्याची निर्दयपणें थट्टा करण्याचा मोह चव्हाट्यावरील टवाळांना किती होईल याची कल्पना आजहि करतां येण्यासारखी आहे.

राजशेखराच्या '**विद्धशालभंजिका**' नांवाच्या नाटिकेंत ,विदूषकाची पुढील थट्टा आहे. राजानें काढलेल्या चित्रांत निरनिराळ्या व्यक्ति दाखवल्यावर तो विदूषकास म्हणतो, "हें वानराचें चित्र म्हणून सांगितलें हें तुझेंच आहे !"

यावर तो रागावून म्हणतो, " छे छे ! हें माझें चित्र नव्हे. मला माझी बायको तर प्रत्यक्ष देव म्हणते. " त्यावर राजा म्हणतो , " या झाडावरच्या पोपटाचें तर असें मत आहे कीं, शंकराचा गण जो भृंगिरिटी तो तूंच ! ! "

विदूषकच्या खादाडपणाबद्दल त्रोटक उल्लेख वर आलाच आहे. पण मृच्छकटिक नाटक सर्व तऱ्हेच्या विनोदाच्या बाबतींत सर्व संस्कृत नाटकांत श्रेष्ठ असल्यामुळें त्यांतील विदूषकाच्या भोजनप्रियतेबद्दलचे उल्लेखहि मोठे मार्मिक व इतर दृष्टीनेंहि रमणीय आहेत. बुभुक्षित असला तरी सूत्रधाराकडील जेवणाचें आमंत्रण नाकारीतच मैत्रेय ब्राह्मण प्रवेश करतो. उलट विक्रमोर्वशीयांतील विदूषक राजानें सांगितलेल्या गुप्त गोष्टीनें आपलें पोट आतां फुटावयास लागलें आहे याला पुढील उपमा देतो. " परान्नाच्या आमंत्रणावर टपून बसलेल्या अधाशी ब्राह्मणाचें पोट यथेच्छ ताव मारल्यामुळें जसें तुडुंब फुगून जातें त्याप्रमाणें माझेंहि पोट राजाच्या रहस्यानें तुडुंब भरलें आहे. " (म्हणजे तें रहस्य लोकांस केव्हां एकदा सांगेन असें मला झालें आहे ). त्याचे आपल्या भोजनप्रियतेबद्दलचे सर्व उल्लेख चारुदत्ताच्या दारिद्र्यवर्णनाच्या भूमिकेवर त्याने रंगविले आहेत. त्यामुळें त्यांत एक रमणीय विनोद साधला आहे. तो म्हणतो, " चारुदत्ताचा सखा जो हा मैत्रेय त्याला आतां परक्याच्या घरचीं आमंत्रणें घ्यावीं लागावीं ना ? चारुदत्ताच्या वैभवाच्या काळीं हा मैत्रेय रात्रंदिवस मसालेदार मोदकाच्या सुगंधी ढेकरा देत त्याच्या देवडीवर खुशाल पडून राहावयाचा. त्याचे जेवणाचे वेळीं त्याजभोंवतीं इतर खाद्यपेयांचा मोठा गराडा पडून राहत असे. पण तो आकंठ तृप्त असल्यामुळें त्या सर्व खाद्यपेयांच्या वाट्यांस तो मधूमधून एखादें बोट लावी न लावी. तें कसें तर एकाद्या चित्रकाराभोंवतीं अनेक रंगांनीं भरलेलीं पात्रें पडलीं असतांना तो मधूनमधून एकाद्यास उगीच थोडासा स्पर्श करतो त्याप्रमाणें. " चित्रकाराशीं आपलें असलेलें हें साम्य मैत्रेयानें फार मार्मिकपणें बोलून दाखविलें आहे.

तसेंच वसंतसेनेच्या समृद्ध वाड्यांत असतां त्यानें आपल्या भोजनप्रियतेस अनुसरून पुढील मार्मिक विधानें केलीं आहेत. येथें विदूषकानें केलेल्या स्वैंपाकघराचें वर्णन फारच मजेदार आहे. तो म्हणतो, " येथें दरिद्री लोकांच्या तोंडास पाणी आणणारा हिंगाच्या खमंग फोडणीचा वास दरवळून राहिला

आहे. निरनिराळ्या पदार्थांतून निघणाऱ्या सुगंधी धुरानें नेहमीं उबलेला हा मुदपाकखाना खिडक्यांच्या तोंडानें जणों काय निःश्वासच टाकीत आहे. अहाहा, इकडे लाडू वळले जात आहेत, तर त्या बाजूस अनरशाचें तळण चाललें आहे. मला ब्राह्मणाला पुढील विनंति येथें कोणी करील काय ? ' भटजीबुवा, या, हातपाय धुवा व या सुग्रास अन्नाचे चार घांस खा. ' " येथील विदुषकाची भोजनप्रियता वसंतसेनेच्या वैभवाशीं जोडून सांगितल्यानें अधिक रमणीय झाली आहे.

तसेंच वसंतसेनेच्या वाड्यांतून परत आल्यावर वसंतसेनेच्या अनुदार वर्तनानें नाराज होऊन विदूषक चारुदत्ताजवळ पुढील तक्रार करतो. " अरे मित्रा, ती वेश्या इतकी लोभी कीं तिनें तूं मजबरोबर पाठविलेली रत्नावली खुशाल घेतली. गोडगोड बोलली पुष्कळ, पण रत्नावली ठेवून घ्यावयास तिनें कमी केलें नाहीं. व दुसरें असें की, इतकी श्रीमंतीण असूनहि नुसतें असेंहि म्हणाली नाहीं की, ' बाबा मैत्रेया, इतक्या लांबून आलास तर घटकाभर बैस. निदान एक घोटभर पाणी तरी पिऊन जा. ' " येथेंहि विदूषकानें आपली भोजनप्रियता तिच्या अनुदारतेशीं मिसळून सांगितल्यामुळें रमणीय वाटते. या उल्लेखाच्या शेजारीं बसविलें असतां कालिदासाच्या व भासाच्या नाटकांतील विदूषकाच्या भोजनप्रियतेबद्दल उल्लेख कमी प्रतीच्या विनोदाचे वाटतात. राण्यांकडून मोदकांचीं वाणें मिळण्याची आशा धरणें, चंद्रास अर्ध्या मोदकाची उपमा देणें, शृंगाराच्या औत्सुक्यास भोजनतृप्तीचा इलाज सांगणें वगैरे ठरीव प्रकार कालिदासानें केले आहेत. भासानें स्वप्नवासवदत्तांत तर आपल्या विदूषकाचें पोट बिघडलेलें दाखविलें आहे. तो म्हणतो, " वत्सराजाचें पद्मावतीशीं लग्न झाल्यावर माझी सर्व चंगळ चालली आहे. मी चांगला मऊ गाद्यांवर लोळतों, सुग्रास अन्न खातों. पण एक मोठें लचांड झालें आहे. मला अन्नच चांगलें पचत नाहीं. जगांत जेवणाचें सुख तर सर्व– पण माझें हतभाग्याचें पोट पार बिघडून गेलें आहे. "

विदूषकाची गणना राजाच्या सेवकवर्गांत होत असली तरी त्याला राजघराण्यांतील सर्व स्त्रीपुरुषांत वावरण्याची व कोणासहि वाटेल तसें बोलण्याची व वाटेल तसें वागण्याची मुभा असे. स्वतः राजाशीं सुद्धां तो फार

सलगी करतो. तो राजाला आपला प्रियमित्र मानतो. त्याला उपदेशाचे घोटहि पाजावयास कमी करीत नाहीं व विशेष विनोदाची गोष्ट म्हणजे तो कित्येक प्रसंगीं त्यास फार नाजूक प्रश्न बिन कचरतां विचारतो व कधीं कधीं मार्मिक शेरे मारून त्याची फजिती करण्यासहि मागेंपुढें पाहत नाहीं. अशा ठिकाणचा विनोद हा फार मोठ्या माणसाशीं फार लहान माणसानें अतिप्रसंग केल्यानें होतो. मोठ्या माणसाचे दोष दाखविणारा विरळा व ते दाखवावयाचे असले तरी काळवेळ पाहून व व्यवहारांतील इतर बंधनें पाळून एकाद्या शहाण्या प्रधानास दाखवितां येतील. पण राजेसाहेबांच्या नाजूक प्रेमाच्या बाबतींत तर कोणासच कांहीं बोलतां येत नाहीं. पण जेथें इतरांचा प्रवेश नाहीं तेथें विदूषकाचा असल्यामुळें तो कोणताहि आडपडदा न धरतां राजास व इतरांसहि त्यांचे त्यांचे दोष विनोदानें दाखवितो. म्हणून ( विशेषेण दूषयति अन्यान् ) त्यास विदूषक म्हटलें असावें. बरें तो बोलून चालून विदूषकच असल्यानें त्याचें बोलणें कोणी मनास लावून घेण्याचीहि जरूरी नाहीं. शेक्स्पिअरचे वेळींहि सर्व तऱ्हेची मुभा असलेले असलेच ( Allowed, chartered ) fools असत.

स्वप्नवासवदत्त नाटकांत विदूषकानें उदयन राजाला एक फार नाजुक पण खरा मार्मिक प्रश्न केला आहे. उदयनाची आवडती राणी वासवदत्ता अग्नींत भाजून मेली, त्यामुळें त्याला पद्मावतीशीं केवळ राजकीय कारणासाठीं लग्न करावें लागलें. मेलेल्या राणीवर त्याचें अतिशय प्रेम; व नवीन पत्नी पद्मावतीहि रूपादि गुणांनीं कांहीं कमी नव्हे. अशा परिस्थितींत विदूषकानें राजास असा सरळ प्रश्न विचारला कीं, "कायरे मित्रा, तुला वासवदत्ता आवडते कां पद्मावती ?" हें ऐकून राजास मोठें अवघड झालें. मृत पत्नीचें दुःख व नूतन भार्येचे रूपविनयादि गुण त्याच्या मनांत येऊन त्याला कांहींच उत्तर देतां येईना. राजास उत्तर द्यावयास वेळ लागलेला पाहून विदूषक त्यास म्हणतो, "अरे, तूं कांहींएक आडपडदा न ठेवतां खुशाल बोल कीं. दोघींपैकीं कोणाचीहि निंदा येथें करावयास तुला हरकत नाहीं. कारण एक मेली आहे, व दुसरी येथें नाहीं." ( **एका उपरता अपरा असन्निहिता ।** ) या सर्व प्रसंगाची खरी मौज अशी कीं, हें भाषण उदयनाची नवीन पत्नी आडून ऐकत आहे.

राजा ऐन अडचणींत सांपडला असतां त्याच्या त्या फजितीचे प्रसंगीं फार मार्मिक विनोद विदूषकानें ठिकठिकाणीं प्रगट केला आहे. अशा ठिकाणीं उत्तम प्रसंगनिष्ठ विनोद असून त्यांत विदूषकाच्या विनोदी भाषणानें मनोरम भर पडली आहे. मालविकाग्निमित्रांत तिसऱ्या अंकांत असा प्रसंग आहे कीं मालविका, धारिणीराणीच्या आज्ञेनें अशोक वृक्षास पादस्पर्शानें विकसित करण्यास आली आहे. याच प्रसंगीं बकुलावलिकेनें मालविकेचें मन राजाबद्दल अनुरक्त केलें आहे. प्रथमपासून तिजवर आसक्त असलेला राजा तेथें येऊन तिच्याशीं सलगीच्या गोष्टी करूं लागला आहे, व थोडासा रंगांत येऊन तो पुढील काव्यमय उद्गार काढतो, "हे मालविके, तूं त्या अशोक वृक्षास डाव्या पायाचा स्पर्श केलास, तसा या माझ्या देहाला करून तूं माझे मनोरथ पुरीव. अशोकास जशीं फुलें येत नाहींत तशीं या माझ्या देहालाहि सुखपुष्पें तुझ्या चरणस्पर्शाशिवाय येणार नाहींत!" राजाचे हे लवळपणाचे काव्योद्गार ऐकून आतांपर्यंत लपून असलेली इरावती राणी चवताळून बाहेर येते, व राजानें वापरलेलें अशोक वृक्षाचें रूपक पुढें चालवून ती मालविकेस म्हणते, "मालविके, पुरीव बाई राजाचे मनोरथ अगोदर. अशोक वृक्षाला तुझ्या स्पर्शानें फुलें येतील अथवा न येतील, पण ह्या चालत्याबोलत्या अशोक वृक्षाला फुलें हमखास येतील व त्याला फळेंहि धरतील." ह्या इरावतीच्या आकस्मिक आगमनामुळें सर्व मंडळी चोरासारखी उभी राहिली. इरावती मोठी तोंडाळ व फटकळ बाई होती. त्यांतून तिला मुद्देमाल सांपडलेला. अशा परिस्थितींत राजाची काय स्थिति झाली असेल याची कल्पनाच करावी. अशा ऐन अडचणीचे वेळीं विदूषक राजाला हळूंच एकीकडे म्हणतो, "अरे, कांहींतरी एखादें कारण शोधून सांग कीं तिला. एखादा चोर भिंतीस प्रत्यक्ष भोंक पाडीत असतांना जर पकडला गेला तर त्यानें खुशाल सांगावें कीं, 'मी कांहीं आतां प्रत्यक्ष चोरी करण्यासाठीं भोंक पाडीत नव्हतों. भिंतीस भोंक कसें पाडावें याचें शिक्षण घेत होतों.' अर्थात् अशा उत्तराचा कांहीं उपयोग होत नसला तरी अपराध्यानें बचावासाठीं कांहींतरी बोलत राहावें."

विक्रमोर्वशीयामध्येंहि असाच अडचणीचा प्रसंग कालिदासानें घडवून आणला आहे. येथें तर विदूषकाच्या हातांतून त्याच्या गबाळेपणामुळें गळून

पडलेली उर्वशीनें पाठविलेली भूर्जपत्रावरील प्रेमपत्रिकाच हातांत घेऊन राणी येते. राजाच्या उर्वशीवरील प्रेमाचा तो दस्तऐवजी पुरावाच. त्यामुळें राजास तिच्या माऱ्यापुढें स्वस्थ बसावें लागतें, व तो विदूषकास हळूंच विचारतो, "काय रे, राणीला आतां काय उत्तर द्यावें ?" यावर विदूषक म्हणतो, "आतां कसलें बोडक्याचें उत्तर देतोस ? मुद्देमालासहित सांपडलेल्या चोराला काय उत्तर देतां येणार आहे ?" ( **लोत्रेण गृहीतस्य कुंभीरकस्य अस्ति वा प्रतिवचनम् ।** ) इतकेंच केवळ बोलून तो स्वस्थ न बसतां राणीस म्हणाला, "राणीसाहेब, यांना जरा पित्तप्रकोप झाला आहे. तेव्हां हे कांहींतरी बोलत आहेत. तेव्हां तुम्हीं यांस प्रथम जेवावयास घालां पाहूं." अर्थात् असें बोलणें म्हणजे राजास अधिक अपराधी ठरविण्यासारखेंच होतें. हाच प्रकार रत्नावलीच्या तिसऱ्या अंकांत झालेला आहे.

विदूषक याप्रमाणें जशी राजाची फजिती करतो तशी इतरांचीहि म्हणजे राणी, प्रधान, सेनापति आणि पूज्य संन्यासिनी व घरांतील वडील माणसें असल्या व्यक्तींचीहि तो हजेरी घ्यावयास कमी करीत नाहीं. अशा मंडळींवरील विदूषकाची टीका कधीं त्यांच्या तोंडावर तर कधीं दुसऱ्या कोणाजवळ केलेली असते.

मालविकाग्निमित्रांतील दुसऱ्या अंकांत राजा प्रेक्षागारांत येऊन बसतो व मालविकेची नृत्यगीताची परीक्षा त्याचेसमोर व्हावयाची असते. अग्निमित्र मालविकेवर फारच भाळला असल्यामुळें तो तिजकडे पाहत असतां अगदींच वाहवेल व ही गोष्ट जवळच बसलेल्या राणीच्या ध्यानांत येईल म्हणून राजास सावध करण्यासाठीं व त्याच वेळीं राणीच्या होत असलेल्या अडथळ्याचेंहि वर्णन करण्यास विदूषकानें एकच लहानसें वाक्य उच्चारलें आहे. तो म्हणतो, "तुमच्या नयनास अगदीं हवे असलेले मधाचे थेंब आतां आपल्यासमोरच आहेत. पण ध्यानांत ठेवा, त्या मधाजवळ मधमाशीहि बसलेली आहे. तेव्हां म्हटलें, मधुपान करणें तें जरा खबरदारी राखून करा."

मालविकेच्या नाचण्यांत एक चूक झाली असें विदूषकानें म्हटलें. याचा उल्लेख व विदूषकानें तसें म्हणण्याचें कारण मागें येऊन गेलेंच आहे. विदूषकानें दाखविलेली चूक म्हणजे, त्या प्रयोगापूर्वी विदूषकासारख्या विद्वान् ब्राह्मणाची आरंभीं पूजा केली नाहीं ही होय. यावर परिव्राजिका त्यास खिजवून म्हणाली,

" वा, नृत्य–संगीत शास्त्रांतील अगदीं गाभ्यांतली चूक, विदूषका, तूं दाखवलीस." हें बोलणें विदूषकास लागलें. त्याचप्रमाणें शरदृतूंतील मेघांकडे पाहून पाण्याची आशा करणाऱ्या भोळ्या चातकाप्रमाणें त्याचीहि मोदकाची आशा नष्ट ाली . त्यानें किंचित् रुष्ट होऊन तो परिव्राजिकेसारख्या विदूषीस म्हणतो, "अहो अहंमन्य पंडिताबाई, दुसरें राहोच, साधें मोदक खाणेंदेखील तुम्हांस माहीत नाहीं. तर तुम्ही इतर ज्ञानाच्या गोष्टी काय सांगाव्या! केवळ आपल्या वयानें पांढऱ्या झालेल्या केसांमुळें तुम्ही लोकांस भीति दाखवितां येवढेंच काय तें."

शाकुंतलांतील माढव्य नांवाच्या विदूषकानें राजाचा शिकारीचा षोक वाढवून आपल्यास त्रास देऊं इच्छिणाऱ्या सेनापतीचाहि समाचार घ्यावयास कमी केलें नाहीं. सेनापतीनें दुष्यंताजवळ मृगयेची खूप तारीफ केली व त्याचा या बाबतींतील उत्साह वाढविण्याचा प्रयत्न केला. पण राजाला मात्र शकुंतलेवरील त्याच्या आसक्तीमुळें मृगयेची इच्छा राहिली नव्हती. तरीपण मृगयेच्या तर्फेनें बोलून राजाचें मन वळवूं पाहणाऱ्या सेनापतीस त्यानें पुढील टोमणा मारला आहे. "चल चालता हो. राजाला आतां शिकारीची भर देऊं नकोस. मृगया वाईट असते असें त्यास आतां वाटावयास लागलें आहे. कारण तो आतां मनाच्या स्वाभाविक स्थितींत आहे. पण मी तुला सांगतों, शिकारीसाठीं रानांत हिंडतां हिंडतां तूं मात्र एखादे दिवशीं माणसाचें नाक खाण्यास चटावलेल्या एखाद्या म्हाताऱ्या अस्वलाच्या तडाख्यांत सांपडणार खास!"

वसंतसेनेच्या वाड्याच्या चौकांतून फिरत असतां मैत्रेयानें वसंतसेनेचा भाऊ व तिची आई यांवर केलेली टीका विनोदाच्या दृष्टीनें अप्रतिम आहे. मैत्रेय वसंतसेनेच्या भावाचें पुढीलप्रमाणें वर्णन करतो. "काय गे चेटी, मारून रेशमी वस्त्रें अंगावर घेतलेला व तेच तेच दागिने अंगावर खच्चून ल्यालेला, अत्तराचे भपकारे सोडणारा व आढ्यतेनें झुलत झुलत चालणारा हा कोण बरें आहे?" चेटीनें तो वसंतसेनेचा भाऊ आहे असें सांगितल्यावर विदूषक म्हणतो, "काय बिचाऱ्यानें मागच्या जन्मीं तपाचरण केलें असेल म्हणून असल्या मूर्खाला वसंतसेनेचा भाऊ होतां आलें! याचा हा डामडौल व अलंकारभूषणाची वेडी हौस पाहिली म्हणजे हा स्मशानांतील चाफ्याच्या फुला–

प्रमाणें वाटतो." वसंतसेनेच्या आईचें वर्णन पुढीलप्रमाणें आहे. म्हातारपणींहि आंबटशोकीपणामुळें अंगावर फुलांचें प्रावरण घेऊन पायाला मारून तेल चोपडून उच्चासनावर बसलेल्या त्या स्थूल व विशालोदर बाईला पाहून तो म्हणतो, "अहो या डाकिनीच्या पोटाचा काय हा विस्तार? इच्या या विशाल देहाकडे पाहिलें म्हणजे मला असें वाटतें कीं जशी एकादी महादेवाची प्रचंड मूर्ति प्रथम स्थापन करून नंतर तिच्यावर देऊळ किंवा त्या देवळाचे दार तरी बांधतात (कारण बांधलेल्या लहानशा दारांतून ती आंत जाण्यासारखी नसते), त्याप्रमाणें हिला प्रथम आंत बसवून मग हें घर बांधलें कीं काय?" यावर चेटी मैत्रेयास म्हणते, "अरे, या आमच्या आईसाहेबांची अशी थट्टा काय करतोस? हल्लीं त्यांना चातुर्थिक हिंव लागलें आहे ना?" या माहितीनें मैत्रेयाच्या विनोदास अधिकच भर येऊन तो म्हणतो, "अरे भगवाना चातुर्थिक हिंवा, तूं लागल्यामुळें जर या बाईसारखीच तब्बेत राहणार असेल तर, बाबा! तो उपकार तूं या गरीब ब्राह्मणावर कां करीत नाहींस?" यावर थोडीशी रागावून चेटी म्हणते, "मेल्या, मरत कसा नाहींस लवकर असा बोलतोस तो." त्यावर हंसून विदूषक म्हणाला, "ए पोरी, मी मरण्यापेक्षां ही ढेरपोटी बाई मेली तर अधिक बरें होईल. कारण नेहमीं आसवें, दारू व इतर पेयें पिऊन तुझी ही बाईसाहेबच त्या अवस्थेला आतां आली आहे. आणि सुदैवानें ही जर आतां चचेल तर शेंकडों कोल्ह्यांना चांगलीच मेजवानी होईल."

संस्कृत नाटकांत वर्णिलेले नायक बहुधा सर्व उत्कट वृत्तीचे असतात. कांहीं मोठ्या उदात्त विचाराचे, तर कांहीं पराक्रमी व साहसी, कांहीं प्रेमानें रंगलेले व त्यामुळें सबाह्य अभ्यन्तर काव्यमय बनून राहिलेले, कांहीं भोगी तर कांहीं त्यागी असेहि आढळतात. या गुणांना अनुसरून त्यांना धीरोदात्त, धीरप्रशांत व धीरललित अशा संज्ञा आहेत. ते सर्व उच्च दर्जाचे, खानदानीचे व उच्च आचारविचाराचे आहेत. हा समाजाचा वरचा थर झाला. याचे आचारविचार, चालचलणूक अगदीं खालच्या थरांतील लोकांना समजूं शकत नाहीं व त्यामुळें ते तिचें रसग्रहणहि करूं शकत नाहींत. थोरांच्या वृत्तीचा नाजुकपणा, मनांत एक तर दरबारी रिवाजाप्रमाणें दुसरेंच दाख-

विण्याची हातोटी, वगैरे नागर वागणूक ( refinement ) त्यांना समजत नाहीं. यासाठीं त्या थोरपणाच्या उत्कट वर्तनाचें सामान्य माणसास पटण्यासारखें व रुचण्यासारखें रूप विदूषक नेहमीं करून मांडतो. त्यामुळें थोर विचाराला लघुत्व आणणारें त्याचें ग्राम्यीकरण झालें कीं त्यांतील विसंगतिदर्शनानें एकीकडे विनोद उत्पन्न होतो व दुसरीकडे प्रेक्षकांतील सामान्य समुदायाचें समाधान होतें. नागानन्दांतील नायक जीमूतवाहन हा राज्य टाकून देऊन अरण्यांत वडील-मातोश्रीची सेवा करण्यांतच आनंद मानतो. आतां सामान्य माणसांच्या दृष्टीनें केवढा हा मूर्खपणा ! कारण यांतील ध्येयवाद ( idealism ) त्यांना कळतच नाहीं. तेव्हां सहजच विदूषकाच्या तोंडीं या ध्येयवादाची उघडी व्यावहारिक बाजू ( naked practical side ) घातलेली असते. तो त्यास सरळ म्हणतो, "कायरे मित्रा, या जिवंत असून मेल्याप्रमाणें झालेल्या तुझ्या बुद्रुक आईबापांच्यासाठीं अरण्यवास पत्करून राहण्याचा तुला कंटाळा नाहीं आला ? म्हणे त्यांच्या पायाची सेवा करतो ! सोड तें सारें व राज्यसुखाचा खुशाल अनुभव घे कसा ! !"

जसें "वदनकमल, वदनकमल म्हणतां त्याचा अर्थ थोबाडच ना ?" किंवा "पदकमलें म्हणजे आमच्या त्या तंगड्या ना ?" असें म्हणणारे अडाणी शब्दालंकाराची नागर ओढणी दूर करून वस्तुज्ञानाला धसमुसळेपणें भिडूं पाहतात, तसाच हा नाजूक वृत्तीशीं त्यांनीं केलेला प्रकार आहे.

चारुदत्त दारिद्र्यांतहि यमनियम, व्रतवैकल्य सोडीत नाहीं. कर्तव्य म्हणून करीत राहतो. त्यास मैत्रेयहि सरळ विचारतो, "मित्रा ! इतकी पूजा घेऊनहि जे तुजवर प्रसन्न होत नाहींत त्या देवांना नैवेद्य ठेवावयास मी साफ जाणार नाहीं. त्यांची काय म्हणून पूजा करावयाची ? तूं आपला दुसऱ्या कोणाला पाठव."

शर्विलक चोर घरफोडी करून गेला याचें वाईट वाटण्यापेक्षां अति साधुवृत्तीच्या चारुदत्तास विषाद वाटतो तो, "चोर बिचारा हात हालवीत किं हो गेला. तो आपल्या स्नेह्यासोबत्यांना आतां काय बरें सांगेल ? चारुदत्ताच्या घरीं गेलों व मला कांहींच मिळालें नाहीं म्हणेल तो." या विचारानेंच. हे विचार एक प्रकारें उदात्तपणाचे आहेत. त्याची उघडी व्यावहारिक बाजू विदूषक दाखवितोः

तो म्हणतो, " वाः ! तूं त्या चोराबद्दल वाईट वाटून घेतोस होय ? "

यापुढचा प्रसंग तर फारच सूचक आहे. आपल्या घरचे वसंतसेनेनें ठेवलेले दागिने चोरीला गेले असें कळल्यावर चारुदत्ताला फार वाईट वाटलें. तो म्हणाला, " मी दरिद्री झालों म्हणून मीच ते दागिने दाबून ठेवून चोरीची नसती भूमका उठविली असें 'मला लोक म्हणतील व माझें सत्त्व जाईल." व या विचारानें तो एकदम मूर्च्छित पडला. ही चारुदत्ताची सत्त्वस्थ तत्त्व-निष्ठेची सीमा कवीनें दाखविली. पण त्यावर व्यावहारिक वृत्तीचा मैत्रेय काय म्हणतो ऐका :—

" अरे, कांहीं काळ ठेव म्हणून ठेविलेले दागिने चोरानें नेले म्हणून तुला मूर्च्छा यायला काय झालें ? त्यांत तुझ्यावर कसला आळ येतो ? व पुन्हा आपल्याला असेंहि म्हणतां येईल कीं, ' कोणीं ठेव ठेवली ? कोणीं पाहिली ? साक्ष कोणाची ? ' "

विदूषक जन्मानें उच्चवर्णीय ब्राह्मण. पण तो विद्वत्ता, ब्राह्मणोचित आचार, निःस्पृहपणा इत्यादि गुणांनीं शून्य असल्यानें त्याची हास्यास्पदता अर्थात् अधिक होई. म्हणून ब्राह्मणाचे जेवढे 'म्हणून दोष मार्मिकपणें व विनोदानें दाखवितां येतील तेवढे संस्कृत नाटकांतून दाखविले आहेत. समाजांत पूज्य मानलेल्या वर्गाचें व व्यक्तींचें मार्मिक दोषदर्शन लोकांना नेहमींच विनोदाचा मोठा रोचक विषय असतो. 'अविमारकां'तील विदू-षकास दासीनें अज्ञानी म्हटल्यानें त्यानें आपण बौद्ध नसून वैदिक ब्राह्मणच आहोंत असें सांगितलें. तसेंच "वेळ पडल्यास यज्ञोपवीत दाखवून मी ब्राह्मण आहें असें म्हणेन व अंगावरील चीवरानें मी बौद्ध आहें असें भासवीन " असें तो म्हणतो. ब्राह्मणांचा सारा उद्योग म्हणजे परान्न आकंठ जेऊन खुशाल घोरत पडावयाचें. हें सुचविण्यास मृच्छकटिकांतील मैत्रेयानें चवथ्या अंकांत वसंतसेनेच्या देवडीवाल्याला अशा ब्राह्मणाची उपमा दिली आहे.

**" श्रोत्रिय इव सुखोपविष्टो निद्राति दौवारिकः । "**

तसेंच पूर्वीं ब्राह्मण ( विशेषतः वैदिक ) यांस लिहितां वाचतां येत नसे, व पाठ केलेल्या वेदाचा अर्थहि नीट समजत नसे. यावर अविमारकांत पुढील विनोद केला आहे. चन्द्रिका नांवाच्या दासीस विदूषक म्हणतो,

"ज्याला वाचावयास येतें असा ब्राह्मण मी आहें. कारण '**ब्राह्मणो दुर्लभोऽक्षरज्ञोऽर्थज्ञः ।**' " यावर ती आपली अंगठी त्यास दाखवून म्हणते, "असें असेल तर हीं अक्षरें वाच पाहूं." त्यावर विदूषक तिला म्हणतो, "मला अक्षरओळख आहे खास. परंतु ज्या पुस्तकांवरुन मला अक्षरओळख झाली त्यांतलीं हीं अक्षरें नाहींत." (**एतदक्षरं मम पुस्तके नास्ति ।**) वैदिक ब्राह्मणांना लिहितां आलेंच तर तें गिचमिड असावयाचें,* तें दुसऱ्यास वाचतां यावयाचें नाहीं, अशी कबुली मुद्राराक्षसांत खुद्द चाणक्यानें मौजेनें दिली आहे. तेथें चाणक्य म्हणतो, "शिष्या, एक चांगला कायस्थ लेखक बघून आण. कारण किती प्रयत्नपूर्वक लिहिलें तरी ब्राह्मणाचें अक्षर हें कोणास लागावयाचें नाहींच." (**श्रोत्रियाक्षराणि प्रयत्नलिखितान्यपि नियतं अस्फुटानि भवन्ति ।**) विद्धशालभञ्जिकेंत विदूषकानें मौनव्रत धारण केलें होतें, म्हणून त्यानें आपलें म्हणणें राजास जमिनीवर लिहून दाखविलें. तें कसलें राजास समजणार ? म्हणून राजा विदूषकास म्हणतो, "अरे, मी अठरा लिप्या जाणणारा आहें, पण तुझ्या या लिपीपुढें आपण हात टेकले बुवा !"

श्रीहर्षाच्या नागानन्द नाटकांतील विदूषकानें केलेला विनोद ठराविक सांच्याचा व साधारणच आहे. तथापि तिसऱ्या अंकांत एक विनोदी प्रसंग वर्णिला आहे, व त्यांत विदूषकाचा विनोद बराच चांगला आहे. वेष पाल-

---

*जुन्या काळच्या वैदिक ब्राह्मणाचें लिहिणें व वाचणें यांच्याशीं किती सरळ होतें यासंबंधीचें एक मोठें विनोदी सुभाषित आहे. तिघी पतिव्रता आपापल्या पतींच्या लिहिण्यावाचण्यांतील कौशल्याची तारीफ पुढीलप्रमाणें करीत आहेत—

**चतुरः सखि मे भर्ता यल्लिखितं तत् परो न वाचयति ।**
**न वाचयति परलिखितं, स्वयमपि लिखितं स्वयं न वाचयति ॥**

पहिली स्त्री म्हणते, "आमच्या घरच्या पुरुषांच्या लिहिण्यांत असें चातुर्य आहे कीं, यांनीं जें काय लिहिलें असेल तें दुसऱ्यास मुळींच उलगडावयाचें नाहीं." दुसरी म्हणते, "आमच्या घरची स्थिति वेगळी. त्यांना दुसऱ्याचें अक्षर लागत नाहीं." तें ऐकून तिसरी म्हणाली, "हात्तेच्या, येवढेंच ना ? आमच्या स्वारीची तऱ्हा या सर्वांहून और आहे. तिकडे मुळीं स्वतःच लिहिलेलें स्वतःला वाचतां येत नाहीं !!"

टल्यानें व गैरसमजामुळें, येथील बिचाऱ्या विदूषकास खर्चीं घालून केला आहे. शेखर नांवाचा एक विट नवमालिका नांवाच्या दासीवर अनुरक्त असून तिची गांठ घेण्यासाठीं दारू पिऊन धुंद होऊन जात आहे. त्यानें भडक वेष केला आहे व खांद्यावर दारूचा हंडा भरून घेतला आहे. तो म्हणतो, "जो दररोज दारू पितो, व आपल्या प्रियकरणीचें सहवाससुख भोगतो ते दोघेहि देवच. एक बलदेव, ( बळराम याला दारूचा फार नाद असे ) व दुसरा कामदेव." असें बडबडत झिंगलेली ही स्वारी झोंके खात उद्यानांतून चालली आहे. इतक्यांत विदूषक हातांत राणीकडून मिळालेलीं दोन रेशमी वस्त्रें घेऊन प्रवेश करतो. तोंच त्याच्या अंगावर भुंग्यांचा थवाच्या थवा येऊन बसतो. भ्रमर आपल्या अंगावर कां बसावेत याचें कारण प्रथम त्यास कळेना, पण लगेच त्यानें आपल्याच अंगाचा वास घेऊन पाहिला व याच्या ध्यानांत आलें कीं, हा राजाचा मित्र म्हणून राजाच्या लग्नांत, राजाच्या मेहुण्यांनीं याच्या अंगाला खूप उटणीं आणि सुगंधी द्रव्यें चोपडलीं होतीं. व म्हणून तो म्हणतो, "त्या माझ्या आदरामुळेंच हा अनर्थ ओढवला." भ्रमरांच्या दंशनिवारणार्थ त्यानें हातांत असलेल्या रेशमी वस्त्रानें आपलें तोंड झांकलें व अंगावरहि दुसरें वस्त्र घेऊन तो चालूं लागला. त्या बुरखेवाल्या व्यक्तीस पाहिल्यावर झिंगलेल्या शेखरास वाटलें ही आपलीच नवमालिका, आपल्याला यावयास उशीर झाला म्हणून रागावून चालली आहे. असा विचार करून तो तिला धरावयास पुढें होतो. या ब्राह्मण विदूषकाला शेखरच्या तोंडाची घाण असह्य होऊन तो त्यास दूर लोटूं लागतो, तों तों शेखरास वाटतें कीं आपली नवमालिका आपणांवर फारच रागावली आहे. म्हणून तो तिचे पाय धरूं लागतो. एवढ्यांत खरी नवमालिका खरेच तेथें येते, व आपला प्रियकर शेखर दुसऱ्या एका स्त्रीशीं लगट करीत आहे असें समजून रागावते. पण या विदूषकास नवमालिका समजून शेखर तसें वर्तन करीत आहे असें विदूषकाच्या बोलण्यावरून तिनें ताडलें. तरी रागाचा उसना आव आणून तिनें शेखरास दरडाविलें, "कोठल्या स्त्रीशीं ही लगट तुम्हीं चालविली आहे ?" इतक्यांत विदूषक आपणच म्हणतो, "अहो माझ्याशीं !!" विदूषकानें मुद्दामच ही आपली थट्टा केली असें वाटून शेखर त्यालाच शिव्या देतो व आपल्या चेटास सांगतो

कीं, " या भटजीला धरून ठेव. " विदूषक पळून जाऊं लागतो, पण चेट त्याला तुटलेल्या यज्ञोपवीतानें धरून ठेवितो. विदूषक हा राजाचा मित्र म्हणून यापुढें त्याची थट्टा थांबविण्यांत येते आणि त्याचा व नवमालिकेचा सन्मान विट व चेट त्यांस दारूचे पेले देऊन करतात. नवमालिका दिलेला मद्याचा पेला गट्ट करते, पण विदूषक तोंड वेंडेंवांकडें करून म्हणतो, " अरे, मी ब्राह्मण आहें. " यावर विट त्यास म्हणतो, " तूं ब्राम्हण तर तुझें जानवें कोठें आहे ? " विदूषक आपल्या गळ्यांत यज्ञोपवीत पाहूं लागतो, तों तें तुटून पडल्यामुळें त्यास सांपडत नाहीं. तेव्हां विट त्यास म्हणतो, " निदान वेदाक्षरें तरी म्हण पाहूं. " यावर विदूषक म्हणतो, " या तुमच्या दारूच्या घाणीमुळें तीं आतां आंत घट्ट बसलीं. तीं वर यावयाचीं नाहींत. " यापुढें स्नान करून विदूषक आपल्या कामास निघून जातो.

याच अंकांत प्रत्यक्ष नायक–नायिकेच्या समक्ष विदूषकास फसवून एका दासीनें त्याच्या तोंडास काळा रंग फासून त्याची थट्टा केलेली आहे. या शांत व करुणरसप्रधान नाटकांत थोडी थारेपालट पाहिजे म्हणून वरील थोडा कृत्रिम विनोदाचा प्रसंग मुद्दाम घातलेला दिसतो.

वर दर्शविलेल्या विदूषकाच्या कांहीं स्वभावविशेषांतून स्वभावनिष्ठ विनोद कसा निर्माण झाला आहे तें दाखविलें. तसेंच विदूषकामुळें घडून आलेल्या विनोदी प्रसंगांनीं प्रसंगनिष्ठ विनोद ( Humour of situation ) कसा निष्पन्न झाला तेंहि पाहिलें. आतां विदूषकाच्या बोलण्यांत कांहीं वेळां ज्या चमत्कारजनक विनोदी उपमा व समाजावर विनोदी टीका वगैरे प्रगट होतात त्यामुळें उत्पन्न होणारा कल्पनानिष्ठ किंवा शब्दनिष्ठ विनोद पाहूं.

विद्धशालभञ्जिकेंतील चारायण नांवाच्या विदूषकानें प्रेमवेड्या राजास व्यावहारिक शहाणपण पुढील विनोदी म्हणींनीं शिकविलें आहे. राजाला स्वप्नांत एक अत्यंत रूपवती स्त्री दिसली. तिच्यावर तो इतका भाळला कीं, आपल्या वर्तनानें आपल्या राणीचें मन दुखविलें जात आहे याचें त्यास भानच राहिलें नाहीं. या प्रसंगीं विदूषक राजास म्हणतो, " स्वप्नांतल्या स्त्रीच्या मागें लागून लग्नाची बायको कशी तूं दवडतोस ? तें तुझें वर्तन '**नटे दृष्टे मण्डिते उपविष्टः पतिर्मुण्डितः**' या म्हणीप्रमाणें झालें. म्हणजे

एका बाईला एक मोठा सुरूप व अलंकारांनीं नटलेला नाटकांतील नट दिसला म्हणून त्याच्यावर भाळून तिनें आपल्या हक्काच्या घरच्या पतीला त्याचें मुंडण करून विद्रूप केलें. त्यामुळें नट तर मिळायचा नाहींच व नवराहि नाखूष, त्यामुळें तिची ‘ तेलहि गेलें तूपहि गेलें, व धुपाटणें हातीं आलें ’ यासारखी स्थिति झाली. ” तसेंच, ‘ आज मिळणारी तित्तिरीपक्षीण पुरवली, पण उद्यां प्राप्त होणारी मयूरी नको. ’ ( **वरं तत्कालोपनता तित्तिरी न पुनर्दिवसान्तरिता मयूरी ।** ) हीहि म्हण याच प्रसंगीं वापरली आहे.

सदर विदूषकाची थट्टा करण्यासाठीं राणीनें त्याचें लग्न एका बन्धुलाशीं ( एक स्वैरवर्तनी छाटका पोऱ्या ) लावावयाचें योजिलें व त्यास लग्नाच्या पोषाखानें सजविलें. त्या वेषांत त्यास पाहून राजानें विचारलें कीं, “ हें रे काय ? ” त्यावर तो म्हणतो, “ राणीसाहेब आज आमचें लग्न करणार आहेत. ” “ पण मुलगी कोण व कोणाची ? ” असा प्रश्न राजानें केला. त्यावर त्या थट्टेच्या प्रकाराचा वास या धूर्त विदूषकास अगोदरच असल्यानें तो तिचें पुढील वर्णन करतो:—

“ आमच्या श्वशुरांचें नांव शशशृंग, आमच्या सासूबाई मृगतृष्णिका-काकू व त्यांचें कन्यारत्न ‘ अम्बरमाला ’ ( आकाशपुष्पांची माला ) हें आमचें कुटुम्ब ! ! ”

राजास एकदां अचानक ऐकूं आलेले शब्द कोणीं उच्चारले व त्याचा अर्थ काय असा घोंटाळा पडला. त्यावर विदूषक एकदम त्यास म्हणतो, “ अरे, शेंडी बांध. ही आकाशवाणी आहे. तुम्हां पंडित लोकांचें असेंच आहे. साध्या गोष्टींत भलभलत्या कल्पना लढवून तुम्ही अर्थाचा अनर्थ करतां व अखेरीस या काथ्याकुटीचें तुम्हांस काय मिळालें म्हणावें, तर भोंपळयाएवढें पूज्य ! त्यापेक्षां मग आमच्यासारखे मूर्खच पुरवले. ” या अर्थाच्या त्यानें पुढील दोन विनोदी उपमा दिल्या आहेत: “ पंडित हे भांबावलेल्या माकडाप्रमाणें आहेत. त्यांस आपल्या भ्रमांत फळांची विस्मृति पडते व मूळहि गवसत नाहीं व मग ते केवळ हातांत पानें धरून बसतात. ( **पण्डिताः खलु अलीकविकल्पैः विस्मृतफलाः इव मर्कटाः मूलं अलभमानाः प्रल्लवग्राहिणो भवन्ति ।** ) पण आम्ही मूर्ख मात्र फणसाचीं झाडें राखणाऱ्या माळयाप्रमाणें आहोंत. आमचें सारें लक्ष मूळावर असल्यामुळें

आम्हांला तेथेंच फळहि मिळतें." (**मूर्खाः पुनः पनसवनपालकाः इव मूलं अनुसरन्तः फलं प्राप्नुवन्ति ।**) मूलग्राही व पल्लवग्राही पाण्डित्य या दोन शब्दांनीं सूचित झालेल्या रूपकाचा हा किती मनोहर विस्तार केला आहे पहा. त्याचप्रमाणें पाण्डित्यावरील सदर टीकाहि मोठी मार्मिक आहे.

मृच्छकटिकांतील मैत्रेय विदूषक चारुदत्तास म्हणतो आहे कीं, "देवतांना नैवेद्य ठेवून येण्यास मी चव्हाट्यावर जाणार नाहीं. कारण मी दुर्दैवी ब्राह्मण. माझ्या बाबतींत नेहमीं सुलटें असलें तरी उलटें होतें." यास त्यानें पुढील विनोदी उपमा दिली आहे: "जसें आरशांतील आपल्या प्रतिबिंबांत डावी बाजू उजवीकडे व उजवीडावीकडे दिसते त्याप्रमाणें."

अविमारकांतील विदूषकानेंहि अशीच एक चमत्कारिक उपमा योजिली आहे. तो म्हणतो, "ह्या दासीच्या मागें मला धांवतां येत नाहीं. माझे पाय तेथल्या तेथेंच पडत आहेत. जसें एकाद्याच्या मागें स्वप्नांत हत्ती लागावा व त्यास पळतां येऊं नये तसें माझें झालें आहे." (**मम पादौ स्वप्ने हस्तिना आसाद्यमानस्य इव तत्र तत्र एव पततः ।**)

मृच्छकटिकांतील मैत्रेयानें वाऱ्याच्या झोतांत फुरफुरणाऱ्या दिव्याच्या ज्योतीला पुढील उपमा दिली आहे: "यज्ञस्तम्भाजवळ मारण्यासाठीं आणलेल्या बोकडाच्या हृदयाप्रमाणें वाऱ्यामध्ये त्या दिव्याची ज्योत फुरफुरत आहे." तसेंच विदूषकाच्या हातांत असलेल्या वांकड्यातिकड्या दांडक्याला, मृच्छकटिकांत व विद्धशालभञ्जिकेंत कुटिलता किंवा वांकडेपणा हा समान धर्म कल्पून कधीं दुर्दैवी लोकांच्या वांकड्या नशिबाची, कधीं दुष्ट लोकांच्या वांकड्या हृदयाची, तर कधीं रागावलेल्या स्त्रियांच्या वांकड्या भुव्यांची उपमा दिलेली असते. दारिद्र्यामुळें आपल्या घरच्या दिव्यांत तेल नाहीं, ही गोष्ट दीपिकांना वेश्यांची उपमा देऊन विदूषक पुढीलप्रमाणें सांगत आहे: (**ताः खलु अस्माकं प्रदीपिकाः अपमानितनिर्धनकामुकाः इव गणिकाः निःस्नेहा इदानीं संवृत्ताः ।**) आपल्या प्रियकरावर एकदां प्रेम करणाऱ्या वेश्या त्याचें जवळची सम्पत्ति नाहींशी झाली म्हणजे त्याचा अपमान करून त्यास घालवून देतात व आपल्या प्रियकरावरील आपल्या स्नेहाचा बिंदुहि (निस्नेहः) ठेवीत नाहींत. त्याप्रमाणें दारिद्र्यामुळें आमच्या दीपिकेंत तेल

( स्नेह ) राहिलें नाहीं. येथे दाखविलेलें साधर्म्य विनोदी असूनहि त्यांत ' स्नेह ' शब्दावरील श्लेषानें शब्दनिष्ठ विनोदाची भर पडली आहे.

तसेंच मृच्छकटिकाच्या चवथ्या अंकांत विदूषक वसन्तसेनेच्या वाड्याचें वर्णन करीत आहे. तेथील पशुपक्ष्यांना त्यानें दिलेल्या विनोदी उपमा या दृष्टीनें अत्यन्त रमणीय आहेत. फुसफुसणाऱ्या रेड्यास अपमान झालेल्या कुलीन गृहस्थाची उपमा दिली आहे. तसेंच ' कुरकुर ' शब्द करणाऱ्या सारिकेला डोक्यावर चढून बसलेल्या व कुरकुर करणाऱ्या गृहदासीची उपमा दिली आहे.

ज्या ज्या नाटकांत विदूषक आहे त्या त्या नाटकांतील विदूषकाशीं संबंध असलेला बहुतेक विनोद विदूषकाच्या गुणदोषाच्या सूत्रांत ओवून आतांपर्यंत सांगितला. विदूषकाव्यतिरिक्त विनोद बहुतेक नाटकांत नाहींच. याला पहिला अपवाद मृच्छकटिक होय.

मृच्छकटिकांत विदूषकाखालोखाल विनोदी पात्र शकाराचें आहे. या पात्राचें सर्वच कांहीं और आहे. परस्परविरुद्ध दोषांचें तें एक अभिनव मिश्रणच शूद्रकानें निर्मिलें आहे. शकार जितका धीट व उलट्या काळजाचा दिसतो तितकाच तो भेंकडहि आहे, जितका आचरट व मूर्ख भासतो तितकाच तो हिकमत्या व पाताळयंत्री आहे. तो जितका घमेंडखोर तितका लाचारहि आहे. तो जितका रानदांडगा तितका गुलहौशी रंगेलहि आहे. आपल्या जन्मजात दुष्टपणावर विनोदी वृत्तीचें आवरण तो घालतो. त्यामुळें त्याच्या विनोदांत मनुष्यद्वेषाची (cynical) छटा सर्वत्र आहे. त्याला माणसें किड्यामुंगीसारखीं वाटतात. त्याचा आचरटपणा सहेतुक असतो. त्यांत तो आपल्या दुष्ट सामर्थ्याची जाणीव पदोपदीं दाखवीत असतो. हॅम्लेटनें जसें सोईसाठीं वेडेपण घेतलें तसें त्यानें सोईसाठीं विनोदाचें पांघरूण घेतलें आहे. नीरोला रोम पेटलेलें पाहून जसें सैतानी हंसें कोसळलें, किंवा मान कापलेली मेंढी तडफतांना पाहून जशी एकाद्या निर्दयाची करमणूक व्हावी तशी दुसऱ्याच्या अपमानानें, हालानें व मृत्यूनें याच्या आनंदाला उकळ्या येत असतात. एखाद्या बोक्यानें उंदराच्या पोरास जसें तीक्ष्ण पंजांनीं ओरखडे काढून खेळवावें तसा तो बौद्धभिक्षूंशीं तिखट

विनोदानें खेळत आहे ( अंक ९). भर कोर्टांतहि " आम्ही कोठेंहि बसूं." येथें 'बसूं' असें म्हणून तो न्यायाधिशाच्या डोक्याकडे जो हात दाखवतो तो आचरट किंवा वेडा म्हणून नव्हे तर त्यास आपल्या सामर्थ्याची पुरी जाणीव असून 'मी वाटेल तें करीन' या बुद्धीनें वागणारा व इतरांचा उपमर्द करणारा तो दुष्ट आहे म्हणून. जो आपल्या शत्रूचा वध झालेला पाहील त्याला कधीं रांजणवाडी ( नेत्ररोग ) होत नाहीं म्हणून तो आनंदानें चारुदत्ताचा वध पाहावयास आलेला आहे. त्याच्या कारस्थानांत आयागोचा खुनशीपणा व वर्तनांत फॉल्स्टाफचा मूर्खपणा आहे. 'शीर्ष-मस्तक', 'नर-पुरुषमनुष्य', 'शकुनिखगविहङ्ग' अशी शब्दाची द्विरुक्ति करणें, 'श' वर्ण शक्य तेथें घालणें, "गाडी आली ? बैलहि आले ? तूंहि आलास ?" असें आपल्या चेटास विचारणें, जटायूनें वालीची बायको ओढली, रावण कुंतीच्या मागें लागला अशी बालिश बडबड करणें, इत्यादि प्रकारें तो विनोद किंवा आचरटपणाच करतो. त्यामुळें अगदीं हलक्या दर्जाच्या प्रेक्षकांची करमणूक होत असेल. तसा भाग विदूषकाच्या वर्तनांत व बोलण्यांत थोडासा ठेविलेला असतो तो याच हेतूनें. सर्व दर्जाच्या लोकांना संतुष्ट करणें हें नाटककाराचें कामच आहे.

वरील आचरट विनोदापेक्षां थोड्या बऱ्या प्रकारचा कल्पनानिष्ठ विनोदहि शकार करतो. अन्धेरांत वसन्तसेना एकदम नाहींशी झालेली पाहून तो म्हणतो, " अरे विटा, उडदाच्या राशींत शिरलेल्या काजळाच्या गोळी-प्रमाणें वसन्तसेना अन्धकारांत नाहींशी झाली ! " तसेंच ती पुढें गेली असतांना तिच्या अंगावरील पुष्पमालांचा वास व तिच्या पायांतील पैंजणांचा आवाज यांचें ज्ञान त्याला होत होतें. त्यास अनुसरून तो म्हणतो, " मला तिच्या पुष्पमालांचा वास ऐकूं येत आहे, पण माझ्या नाकपुड्या अंधारानें भरल्या असल्यामुळें मला तिच्या पैंजणांचा वास स्पष्टपणें येत नाहीं. " विट हा सुशिक्षित ब्राह्मण असल्यामुळें त्याच्या उपमा व वर्णनप्रकार हा शकाराच्या असंस्कृत वाणीपेक्षां केव्हांहि आल्हाददायक वाटतो. शकारानें स्वतः-साठीं वापरलेल्या उपमा त्याची हीन संस्कृति दाखविणाऱ्या व त्यास कमी-पणा आणणाऱ्या असल्या तरी त्याची त्याला दिक्कत नाहीं. " कुत्रे व कुत्र्या भोंकत मागें लागल्या असतां जसा एखाद्या गांवांतून कोल्हा पळत सुटावा

त्याप्रमाणें मी आपल्या घरीं जातों " असें तो ऐटीनें म्हणतो. त्याच्या भीषण विनोदाचें आणखी एकच उदाहरण देऊन आपण शकाराची रजा घेऊं. शकार आचरटपणानें गातो. त्यावर विटानें त्यास " आपण गन्धर्व केव्हां झालांत ? " म्हणून विचारलें. तेव्हां त्यानें उत्तर केलें, " अरे, मी गन्धर्व कसा नाहीं होणार ? मी घसा साफ होणारीं सर्व औषधें, हिंगूळ, सुंठगूळ, मिरें इत्यादि फस्त केलीं आहेत व वर कोकिळेचें मांसहि खाल्लें आहे, तेव्हां माझा स्वर मधुर कसा होणार नाहीं ? "

शकारानंतर उत्तम स्वभावनिष्ठ विनोद दर्दुरकाच्या पात्रांत सांपडतो. दुसऱ्या अंकांतील द्यूतकाराचा सबंध प्रवेशच अत्यंत विनोदी आहे. संवाहक नांवाच्या एका जुगाऱ्याच्या मागें माथुर व द्यूतकर असे दोंन जुगारांच्या अड्यांतील अधिकारी लागले आहेत. कारण संवाहक हा दहा सोन्यांचीं नाणीं हरला, पण जिंकणाऱ्यांना देण्यास त्याच्याजवळ पैसा नसल्यामुळें तो पळून जाऊं लागला. पळतां पळतां तो एका देवीच्या देवळांत शिरून देवीच्या जागीं निस्तब्ध उभा राहतो. पण हीहि त्याची युक्ति विफल होऊन अखेरीस तो त्या अधिकाऱ्यांच्या हातीं सापडतो. ते निष्ठुरपणानें त्यास मारीत असतात. इतक्यांत वर सांगितलेला दर्दुरक मोठया ऐटींत प्रवेश करतो. दर्दुरक हाहि एक लफंग्या बनलेला जुगारीच आहे. संवाहकाला माथुर आणि द्यूतकर मारीत असतांना त्यानें संभावितपणाची ऐट आणली व तो त्या भांडणांत शिष्टाई करण्यास पुढें सरसावला. प्रथम या दर्दुरकानें द्यूतास त्रिनसिंहासनाच्या राजाची दिलेली उपमा फारच विनोदी आहे. त्याचप्रमाणें द्यूताच्या नादानें आपण निष्कांचन कसें बनलों व संसारांतून कसें उठलों याचें वर्णन त्यानें ' त्रेताहृतसर्वस्व... ' या श्लोकांत सुंदर तऱ्हेनें केलें आहे. तसेंच त्यानें आपल्या अंगावर घेतलेल्या वस्त्राचें वर्णन अत्यंत विनोदी असल्यानें तसेंच्या तसेंच देणें बरें.

अयं पटः सूत्रदरिद्रतां गतो
ह्ययं पटश्छिद्रशतैरलङ्कृतः ।
अयं पटः प्रावरितुं न शक्यते
ह्ययं पटः संवृत एव शोभते ॥

तसेच पैसे बुडविल्यामुळें द्यूतकारांच्या हातचा मार यानेंहि पूर्वीं पुष्कळच खाल्ला होता. असे हे खानदानीचे, इभ्रतदार दर्दुरकमहाज शिष्टपणानें भांडण सोडविण्यास पुढें येत आहेत. पहिल्या झपाट्यास त्यांनीं भांडणाच्या मूळावरच घाव घातला. तो म्हणाला, " केवळ दहा सुवर्णाच्या नाण्यांसाठीं असा तंटा ? हा पैका म्हणजे कःपदार्थ आहे. " माथुर कांहीं कमी वस्ताद नव्हता।. त्यानें दर्दुरकाच्या काखेंतील वर वर्णन केलेलें जाळीदार महावस्त्र बाहेर ओढून तो भोंवतीं जमलेल्या लोकांस तें दाखवीत म्हणतो, " असले शेले पांघरणारा हा गृहस्थ दहा सोन्याच्या नाण्यांना कःपदार्थ मानतो. " पण दर्दुरक असल्या फजितीला दाद देणारा नव्हता. तो हजरजबाबीपणानें त्यास म्हणतो, " अरे, जवळ असलेली संपत्ति कोणी काय रस्त्यानें मिरवीत नेतो काय ? सहज एकदा खेळावयास बसलों तर दहा नाणीं मिळवून देईन. " सरतेशेवटीं मारामारी करून व माथुराच्या डोळयांत प्रत्यक्ष धूळ टाकून त्यानें संवाहकास त्यांच्या कचाट्यांतून सोडविलें.

तसेंच, सहाव्या अंकांतील चन्दनक व वीरक यांचें भांडणहि मोठें मौजेचें आहे. चन्दनक व वीरक हे दोन्ही हलक्या जातीचे असून भांडणाच्या आवेशांत त्यांनीं आपल्या कुळया उद्धारल्या आहेत. चन्दनक म्हणतो, " तुझी जात मी कशाला काढूं ? कवठ न फोडलेलेंच बरें. ( **किं कपित्थेन भग्नेन** । ) कारण तें आंत कुजकेंच निघावयाचें. " त्यापैकीं एक जातीचा न्हावी व दुसरा चांभार असावासें दिसतें. तेव्हां जातीचा चांभार म्हणून चिडविण्यास वीरकानें चन्दनकाची पुढीलप्रमाणें चेष्टा केली आहे. " अरे तुझी जात फार शुद्ध ! तुझी आई नौबत व तुझा बाप नगारा ! आणि वांकडतोंड्या करकट तुझा भाऊ ! आणि असा तूं सेनापति झाला आहेस. "

शर्विलक नांवाच्या ब्राह्मण चोरानें या आपल्या दरोड्याच्या धंद्यांत आपल्यास आपल्या यज्ञोपवीताचा कसा उपयोग होतो त्याचें केलेलें वर्णन फारच विनोदी आहे. तो म्हणतो, " यज्ञोपवीत हें ब्राह्मणाचें मोठेंच उपकरण. त्यांतून माझ्यासारख्या ( घरफोडीचा धंदा करणाऱ्या ) ब्राह्मणास तर त्याचा उपयोग विशेषच. कारण :—

**एतेन मापयति भित्तिषु कर्ममार्गं**
**एतेन मोचयति भूषणसंप्रयोगम् ।**

उद्‌घाटको भवति यन्त्रदृढे कपाटे
दष्टस्य कीटभुजगैः परिवेष्टनं च ॥ ( अं. ३. १६ )

या यज्ञोपवीताचे योगानें भिंतींत पाडावयाच्या भोंकाचें मोजमाप घेतां येतें, तसेंच ( झोंपीं गेलेल्या स्त्रियांच्या अंगावरील ) दागिन्यांचे वेढे सैल करून ते यानें काढून घेतां येतात. कोठें दारास कडी कोयंडा घट्ट बसलेला असल्यास यानें तो वर ओढून काढतां येतो व चोरी करीत असतां हाता-पायास सापकिडा कांहीं चावलाच तर यानें तो अवयव घट्ट आवळून टाकतां येतो ! !

विदूषक वगळला तरी ज्यामध्यें विनोद शिल्लक राहतो असें दुसरें नाटक विद्धशालभञ्जिका हें होय. स्त्रियांस पुरुषांचा व पुरुषांस स्त्रियांचा मुद्दाम वेष देणें किंवा स्त्री ही पुरुष समजली जाऊन व पुरुष हा स्त्री समजला जाऊन तशा स्थितींत राहणें, यामुळें नाट्यकथानकांत गुंतागुंत, कथाविस्तार व विनोदहि होत असतो. या कल्पनांचा आश्रय शेक्स्पिअरनेंहि आपल्या As You Like It, Twelfth Night वगैरे नाटकांतून केलाच आहे. विद्ध शालभञ्जिकेंत याच घोंटाळ्यामुळें फार उत्तम विनोद उत्पन्न झाला आहे.

लाट देशाचा चन्द्रवर्मा म्हणून एक राजा होता. त्याला एक मृगाङ्कावली म्हणून मुलगी झाली. पण त्याला पुत्र नसल्यामुळें ती मुलगी नसून मुलगाच आहे असें त्यानें जाहीर केलें होतें. पुढें विद्याधरमल्ल नांवाच्या सार्वभौम राजाची खंडणी लाटेश्वराकडे थकल्यामुळें विद्याधरमल्लाचा प्रधान भागुरायण यानें त्या पुत्रास आपल्याकडे ओलीस ठेवून घेतलें. भागुरायणास मात्र हा मुलगा नसून मुलगी आहे ही गोष्ट हेरांकडून कळली होती, व या मृगाङ्कावलीचें अखेरीस राजाशी लग्न व्हावें या हेतूनें ती राजाच्या नजरेस सन्दिग्ध-पणें येईल अशी योजनाहि त्यानें दासीकडून करविली होती. दरम्यान कुंतल देशच्या राजाची कुवलयमाला नांवाची राजकन्या तिच्या बापाचा पराभव झाल्यामुळें विद्याधरमल्लाच्या राणीच्या ताब्यांत दिली गेली. कुवलयमालेवरहि राजाची दृष्टि गेलीच होती. म्हणून राणीनें अशी युक्ति योजिली कीं, मृगाङ्कवर्मा ( मृगाङ्कावलीचें पुरुषवेषांतील नांव ) हा जो तिच्या मामाचा मुलगा त्याच्याशीं या कुवलयमालेचा विवाह लावून द्यावा, म्हणजे

आपल्यास आपल्या मामेभावाचें लग्न केल्याचें श्रेय मिळेल व कुवलयमालेचा कांटाहि आपल्या मार्गांतील दूर होईल. पण हेंहि मृगाङ्क-वर्मा व कुवलयमाला यांचें लग्न साधेपणीं न लावतां त्यांत राणीनें आणखी एक डाव साधून घेण्याचा घाट घातला. राजाच्या चारायण नांवाच्या विदूषकानें कांहीं हिकमत करून मेखला नांवाच्या राणीच्या दासीची विटंबना केली होती. त्याचा सूड राजावर उगवावा म्हणून तिनें पुढील युक्ति योजिली. तिनें राजास असें खोटेंच सांगितलें कीं, " मृगाङ्कावली नांवाची मृगाङ्कवर्म्याची एक बहीण आपल्या भावाला भेटाण्यासाठीं आली आहे. आमच्या मामांची अशी इच्छा आहे कीं, तिचा तुमच्याशीं विवाह व्हावा. आपणहून हिला मी आपली सवत कशी करतें याबद्दल आपण शंका घेऊं नये. कारण आजवर आपल्यास आवडणाऱ्या पुष्कळ स्त्रिया मीं आपणांस अर्पण केल्या आहेत. " या गोष्टीवर राजाचा विश्वास बसला, व मृगाङ्कवर्मा नांवाच्या पुरुषाचें आपल्या पतीशीं लग्न लावून त्याची फजिती करण्याचा आपला हेतु सफल होईल असें राणीस वाटूं लागलें. असल्या विचित्र विवाहानें थोडा वेळ राजाची थट्टा केल्यावर मृगाङ्कवर्म्याशीं कुवलयमालेचा त्याच जागीं विवाह लावावा, अशी राणीची इच्छा होती. म्हणून कुवलयमालेसहि तिनें स्त्रीवेषांतील मृगाङ्कवर्म्याबरोबर नवरीच्या वेषांत घेतलें होतें. असल्या या दुहेरी लग्नाचा अत्यंत विनोदी प्रसंग चवथ्या अंकांत दाखविला आहे.

राजा नवरदेव म्हणून उभा. राणीच्या मताप्रमाणें नवरी म्हणून स्त्रीवेषांत आणलेला मृगाङ्कवर्मा त्याच्यासमोर उभा व कुवलयमालाहि राजाच्या थट्टेचा हा सोहाळा संपून राजाच्या नवरीशीं आपलें लग्न केव्हां लागतें म्हणून वाट पाहत जवळच उभी ! विवाहविधि चालू झाले, इतक्यांत दूताकरवीं बातमी आली कीं, लाटदेशाच्या चंद्रवर्म्याला खरोखरच मुलगा झाला. भागुरायण प्रधान तेथें येऊन त्यानें ही वेळ रहस्य उघड करावयास योग्य आहे असें समजून मृगाङ्कवर्मा व मृगाङ्कावली यांचें खरें रहस्य उघड केलें. अर्थात राणीचा डाव राणीवरच उलटला, व राजासमोरील राणीच्या मतानें पुरुष असलेली व्यक्ति राणीची सवत होऊन तिची बायकोहि राजाची पत्नी झाली !! यावर शेवटीं विदूषकानें एक विनोदी शेरा मारला आहे. तो म्हणतो, " आमच्या खेडे-गांवांत अशी म्हण आहे कीं, मेहुण्याची बायको ही आपली अर्धी बायको

धा. क्र. ९२३०५

असते. ( कारण मृगाङ्कवर्मा हा राणीचा मामेभाऊ असल्यानें राजाचा मेहुणाच होता. ) पण मित्रा, तुझी तर ती ( कुवलयमाला ) सगळीच बायको झाली ! ! ”

तसेंच या नाटकांत विदूषकाचें एका बन्धुलाशीं लग्न, मेखला नांवाच्या राणीच्या दासीस मृत्यूचें भय घालून तिला विदूषकास आपल्या पाठीवर घ्यावयास लावणें, वगैरे कांहीं विनोदी व आचरटपणाचे प्रसंग आहेत. विदूषकाच्या बायकोचा नाटकांत प्रत्यक्ष संबंध आणणें ही गोष्ट या नाटकांत प्रथमच केली आहे. तसेंच As You Like It यांतील ‘ टचस्टोन ’ नांवाच्या विदूषकाच्या लग्नाचा प्रसंग शेक्स्पिअरनें जसा रंगविला आहे तसा याहि नाटकांत तोच आहे, हें साम्य लक्षांत आल्यावांचून राहत नाहीं.

श्रीहर्षाच्या रत्नावलींतहि वेष पालटण्यामुळें झालेला गोंधळ व त्यापासून उत्पन्न होणारा विनोद तिसऱ्या अंकांत वर्णिला आहे.

वत्सराजाचें सागरिकेवर प्रेम आहे असें पाहून वासवदत्ता राणीनें तिला नजरकैदेंत ठेविली. पण विदूषकानें पहारा करणाऱ्या दासीस फितवून राजाची आणि सागरिकेची गुप्त स्थळीं गांठ पाडण्याची पुढील युक्ति केली. त्यानें सागरिकेस वासवदत्तेचा वेष घेण्यास सांगितलें, व पहारेवाल्या दासीला राणीच्या दासीचा वेष घेण्यास सांगितलें. या बेताची गुप्तता विदूषकानें आपल्याकडून कितीहि राखिली असली तरी तो वासवदत्ता राणीस कळल्यावांचून राहिला नाहीं. म्हणून ठरलेल्या स्थळीं आणि ठरलेल्या वेळाच्या किंचित् अगोदर खरी वासवदत्ता आपल्या खऱ्या कांचनमाला नांवाच्या दासीसह राजाची खोड मोडण्यासाठी येऊन उभी राहिली. विदूषक तेथें तयार होताच. त्यास वाटलें, “ बरें झालें, ठरल्याप्रमाणें सागरिका वासवदत्तेचा वेष करून आपल्या दासीसह आली.” म्हणून तो सागरिकेस उद्देशून बोलावयाचे शब्द बोलूं लागला. राजाहि ठरल्याप्रमाणें तेथें आला. विदूषकानें सागरिकेची ( ? ) राजाशीं ओळख करून दिली व सगळ्यांत मौज म्हणजे विदूषक सागरिकेला ( ? ) असें म्हणूं लागला कीं, “ सागरिके, स्वस्थ मनानें राजाशीं बोल. नेहमीं वासवदत्तेचे कडू शब्द ऐकून किटलेले राजाचे कान, तुझ्या मधुर शब्दानें थोडे आनंदित होऊं देत.” राणी

वासवदत्ता आपल्या तोंडावर चाललेली ही आपलीच निंदा मुकाट्यानें ऐकत होती. राजाहि तिला सागरिका समजून तिच्याशीं अधिकाअधिक लघळपणा करूं लागला होता. तो असह्य होऊन तिनें आपलें खरें स्वरूप प्रकट केलें; आणि राजा व विदूषक आश्चर्यानें व भीतीनें स्तम्भितच झाले !

या प्रकारानंतर वासवदत्ता फारच रागावली. राजा तिच्या हातांपायां पडूं लागला. पण त्याचें कांहींएक न ऐकतां मोठ्या फणकाऱ्यानें वासवदत्ता निघून चालती झाली. राजा व विदूषक चिंतेंत पडले. पुढें काय होईल हें त्याला कळेना. पण त्यांना मनांत अशी आशा वाटत होती कीं, वासवदत्तेला प्रसंगीं आपल्याशीं कडक वागल्याबद्दल पश्चात्ताप होईल. असा विचार करीत ते उभे आहेत इतक्यांत खरी सागरिका वासवदत्तेच्या वेषांत तेथें आली. जरी ती या वेषांत येथें आली होती तरी आपला हा बेत राणीस कळल्यास काय अनर्थ होईल या भीतीनें व एकंदर आपल्या पराधीन जीवनाबद्दल तिटकारा उत्पन्न होऊन ती एका लतेचा गळफांस लावून घेऊन मरायच्या सिद्धतेनेंच आली होती. तिला येतांना पाहून राजाला व विदूषकाला वाटलें कीं ही पश्चात्तप्त वासवदत्ताच येत आहे. तिला प्रत्यक्ष पाहिल्यावरहि राजाला वाटलें कीं खरोखरच वासवदत्ता गळफांस लावून आत्महत्त्या करीत आहे, म्हणून त्वरेनें तिला सोडविण्यास तो तिच्याजवळ गेला. पण पाहतो तों ती वासवदत्ता नसून सागरिकाच होती. अर्थात् अचानकपणें एकमेकांची गांठ पडल्याबद्दल या प्रेमी युगुलाला आनन्द होत आहे, मेघ न येतांच होणारी ही वृष्टि आहे असें तीं म्हणत आहेत, तोंच विदूषकानें त्यास इषारा दिला, "जपून असा. कदाचित् या पडत असलेल्या अनभ्रवृष्टीला एखाद्या अवेळीं सुटलेल्या झंझावाताप्रमाणें वासवदत्ता येऊन उडवून लावील." आणि आश्चर्याची गोष्ट कीं वासवदत्ता पश्चात्तप्त होऊन खरोखरच तेथें आली. तिला वाटलें आपण आपल्या पतीस निष्कारण वाईट वागविलें, म्हणून एकदम अचानकपणेंच त्यास आलिंगन देऊन प्रसन्न करावें. असें म्हणून जों ती जवळ जाऊं लागते तों राजाचा सागरिकेशीं चाललेला एकान्त तिच्या दृष्टीस पडला. सागरिका म्हणत होती, "तुम्हांला वासवदत्ता जीवितापेक्षां प्यारी, तेव्हां माझ्यावर प्रेम करून वासवदत्तेचा अपराध कां करतां ?" राजा तिला म्हणतो, "छे, छे, असें कोठें झालें आहे ! वासवदत्तेपेक्षां तुझ्या

ठिकाणींच माझी अधिक प्रीति आहे. " हें बोलणें वासवदत्तेच्या कानांत तापलेल्या तेलाप्रमाणें पडलें; व ती एकदम पुढें होऊन त्यास म्हणाली, " बरोबर आहे, माझ्यावर आपलें प्रेम नाहीं हें मी जाणतेंच ! " अर्थात् विदूषक व राजा यांना तिच्यापुढें नाकदुराया काढतां काढतां पुरेसें झालें. इंग्रजींतील ' Dramatic irony ' मुळें उत्पन्न होणारा हा विनोद असून असल्या प्रसंगास संस्कृतांत ' पहिलें पताकास्थान ' म्हणतात.

विदूषक वगळूनहि इतर पात्रांकरवीं चांगला विनोद साधला आहे असें तिसरें उदाहरण शाकुंतलाचें. याच्या साहव्या अंकाच्या प्रारंभीं असणाऱ्या ' धीवरप्रवेशां 'त स्वभावनिष्ठ विनोद व उत्तम उपरोध यांची उत्कृष्ट सांगड घातली आहे.

राजाची मुद्रांकित आंगठी बाजारांत विकत असतां एका कोळयाला दोन पोलिस शिपायांनीं पकडलें; व कोतवालसाहेबांसमोर ते त्याची चवकशी करूं लागले. पोलिस लोकांना साजतील असे उपमर्दकारक शब्द कोळयास बोलून त्याच्या मासे मारण्याच्या पिढीजात धंद्याची त्यांनीं टवाळी केली. त्यावर पोलिस लोकांच्या कचाट्यांत असूनहि त्यानें आपल्या पिढीजात धंद्याचें समर्थन केलें, व तें करीत असतां त्या काळच्या ब्राह्मणांवर जातां जातां एक उपरोधिक विनोदाचा नाजुक टोला त्यानें हाणला आहे. तो म्हणतो, " अहो दादा ! निंद्य असलं तरी आपापल्या मागं लागलेलं आपल्या जातीचं काम आपण सोडून कसं चालणार ? आतां बघा ! यज्ञांत बुक्क्यांनीं बोकड मारणारे बामणबुवा घ्या, ते वरून निर्दय दिसले तरी आपण त्यांना अन्तःकरणाचे मोठे कनवाळूच मानतों कीं नाहीं ? " (**पशुमारणकर्मदारुणोऽनुकम्पामृदुरेव श्रोत्रियः ॥**)

पुढें ही आंगठी राजास कोतवालसाहेबांनीं नेऊन दाखविली, त्या वेळीं दुष्यन्तास शकुन्तलेची स्मृति झाल्यानें त्यानेंहि आणणाऱ्या त्या कोळयास बक्षिस देण्यास फर्माविलें. सुळीं चढवावयास नेलेल्याला हत्तीच्या गंडस्थळावरून मिरवीत न्यावें तसें झालें हें ! पण त्यामुळें या उद्दाम पोलीस लोकांच्या कठोर वर्तणुकीचा नूर एकदम पालटला. " चोरीच्या अपराधाबद्दल तुला फांसावर चढविलेला बघेन किंवा कोल्ह्याकुत्र्याकडून जिवंत फाडलेला

पाहीन ” अशा वल्गना करणारे पोलीस त्या कोळयास बक्षिस मिळालेलें पाहतांच एकदम त्याचे दोस्त बनले. त्याच्या गळयाभोंवतीं वधाच्या वेळीं पुष्पमाला घालावयास ते थोड्या वेळापूर्वी तयार होते ते त्याच्याच गळयांत आतां हात घालून त्याची लाडीगोडीच्या गोष्टींनीं खुशामत करूं लागले. पण त्या वेळींहि त्या मार्मिक कोळयानें आपल्या बक्षिसाचा अर्धा भाग त्या शिपायांस देतां देतां त्यांना टोला दिला, “ शिपाईदादा, हें तुमच्या थोर मनाबद्दलचें बक्षिस धरा ( किंवा माझ्या गळयांत वधाची जी माळ आपण बांधणार होतां तिची किंमत ही घ्या )”–**इतोऽर्धं युष्माकं सुमनो मूल्यं भवतु**–झालें; मागचें सर्व विसरून ती मंडळी आपल्या नुकत्याच जमलेल्या मैत्रीची पहिली सलामी सुरादेवीच्या समोर देण्यास गुत्त्याकडे चालती झाली ! !

आतां विदूषक नसलेल्या नाटकांतील विनोद पाहूं.

मागें सांगितल्याप्रमाणें भवभूतीनें आपल्या नाटकांत विदूषक कोठेंहि घातला नाहीं. मग याचें कारण विदूषकद्वारा ब्राह्मणवर्गाची निंदा होते असें त्यास वाटलें हें असो, किंवा स्वतः तो विनोदविन्मुख प्रवृत्तीचा असो. नाहीं म्हणावयास भवभूतीनें एकदोन ठिकाणींच आपल्या नाटकांतून विनोदाची थोडी चुणूक दाखविली आहे. उत्तररामचरिताच्या चवथ्या अंकांत वाल्मीकीच्या आश्रमांतील दोन शिष्य मोकळेपणानें बोलत बसले आहेत असा प्रसंग आहे. त्याच दिवशीं आश्रमांत कोणी बडे पाहुणे येणार होते. ‘ शिष्टागमने अनाध्यायः ’ या नियमानें आश्रमांतील शिष्यांस सुट्टी मिळाली होती. त्यामुळें आनन्दून जाऊन सौधातकी नांवाचा विद्यार्थी मोठ्या मोकळेपणानें म्हणतो, “ नाना प्रकारच्या पिकलेल्या दाढ्या धारण करणाऱ्या व आम्हांस सुट्टी देणाऱ्या या पाहुण्यांचें मनःपूर्वक स्वागत असो. ” त्यावर दांडायनानें म्हटलें, “ वा ! वडील माणसांबद्दल चांगला आदर व्यक्त करतोस रे ? ” यावर सौधातकी विचारतो, “ बरें तें असो, पण काय रे दांडायना, या बुद्रुक मंडळींच्या कळपाचा तो जो म्होरक्या बुड्ढा होता त्याचें नांव काय ? ” यावर दांडायन त्यास थोडेंसें चापून म्हणतो, “ अरे, वेड्या, थट्टा काय चालविली आहेस ? हे तर वसिष्ठ ऋषि ! दशरथमहाराजांच्या

कौसल्यादि स्त्रियांसहित ते येथे आले आहेत." यावर सौधातकी म्हणतो, "हे वसिष्ठऋषि काय ? मला वाटलें कीं, हें कोणी लांडगे किंवा वाघ असावे. कारण यांनीं आश्रमांत येतांच ती गरीब बिचारी कल्याणी कालवड गट्ट केली !" पूर्वी अतिथि म्हणून आलेल्या विद्वान् ब्राह्मणाला समांस (गोमांस देखील) मधुपर्क म्हणून देत असत; व वसिष्ठाला तो मधुपर्क देण्यासाठीं सौधातकीनें म्हटल्याप्रमाणें कालवड मारली गेली.

तसेंच, याच अंकांत रामाच्या आश्वमेधीय अश्वास पाहून वाल्मीकीच्या आश्रमांतील कुमारांनीं त्याचें केलेलें वर्णनहि विनोदी आहे. पण त्यांतील विनोदापेक्षां स्वभावोक्तिच अधिक प्रभावी आहे. तो श्लोक असा:

**पश्चात् पुच्छं वहति विपुलं तच्च धूनोत्यजस्रं**
**दीर्घग्रीवः स भवति खुरास्तस्य चत्वार एव ।**
**शष्पाण्यत्ति प्रकिरति शकृत्पिण्डकानाम्रमात्रा-**
**न्किं वाऽऽख्यातैर्व्रजति स पुनर्दूरमेह्येहि यामः ॥**

मालतीमाधवाच्या सातव्या अंकांत एक कांहींसा विनोदी प्रसङ्ग भवभूतीनें वर्णिला आहे. येथे माधवाचा मित्र मकरन्द यानें मालतीचा वेष घेतला आहे, व त्याचें नन्दन नांवाच्या एका कुमाराशीं लग्न लावून दिलें आहे. मालतीचा वेष घेतलेला मकरन्द तोंडावर पांघरूण घेऊन पलंगावर पडून राहिला असतां (खोट्या) मालतीनें आपला भाऊ जो नन्दन त्याच्याशीं केलेल्या उद्धट वर्तनाबद्दल तिला नन्दनाची बहीण मदयन्तिका दोष देत आहे. खुद्द मदयन्तिकेचें प्रेम मकरन्दावर होतें. याविषयीं तेथें गोष्टी निघाल्या, व मदयन्तिकेनें गोष्टीच्या भरांत बुद्धरक्षिका, लवङ्गिका वगैरे स्त्रियांसमोर आपलें मकरन्दावरील प्रेम व्यक्त केलें. किंवा असें म्हणण्यापेक्षां त्या दोघींनीं चतुरपणानें मदयन्तिकेस तें वदावयास लाविलें. अशीं गमतीचीं बोलणीं होऊन मदयन्तिका जावयास निघते तोंच मकरन्दानें आपलें स्वरूप प्रगट करून तिला ओळख दिली. हेंहि 'प्रथमपताकस्थाना' चेंच उदाहरण म्हणून देतां येईल. मालतीमाधव नाटकांतील कामन्दकी हें अत्यन्त गंभीर पात्र आहे, पण भवभूतीनें तिचे तोंडीं एकदांच एक विनोदाचें वाक्य घातलें आहे. मालतीच्या वेषांत मकरन्द नन्दनाशीं लग्न

लावावयास जात असतां कामन्दकी त्यास उद्देशून म्हणते, " वा ! मालती तर फक्कड सजली ! "

कृष्णमिश्राचें ' प्रबोधचन्द्रोदय ' नांवाचें एक नाटक आहे. त्याचा विशेष हा कीं, तें रूपकात्मक आहे. मोह हा कामक्रोधादि विकारांचा आश्रय करून विवेकावर हल्ला चढवीत आहे, व अखेरीस विवेकाचा जय होऊन महामोहरूपी खलनायकाचा पराजय होतो, असें याचें कथानक आहे. करुणा क्षमा, श्रद्धा इत्यादि स्त्रीपात्रें व संतोष, विवेक, लोभ, दम्भ इत्यादि पुरुषपात्रें यामध्यें आहेत. या नाटकाच्या तिसऱ्या अंकांत महामोहरूपीं खलनायकाला अखेरीस जाऊन मिळालेल्या तीन धार्मिकांचें विनोदपर वर्णन आहे.

राजशेखराच्या बालरामायण नाटकांतहि तुरळक विनोदस्थळें आहेत. चवथ्या अंकाच्या आरंभीं युद्धप्रसंगास भ्यालेल्या एका बटूचें व एका उपाध्यायाचें भाषण फार विनोदी आहे. मुद्राराक्षस नाटक विनोदविरहित आहे. पांचव्या अंकांत मात्र एक क्षपणक व एक राजसेवक या दोघांचें किंचित् विनोदी संभाषण आहे. सिद्धार्थक हा अगोदरच गांवास निघाला आहे, व सहज वाटेंत भेटलेल्या क्षपणकास विचारीत आहे कीं, " काय रे भिक्षो, आज गांवाला जावयाला दिवस बरा आहे का ? " अर्थातच क्षपणक त्यास हंसून म्हणतो, " भल्या गृहस्था, हजामत करून घेऊन मग आज हजामतीला दिवस बरा आहे कीं नाहीं हें तूं विचारीत आहेस ! " ( **मुण्डितमुण्डो नक्षत्राणि पृच्छसि ।** ) हल्लीसुद्धां शाळेंतील कांहीं भाबडीं किंवा मिष्किल मुलें वर्गांत प्रवेश करून बांकावर बसण्यापूर्वीं शिक्षकास " May I come in Sir ? " असा प्रश्न विचारतात त्यापैकींच हा प्रकार आहे.

तसेंच पहिल्या अंकांत चाणक्याचें आपल्या शिष्यास उद्देशन थोडेंसें भाषण आहे. त्यांत अस्फुट अशी विनोदाची छटा आहे. चाणक्य कांहीं विशेष बेत ठरवून आपल्या पक्षाची मंडळी मुद्दाम परपक्षास धाडीत आहे. आतां अमका गेला, मग भागुरायण गेला असें पाहून तो भाबडा शिष्य मोठ्या दुःखानें आपल्या गुरुजीस म्हणतो, " हाय ! हाय !! गुरुजी, आपलें सर्वच तंत्र बिघडलें. " त्यावर आपले बेत सफल होत आहेत म्हणून प्रसन्न झालेले चाणक्याचार्य आपल्या भोळ्या शिष्याच्या भाविक दुःखानें थोडेंसें

गालांतल्या गालांत हंसून त्यास म्हणतात, “ बाळा, तूं नको दुःख मानूं. गेलेले जाऊंद्यात. जे अजून गेले नाहींत, तेहि गेले तरी हरकत नाहीं फक्त माझी बुद्धि मला सोडून गेली नाहीं म्हणजे झालें. ”

दिङ्नागाच्या कुन्दमाला नाटकाच्या चवथ्या अंकांत पुढील प्रसंग आहे. राम वाल्मीकीच्या आश्रमांत आल्यावर त्याला कण्व नांवाचा एक बालपणींचा मित्र भेटतो. राम व कण्व दोघेहि आतां वयस्क झालेले. तेव्हां कण्वानें रामास ‘ हे राजन्, ’ म्हणजे ‘ अरे राजा, ’ अशी हांक मारली. अशी हांक मारण्याचें कारण ते दोघेहि आता वयस्क झाले होते हेंच होय. या अभिप्रायानें राम त्यास म्हणतो, “ अरे, आपल्या लहानपणीं तूं मला ‘ राम ’ अशी हांक मारीत होतास, व मी तुला नुसतें ‘ कण्वा ’ असें म्हणत होतों. पण आज केवळ आपल्या थोर वयामुळेंच तुम्ही ‘ आर्यकण्व ’ बनलांत व आम्ही ‘ राजे ’ ठरलों ! ”

प्रसन्नराघव, अनर्घ्यराघव वगैरे नाटकांतून विशेष उल्लेखनीय अशीं विनोदस्थळें सांपडत नाहींत. तसेंच विनोदासाठीं नाटकें निवडतांना साधारण प्रसिद्ध अशींच व प्रतिनिधिरूप असणारीं नाटकेंच आम्हीं निवडलीं आहेत.

संस्कृत नाटकांतील विनोदाचा निरोप घेण्यापूर्वी या नाटकाच्या प्रारंभींच असलेल्या नांदीपद्यांमध्यें मोठ्या रमणीयतेनें व्यक्त झालेल्या एका विशिष्ट प्रकारच्या विनोदाचा उल्लेख करणें अवश्य आहे. या विनोदप्रकाराकडे कोणाचें फारसें जावें तितकें व जावें तसें लक्ष गेलेलें दिसत नाहीं. या विनोदाची मौज अशी आहे कीं, हास्यरसाला प्रतिकूल मानल्या जाणाऱ्या ईश्वरविषयक भक्तीच्या पार्श्वभूमिकेवरच त्याचा उठाव असतो. नांदीचें मुख्य प्रयोजन स्तुतीनें इष्ट देवतांना आनंद देणें हें होय. ( **नन्दति देवता अस्यामिति नान्दी।** ) व स्तुतीनें प्रसन्न झालेल्या देवतेच्या कृपेनें आरंभिलेलें कार्य निर्विघ्नपणानें पार पाडणें हा तिचा हेतु. पण या नान्दीपद्यांतून अवलम्बिलेल्या देवतास्तुतीचा प्रकार पाहिला कीं, त्या प्रसन्न होण्यापेक्षां रागावत कां नाहींत ? अशी शंका वाचकांस प्रथमदर्शनीं येते. कारण त्यांत इष्ट देवतेला उपहासास्पद करण्यासाठीं कोठें तिचा उणेपणा दाखविलेला असतो,

तर कोठें फटफजिती झालेली वर्णिलेली असते. कोठें तिच्या वेषाचा तर कोठें परिवाराचा विचित्रपणा उघड करून दाखविलेला असतो. सामान्यतः विनोदविमुख असणाऱ्या भवभूतीनें आपल्या मालतीमाधव नाटकाच्या आरम्भींच्या नान्दीपद्यांत गणपतीच्या नासारन्ध्रांत भ्यालेला सर्प शिरत आहे व तो त्यास सूं सूं करून झिडकारून लावीत आहे, असें वर्णन केलें आहे. विशाखदत्ताच्या मुद्राराक्षस नाटकाचे आरम्भीं शकङ्रानें पार्वतीशीं शब्दच्छल करून तिला फसविण्यांत केलेला धूर्तपणा व्यक्त केला आहे. कालिदासानें मालविकाग्निमित्राचे आरम्भीं स्त्रीलंपटत्वामुळें शकङ्र पार्वतीस आपलें अर्धें अंगच करून बसवितो असें म्हटलें आहे. रत्नावली, प्रियदर्शिका इत्यादि नाटकांतून कधीं शङ्करासारख्या विचित्र पतीशीं वागतांना पार्वतीची झालेली तारांबळ, तर कधीं गंगेसंबंधांत शिवपार्वतीचा तंटाच वर्णिला आहे. घरगुती नाजुक बाबीचा असा हा सार्वजनिक उल्लेख केलेला पाहून कोणासहि झाला तरी रागच यावयास पाहिजे. पण हे उल्लेख फारच कौशल्यानें केले असल्यामुळें देवतेचा कोप होणें किंवा प्रेक्षकास पावित्र्यविडम्बन झालें असा भास होणें यांपैकीं कांहींच होत नाहीं. कारण या वर्णनांत एकीकडे खुद्द कवीच्या देवताविषयक आदराचा तोल व दुसरीकडे भक्तांच्या भावनांचा नाजुक तोल हे दोन्ही संभाळलेले असतात. कारण कवि आपली भक्तीची बैठक न सोडतां व वर्ण्य देवतेचें अगाध सामर्थ्य व ऐश्वर्य डोळयाआड न होऊं देतां तिच्याशीं ही लडिवाळ घिटाई करीत असतो. देवतेशीं असली सलगी आपल्या धर्मांत असलेल्या अवतारकल्पनेला व तिच्या पोटीं असणाऱ्या सगुण भक्तीला साजेशी आहे. देवाला मनुष्य कल्पावयाचा व त्याच्यावर क्षणभर सर्व मानुषतासुलभ मनोविकारांचा आरोप करावयाचा. पण तसें करतांना तो दिशा व काल यांनीं अपरिच्छेद्य व गुणातीत आहे हें विसरावयाचें नाहीं या सविकल्पक समाधीवर ह्या विनोदमिश्रित भक्तीची खरी बैठक आहे.

मुद्राराक्षसांतील शङ्कराच्या लुच्चेगिरीचा उल्लेख पुढीलप्रमाणें मोठ्या खुबीदारपणानें केला आहे. शङ्करानें मस्तकावर धारण केलेल्या गंगेबद्दल पार्वतीस सदैव मत्सर वाटतो व त्याबद्दल ती शङ्करास कित्येक वेळां पेंचांत आणण्यास बघते, ही कल्पना अनेक नान्दीपद्यांतून आहे. शङ्करहि कांहीं

लप्पंछप्पं करून पार्वतीच्या पेंचांतून सुटण्यास पाहत असतो. त्यांपैकीं एका प्रसङ्गाचें वर्णन येथें आहे.

"आपल्या डोक्यावर बसलेली ही कोण ?" असा पार्वतीनें प्रश्न केल्यावर शङ्कर मुद्दाम वेड पांघरून उत्तर देतो. "ही चंद्रकोर !" पार्वती म्हणते, "काय ? हें हिचें नांव आहे ?" शङ्कर म्हणतात, "होय. तेंच तूं विसरलीस वाटतें ?" यावर थोडेंसें चिडून पार्वती म्हणते, "अहो, मी तुम्हांला तुमच्या डोक्यावरील स्त्रीबद्दल विचारिलें, चन्द्राबद्दल नव्हे." (**नारीं पृच्छामि नेंदुम्।**) त्यावर अधिकच वेड पांघरून शङ्कर म्हणतो, "पुरुषावर विश्वास नसल्यास तूं एखाद्या स्त्रीस विचार. विजया नांवाची तुझी सखी आहेच." अशा तऱ्हेनें पार्वतीच्या प्रश्नाच्या तडाख्यांतून गंगेचें रक्षण करण्याचें शङ्कराचें चातुर्य ( शाठ्य ) तुमचें रक्षण करो.

वेणीसंहार नाटकाच्या प्रारंभीं राधाकृष्णाच्या शृङ्गारांतील एक विनोदी प्रसंग आहे. रासक्रीडा करीत असतांना रागावून व खेळ तेथेंच टाकून राधा फणकाऱ्यानें जाऊं लागते. कृष्णहि तिच्यामागून तिच्या पावलावर पाऊल ठेवीत व तिच्यासारखा हावभाव करीत तिच्या मागें जातो. कांहीं वेळानें कृष्ण आपल्या मागून येत आहे हें पाहून तिनें उसना आणलेला राग गळून जातो व त्या दोघांची दृष्टादृष्ट होऊन या भांडणाचें मधुर हास्यांत पर्यवसान होतें. यांतील सूक्ष्म विनोद शृङ्गाररसाचा आनुषंगिक आहे.

शंकर ही नाटकाची अधिदेवता असल्यामुळें वरील प्रकारचीं वर्णनें बहुधा शंकरास अनुलक्षूनच आहेत. शिवाय कोणाहि विनोदी कवीला सहज दिसेल असा विचित्रपणा शंकराच्या वेषांत व गृहस्थितींत आहे. यासंबंधीं आणखी कांहीं गंमतीचीं पद्यें खालीं देतों. सदर पद्यांच्या रचनेवरून तीं मुळांत नान्दीपद्यें असावींत असें वाटतें. पण त्यांचा संदर्भ मात्र उपलब्ध नाहीं. कदाचित् कवींनीं केवळ स्फुट श्लोक म्हणूनहि त्यांची रचना केली असेल.

एकदां शंकरास पार्वतीनें सहज प्रश्न केला कीं "माझे जसे अत्यंत समृद्ध मातापितर आहेत तसे तुम्हांला कोठें आहेत ?" नगाधिराज हिमवान् व मेना हीं आपलीं मातापितरें असा पार्वतीस अभिमान होता व शंकर हा तर बोलूनचालून एकटा फटिंग ! ना ठाव ना ठिकाण ! इतकेच नव्हे, तर तो

कोणाच्या पोटीं जन्मला हेंहि कोणास माहीत नाहीं. तेव्हां अशा या दरिद्री व बेवारसी नवऱ्याला थोडें खिजवावें असा पार्वतीच्या प्रश्नाचा हेतु. पण शंकर कसला वस्ताद! त्यानें लागलीच उत्तर केलें, "मीहि तुला उलट असा प्रश्न विचारतों कीं, मला जसे समृद्ध सासूसासरे आहेत तसे तुला कोठें आहेत दाखव!" एकाच भांडवलावर दोघांनीं व्यापार करूं पाहण्यासारखें हें झालें.

**क्व तिष्ठतस्ते पितरौ ममेवे-**
**त्यपर्णयोक्ते परिहासपूर्वम्।**
**क्व वा ममेव श्वशुरौ तवेति**
**तामीरयन्सस्मितमीश्वरोऽव्यात्॥**

खालील श्लोकांत पार्वतीस शंकराच्या भिक्षापात्र-अवलंबानें लाजिरवाण्या झालेल्या जिण्याची लाज वाटून ती त्यास शेतकी करण्यास विनंति करीत आहे अशी कल्पना आहे. शेतीची समग्र सामग्री जुळविण्याचें तिचें कल्पनाचातुर्य पहा—

**रामाद्याचय मेदिनीं धनपतेर्बीजं बलाल्लांगलं**
**प्रेतेशान् महिषं तवास्ति वृषभः फालं त्रिशूलादपि।**
**शक्ताऽहं तव चान्नदानकरणे स्कन्दोऽस्ति गोरक्षणे**
**खिन्नाऽहं हर भिक्षया कुरु कृषिं गौरीवचः पातु वः॥**

परशुरामापासून शेतीस जमीन, तिच्यांत पेरावयास कुबेरापासून बीं, बळरामापासून नांगर, यमापासून रेडा, घरचाच नंदी, त्रिशूळाचा नांगरास फाळ, गुरें राखावयास कार्तिकेय, व शेतावर न्याहारी घेऊन यावयास खुद्द पार्वती! आहे कीं नाहीं शेतीचा थाट?

पुढील श्लोकांत पार्वतीनें शङ्करास शब्दांत पकडून फजित केला आहे. शङ्कर दाराबाहेर उभे राहून पार्वतीस दार उघडण्यास विनंति करीत आहे, व पार्वती मुद्दामच "कोण बाहेर आहे?" असा प्रश्न विचारीत आहे. शङ्कर आपलें नांव सांगत आहेत. पण पार्वती त्याचा दुसरा अर्थ करून त्यास झिडकारीत आहे असा शब्दश्लेषावर अधिष्ठित असलेला विनोद येथें आहे.

कस्त्वं शूली मृगय भिषजं नीलकण्ठः प्रियेऽहं
केकामेकां कुरु पशुपतिर्नैव दृश्ये विषाणे।
स्थाणुर्मुग्धे न वदति तरुः जीवितेशः शिवायाः
गच्छाटव्यामिति हतवचाः पातु वश्चन्द्रचूडः॥

संस्कृतांतील दशरूपकांपैकीं (नाट्याच्या दहा प्रकारांपैकीं) नाटक-(नाटिका), प्रकरण या दोन प्रकारांतील विनोदाचा विचार झाला. आतां खुद्द हास्यरसाचें माहेरघरच जें प्रहसन त्यांतील एकदोन ठळक प्रकरणांचा विचार करूं.

प्रहसनांत सामान्यतः निन्द्य व हलक्या दर्जाचीं पात्रें घालून विनोद उत्पन्न केला असतो. त्यांत दंभस्फोट, परधर्मांतील आचारावर विनोदी टीका इत्यादि प्रकार आढळतात. यांत तपस्वी, चेट, विट, वेश्या इत्यादि पात्रें असतात. यांत एकच अंक असतो.

'मत्तविलास' नांवाचें प्रहसन इ. स. ७ व्या शतकांत होऊन गेलेला महेन्द्रविक्रमवर्मा यानें लिहिलें आहे. तो पल्लव वंशांतील एक राजा होता. त्याची या प्रहसनांत चांगल्यापैकीं विनोदबुद्धि प्रकट झाली आहे.

यांतील संविधानकः—कोणी एक सत्यसोम नांवाचा कापालिक दारू पिऊन आपल्या देवसोमा नांवाच्या पत्नीशीं विनोदी बडबड करीत असतां, तीं दोघेंहि बोलत बोलत एका दारूच्या गुत्त्यांत जातात. तेथें दारू पिण्याच्या धांदलींत सत्यसोमाच्या हातांतील भिक्षाकपाल हरवतें. तें तीं दोघें मोठ्या कसोशीनें शोधूं लागतात. इतक्यांत एक शाक्य भिक्षु तेथें येतो. कापालिक व शाक्य भिक्षु यांमध्यें आपापल्या धर्माच्या मोठेपणाची मोठी विनोदी चर्चा होते. भिक्षूनें आपलें पात्र चोरून दडविलें आहे या संशयानें तीं नवराबायको आपलें कपाल त्याच्याजवळ मागतात. व या बाबतींत मारामारीपर्यंत पाळी येते. इतक्यांत प्रभुकल्प नांवाचा एक पाशुपत (शंकरभक्त) तेथें येऊन मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करतो. या तिघांचीहि आपापल्या पंथातील आचाराबद्दल पुनः विनोदी चर्चा होते व हरवलेल्या कपालाच्या बाबतींत ही सर्वच मंडळी न्यायालयाकडे जाण्याचें ठरवितात. इतक्यांत एक वेडा मनुष्य एका कुत्र्याच्या मागें लागून त्यास शिव्या देत

सुटतो. त्या कुत्र्यानें मांस असलेलें कापालिकाचेंच पात्र पळविलेलें असतें. वेडा तें कुत्र्याकडून हिसकावून घेतो. कापालिक तें त्या वेड्याकडून कसेंतरी घेतो. पात्र मिळाल्यामुळें आनंद झालेलीं कापालिक पतिपत्नी निघून जातात. यांत कथानक असें नाहीं. पण मधूनमधून विनोदी विचारांची पखरण मात्र भरपूर आढळते.

शाक्यधर्मावर टीका करतांना सत्यसोम कापालिकानें उपयोजिलेला विनोदी कोटिक्रम पाहण्यासारखा आहे. तो म्हणतो, " आमच्या पंथाप्रमाणें दारू प्यावी, सुंदर स्त्रीचा सहवास करावा, अशा सुखकारक साधनांनीं अंतीं साध्य जें सुख तें मिळेल हें मला पटतें. कारण, साध्य व साधन ( किंवा कार्य व कारण ) यांचें रूप एक असतें. पण शाक्य लोकांना एवढेंहि समजूं नये काय कीं धर्माचरणांत इंद्रियनिग्रहानें नानाप्रकारचे शारीरिक क्लेश सहन केल्यानें अंतीं सुख कसें मिळणार ? कारण, दुःखाच्या साधनाला दुःखच साध्य व्हावयाचें.'' (**दुःखस्य कार्यं सुखमानन्तः स्वेनैव वाक्येन हता वराकाः।**)

तसेंच दारूचा गुत्ता म्हणजे यज्ञवाटिका आहे असें म्हणून या दोघांची कापालिकानें केलेली तुलना फार मजेदार आहे. पुढें शाक्यभिक्षूनें आपल्या धर्माबद्दल अशी तक्रार केली आहे कीं, " आमच्या धर्मपुस्तकांत उत्तम खाणेंपिणें, मृदु शय्या इत्यादि हे सर्व चैनीचे पदार्थ ठेविले आहेत असें असतां केवळ स्त्रीसंग व सुरापान हीं शेवटचीं दोन क्रमप्राप्त अंगें का ठेविलीं नाहींत हें मला कळत नाहीं. कदाचित् मूळ पुस्तकांत हें असेलहि, कारण कर्ता सर्वज्ञ होता ! ! पण कांहीं दुष्ट थेरड्यांनीं आम्हां तरुणांचा मत्सर करून ' स्त्री व सुरापान हीं विहित आहेत ' अशीं त्यांतील वचनें मुद्दाम काढून टाकलीं असलीं पाहिजेत. मूळ कर्त्याच्या आशेचा पाठ ज्यामध्यें आहे असें जर एकादें पुस्तक मला मिळेल तर त्यायोगें मी अखिल संघावर उपकार करीन. "

यांतील धर्मग्रंथांवरील टीका प्रायः प्रबोधचंद्रोदयाप्रमाणेंच आहे. कापालिकाच्या बायकोच्या तोंडीं मात्र स्त्रीस्वभावाला धरून एक मोठें गंमतीचें वाक्य घातलें आहे. शाक्यभिक्षु व कापालिक यांच्या भिक्षापात्राच्या भांडणांत पाशुपताच्या मतानें असें ठरतें कीं दोन्ही पक्षांनीं न्यायालयांत जावें.

तें ऐकून देवसोमा कापालिका एकदम म्हणते, " न्यायालयांत जावयाचें असेल तर नमस्कार त्या भिक्षाकपालाला. या भिक्षूनें अनेक मठांतून पैसे सांठवून चांगलें डबोलें केलें आहे. त्यानें तो न्यायधीश व वकील यांच्या चांगल्याच मुठी दाबील. पण न्यायालयांत भांडणें भांडण्यास आमच्याजवळ कोठें आहे पैसा ? आमची सर्व संपत्ति म्हणजे सापाच्या कांतीची राख ! "

' मत्तविलास ' प्रहसन हा एक फार्सच आहे. त्यांत संविधानकामध्यें विनोदाचें बीज नाहीं. जो विनोद उत्पन्न होतो तो पात्रांमुळें. पण बोधायन-कवीचें ' भगवदज्जुकीयम् ' ( संन्यासी व वेश्या ) हें प्रहसन बऱ्याच उच्च दर्जाचें आहे. यांतील पात्रें कांहीं विद्वान्, कांहीं सोज्ज्वळ व सरळ आणि सद्वर्तनी आहेत. मत्तविलासांतील किळसवाणा प्रकार यांत नाहीं. शिवाय यांतील कथानकाच्या घटनेंतच विनोद आहे. या सर्व कारणांनीं यास ' प्रहसनरत्न ' म्हटलें आहे तें योग्य वाटतें. हें प्रहसन ' मत्तविलासा ' च्या पूर्वीचें असावें. कारण त्यामध्यें धर्माची इतकी अवनति दाखविलेली नाहीं.

**भगवदज्जुकीयाचें संविधानक**–एक विद्वान् ब्राह्मण संन्यासी आपल्या शिष्याबरोबर वैराग्य, आत्मानात्मविवेक, योग इत्यादि विषयांवर चर्चा करीत एका बागेंत शिरतात. सदर शांडिल्य नांवाचा शिष्य पूर्वी बौद्धश्रमणक होता, पण त्यानें नंतर या संन्यासीमहाराजांचें शिष्यत्व पत्करलें होतें. त्याच बागेंत एक वसंतसेना नांवाची तरुण वेश्या आपल्या दोन दासींसह आपल्या प्रियकराची वाट पाहत उभी होती. शांडिल्य तिचें रूप पाहून व तिचें मधुर गाणें ऐकून तिच्यावर भाळतो. पण इतक्यांत तिला सर्पदंश होऊन ती जागच्या जागीं मरून पडलेली त्याला दिसते. शिष्याला आपलें योगसामर्थ्य दाखवून चकित करावयास ही संधि चांगली आहे असें जाणून त्या परि-व्राजकाचार्यांनीं योगबलानें आपला देह तेथेंच टाकून त्या वेश्येच्या मृत शरीरांत प्रवेश केला. त्यामुळें वसंतसेना जिवंत होऊन उठली खरी, पण ती संन्याश्याचे विचार बोलूं लागली !

तिच्या मृत्यूची बातमी ऐकून तेथें आलेली तिची आई व तिचा प्रियकर तेथें येऊन पाहतात तों ती संन्याश्याप्रमाणें बोलत आहे ! त्यांनीं ठरविलें कीं, तिला विषाची बाधा झाली, व त्यावर ते विषवैद्याकडून उपचार करूं लागले.

इकडे मजा काय झाली होती कीं, यमदूतांना यमानें "वसंतसेनेस घेऊन या" असा हुकूम दिला होता. पण यमानें सांगितली एक व यांनीं नेली भलतीच ! सापाचें रूप घेऊन ते या वसंतसेना वेश्येचे प्राण घेऊन गेले ! पण यमाच्या दरबारांत ही चूक उघडकीस आली, व ते तिचा प्राण घेऊन ताबडतोब परत त्या स्थळाला आले. येऊन पाहातात तों ती जिवंत झालेली ! म्हणून त्यांनीं तिचे प्राण जवळच पडलेल्या संन्याश्याच्या मृत देहांत कांहीं काल घातले. झालें, संन्याशी उठले व वेश्येचे हावभाव करून तिचे प्रेमालाप करूं लागले ! सर्वांना पुन्हा मोठें आश्चर्य वाटलें. यमदूतांनीं पूर्वीप्रमाणें ज्याचे त्याचे प्राण ज्याच्या त्याच्या देहांत घातल्यावर ही मंडळी स्वस्थानास निघून गेली.

सदर प्रहसनाच्या घटनेंत जो विनोद आहे तोच प्रमुख. तपशिलांत किंवा संभाषणांत मात्र मत्तविलासाइतका चांगला विनोद यांत साधला नाहीं. मत्तविलासांतील उपरोध फारच तिखट आहे. यांतील शांडिल्य हा एक भाबडा, सरळ स्वभावाचा, आधाशी, इंद्रियसुखाला हापापलेला माणूस आहे. मात्र तो प्रामाणिक आहे येवढा त्याचा गुण. यामुळें त्याच्या व त्याच्या संयमशील संन्याशी गुरूच्या संवादांत सूक्ष्म विनोद आला आहे. वसंतसेनेच्या गोड आलापांनीं बेहोष होऊन तो आपल्या गुरूस म्हणतो, "गुरुजी, ऐका, हिचा गळा नुसता अमृतानें पाझरत आहे !" यावर विद्वान् गुरु शांतपणे उत्तर करतात, "अरे, शब्दस्पर्शरूपरसगंध हे पंचेंद्रियांचे विषय आहेतच. त्यामुळें आपले श्रोत्र ( कान ) शब्दाकडे वळायचेच ! पण मी ( तुझ्यासारखा ) त्यामुळें वेडावून मात्र जाणार नाहीं. (**प्रसङ्गमत्र न गच्छामि ।**) कारण '**सङ्गात् सञ्जायते कामः**' वगैरे !!"

यावर केवळ आपल्या स्वभावानुरूप शिष्य म्हणतो, "तें कशाला सांगतां, गुरुजी ? थोडा पैसा तुमच्या हातांत खुळखुळेल तर तुम्हीहि याच्या नादीं खास लागाल !!" ( **प्रसंगमपि सांप्रतं करिष्यसि यद्यस्य कार्षापणा भवेयुः ।** )

वसंतसेनेचे प्राण सर्पदंशामुळें जाऊं लागले त्या वेळीं शांडिल्याचाहि जीव कासावीस होऊं लागला. त्यावर गुरु त्याला म्हणाले, "अरे, हिच्यासाठीं तूं कां येवढा तळमळतोस ?" शांडिल्य म्हणतो, "ती आपल्यासारखी

म्हणजे आपली स्वजनच आहे! कारण असें कीं, संन्याप्रमाणेंच तीहि कोणावरच आसक्ति ठेवीत नाहीं!!"

यांतील मुख्य विनोद संन्याशी व वेश्या यांच्या प्राणांची व देहाची अदलाबदल झाल्यावरचा. संन्याश्याच्या देहानें वसंतसेनेनें शृंगार बोलावयाचा व शृंगारचेष्टा करावयाच्या व वेश्येच्या देहानें संन्याश्यांनीं विरक्तपणा दाखवावयाचा, ही गोष्टच मुळांत फार गमतीची आहे. ती तशी वठली आहे. हे दोन्ही प्रकार पाहून भांबावलेला शांडिल्य अखेरीस म्हणतो, "हा संन्याशी कां ही वेश्या किंवा हें दोघांचें कडबोळें आहे?" ( **नैव भगवान् नैव अज्जूका ( वेश्या ) । भगवदज्जूकं नाम संवृत्तम् ।** )

'**लटकमेलक**' नांवाचें आणखी एक प्रहसन असून त्यांतील कांही उदाहरणें मोठ्या गमतीचीं आहेत. उ० '**गुरोर्गिरःपञ्च**' हा विनोदी श्लोक त्यांतीलच होय.

भाण नांवाचा एक नीतिदृष्ट्या हीन नाटकप्रकार संस्कृतांत आहे. यांत स्वैराचारी लोकांचा गोंधळ व बदफैलीचा सुकाळ असतो. यांत धूर्त बदचाली लोकांनीं व नादावलेल्या शिंदळ बायांनीं योजलेल्या गमतीच्या युक्त्या-प्रयुक्त्यांचें वर्णन केलेलें आहे. '**दिवा पातिव्रता भूत्वा नक्तं च कुलटायते।**' याप्रमाणें होणाऱ्या त्यांच्या वर्तनांत विनोद पुष्कळ आहे. असल्या विनोदाच्या अश्लील कथा कथासरित्सागर, पञ्चतन्त्र हितोपदेश व दशकुमारचरित यांतहि आहेत. या सर्वांत चातुर्यजन्य विनोद असतो, पण कोणीहि सभ्य माणसानें तो शोधीत बसूं नये. गलिच्छ गटारांत पडल्यामुळें फुकट गेलेलें तें एक बहुमोल नाणें आहे असें समजून आपल्या वाटेनें जावें हेंच बरें.

'मुकुंदानन्दभाणां'त मुद्गलभट्ट पुराणिकाचें व अशीं इतर कांहीं वर्णनें अंमळ कमी अश्लील व चांगलीं विनोदी म्हणून उल्लेखनीय आहे.

संस्कृत नाटकांच्या मानानें संस्कृत काव्यांत फारच थोडा विनोद आहे. याचें कारण कदाचित् असें असेल कीं, नाटकाच्या प्रेक्षकांच्या मानानें काव्याचे वाचक अधिक भारदस्त व गंभीर. नाटक अगदीं हलक्यासहि

आवडावें अशी त्याची योजना करणें आवश्यक, तसें काव्याचें नाहीं. नाटक हें दृश्य व काव्य हें श्राव्य. त्यामुळें काव्यांत अधिक उदात्तता, गांभीर्य, व वर्णनात्मक भाग सहजच घातलेला खपतो. तरी कांहीं ठिकाणीं असलेला काव्यांतील विनोद पुढें दिला आहे. विनोदाचें नजरेस भरण्यासारखें स्थळ ' कुमारसम्भवां'तील पांचव्या सर्गांत आहे. पार्वती शंकराच्या प्राप्तीसाठीं उग्र तप करीत बसली होती. तिची निष्ठा खरोखरच आपल्या ठायीं आहे कीं नाहीं हें पाहण्यासाठीं स्वत: शंकर ब्रह्मचाऱ्याच्या वेषानें तिचे आश्रमांत गेले. " आपण फार दुरून दमून आलों आहोंत " असा बहाणा करून तिच्याशीं हळूहळू त्यांनीं बोलावयास सुरुवात केली. तिच्या तपाचा हेतुहि त्यांनीं समजावून घेतला. तो ऐकतांच ब्रह्मचारी बोवांनीं मोठें आश्चर्य दाखविलें व " पार्वतीसारख्या नगाधिराजाच्या संपन्न कन्यकेनें शंकरासारख्या निर्धन गोसावड्याशीं विवाह करण्याच्या भानगडींत पडूं नये. " म्हणून तिला मोठ्या कळवळ्यानें विनवून त्यांनीं शंकरांच्या निंदेस प्रारम्भ केला. खुद्द शंकर आपलीच निंदा कांहीं हेतूस्तव करीत आहेत व पार्वतीस तें माहीत नाहीं या घटनेंतच सर्व विनोदाचें बीज आहे. शिवाय नांदीपद्याचे वेळीं सांगितल्याप्रमाणें शंकर सर्ववैभवसम्पन्न व सर्वशक्तिमान् परमेश्वरच आहे. त्याचें दारिद्र्य, कुरूपता व इतर बाबतींतील उणेपणा हा केवळ लौकिक व्यवहारापुरता, अशी या निंदेची पार्श्वभूमि घेतली असतां सदर मनोरम विनोदाची तेव्हांच कल्पना येण्यासारखी आहे.

**वपुर्विरूपाक्षमलक्ष्यजन्मता दिगम्बरत्वेन निवेदितं वसु ।**
**वरेषु यद् बालमृगाक्षि मृग्यते तदस्ति किं व्यस्तमपि त्रिलोचने ॥**

या एकाच श्लोकांत पार्वतीबद्दल त्यांस वाटणारी कळकळ (?) व तिऱ्हाईतपणाचा शंकरांनीं केलेला बहाणा फार उत्कृष्ट तऱ्हेनें व्यक्त झालेला आहे. या जटिलानें उपस्थित केलेल्या सर्व दोषांचें पार्वतीनें सुंदर निरसन केलें आहे, व त्याला ती अखेरीस म्हणते, " तूं मंद असल्यामुळें शंकराचा महिमा तुला कळत नाहीं व म्हणून त्याचा द्वेष तूं करीत आहेत. शंकर कसेहि असोत, माझें प्रेम त्यांच्यावर निश्चल आहे. " इतकें झाल्यावरहि हे खमंग ब्रह्मचारी आपल्या जन्मजात चापल्यानें ( आपण ब्रह्मण असल्यामुळें आपण वाजवीपेक्षां अधिक धीट व लुडबुडे आहोंत असें ब्रह्मचारीबुवांनीं आगाऊच सांगून

ठेविलें होतें. ) शंकराची अधिक निन्दा करण्यासाठीं कांहीं बोलणार असें त्यांच्या हलत्या ओठांवरून दिसूं लागतांच, पार्वतीनें रागावून जाऊन त्यास चूप बसविण्यास आपल्या दासीस आज्ञा गेली. याहि तिच्या रागाची वाचकास गंमतच वाटते.

रघुवंशांत तुरळक तुरळक विनोदस्थळें आढलतात. त्यांतील विनोद बहुधा शृंगाराशीं संलग्न आहे. रघुवंशाच्या सहाव्या सर्गांत इंदुमतीस पाहून स्वयंवरास आलेल्या राजपुत्रांनीं केलेल्या शृंगारचेष्टा विनोदानें वर्णिल्या आहेत ( श्लोक १३ ते १९ ). सुंदर स्त्री पाहिल्यावर पुरुषांच्या मनाच्या वेडावलेल्या स्थितींत होणाऱ्या या अंगाच्या अर्थशून्य हालचाली असल्यानें व त्या हुबेहूब दाखविल्यामुळें वाचकांस फारच गंमत वाटते. तसेंच इंदुमती एकामागून एक राजपुत्रांना नापसंत करीत चालली त्या वेळची त्यांची स्थिति कालिदासानें मोठ्या चांगल्या विनोदबुद्धीनें दर्शविली आहे. इंदुमती आपल्यापुढें आली व सुनन्दा आपलें गौरवयुक्त वर्णन करूं लागली म्हणजे ही आतां आपला स्वीकार खास करणार या आशेनें प्रत्येकाचा चेहरा प्रफुल्लित होई. पण ती आपली नापसंती व्यक्त करून पुढें जाऊं लागली कीं तोच चेहरा निराशेनें व अपमानानें काळवंडूं लागे. या प्रकारास कालिदासानें एक विनोदी उपमा दिली आहे. " रात्रीं एखाद्या वाड्याच्या सज्जापुढें मशाल आणली असतां तो प्रकाशित दिसतो व तशीच ती पुढें निघून गेली असतां तो लगेच काळा पडतो, त्याप्रमाणेंच राजपुत्रांचें झालें. " ही उपमा इतकी समर्पक आहे कीं या उपमेवरून कालिदासास ' दीपशिखा कालिदास ' असें म्हणतात.

इंदुमती अखेर अजाजवळ आली. त्याचें रूपगुण तिला पटलें व इतर राजपुत्रांप्रमाणें त्याच्यापासून लगेच दूर जावयास न लागतां ती तेथेंच खिळून उभी राहिली. तिच्या मनांतील भाव मोठ्या चाणक्षपणानें ताडून तिची नाजूक थट्टा करण्यासाठीं तिची सखी सुनन्दा म्हणते, " ताईसाहेब, चला ना पुढें. " ( **आर्ये, व्रजामः अन्यतः ।** ) ही तिची थट्टा इन्दुमतीला आवडली. तरीपण ती करण्याचें हें योग्य स्थळ नव्हे असें जाणून उसन्या लाडिकपणाच्या रागानें तिनें सुनन्देकडे डोळे रोखले.

सातव्या सर्गांत अज आणि इंदुमती या जोडप्याची वरातीची मिरवणूक

वर्णिली आहे. हें रूपसुंदर व गुणसुंदर जोडपें पाहावयास मार्गाच्या दोन्ही बाजूंस असलेल्या वाड्यांच्या खिडक्यांतून पुरवासिनी स्त्रिया जमल्या. स्त्रीस्वभावास अनुसरून मोठ्या उत्सुकतेनें वरातीची मजा पाहावयास येणाऱ्या स्त्रियांची उडालेली धांदल, कालिदासानें मोठ्या गंमतीनें वर्णिली आहे. रघु. ७-६ ते १२.) खिडकीपाशीं जाण्याच्या धांदलींत कोणाएकीस आपले केश बांधावयाचे राहिले आहेत व ते बांधण्यासाठीं त्यांस घातलेला हात तेथें तसाच राहिला आहे याचेंहि भान राहिलें नाहीं. दुसऱ्या एका स्त्रीची गंमत तर याहिपेक्षां अधिक आहे. आपल्या दासीच्या मांडीवर आपला पाय ठेवून तो आलित्यानें रंगवून घेण्यास ती बसला होती. खालीं मिरवणूक आलेली ऐकल्याबरोबर तिनें तो पाय झटदिशीं ओढून घेतला व पायाचा रंग ओला असतानांच आपली नेहमींची विलासयुक्त हंसगति टाकून देऊन ती धांवतच तेथें आली. पायाचा रंग ओला असल्यामुळें जमिनीवर तिच्या पायाचे ठसे उमटून राहिले. एका डोळ्यांत अंजन घातलें आहे व दुसरा तसाच आहे व हातांत अंजनाची शलाका आहे अशा स्थितींत कोणी आली, तर कोणी नेसण सांवरतच आली व तिसरीचा कमरपट्टा सैल झाल्यामुळें तो खालीं पडून तिच्या पायांत अडकूं लागला अशी तिची धांदल झाली.

तसेंच श्लोक २३ मध्यें शृङ्गारयुक्त उत्कृष्ट विनोदाचें चित्रण कालिदासानें केलें आहे. इंदुमती व अज वरातीनंतर होमहवनादि धार्मिक कृत्यांसाठीं एकमेकांजवळ बसलीं आहेत. इंदुमतीला अजाकडे व अजाला इंदुमतीकडे पाहण्याची उत्कंठा साहजिकच फार लागली आहे. पण करतात काय ? पुढें पुरोहित व इतर बाजूंस स्नेहीसोबती मंडळी ! तेव्हां वरून धर्मकृत्यांकडे लक्ष आहेसें दाखवून डोळ्याच्या एका कोपऱ्यानें तीं दोघें एकमेकांकडे चोरून पाहण्याचा मधूनमधून प्रयत्न करीत होतीं. आपण असें पाहत आहोंत असें इतरांसच काय पण एकमेकांसहि कळूं नये अशी त्यांची इच्छा ! पण कर्मधर्मसंयोगानें त्यांचे ते चोरटे कटाक्ष एकमेकांना उमगले. त्याबरोबर त्यांनीं ते झटदिशीं वळविले व त्यांची मनांतल्या मनांत लाजतां लाजतां पुरेवाट झाली ! !

भारवीचें ‘ किरातार्जुनीय ’ व माघाचें ‘ शिशुपालवध ’ यांमध्यें विष-

याच्या गांभीर्यामुळेंहि ! ( किंवा कवींच्या वृत्तिगांभीर्यामुळेंहि असेल ! ) विनादाला जागा मिळालेली नाहीं. नाहीं म्हणावयास किरात सर्ग ९ वा व शिशुपाल सर्ग ८ वा व १० वा यांमधील अप्सरांनीं पानमत्त होऊन केलेल्या विनोदी शृंगारचेष्टा व जलक्रीडेंतहि उत्पन्न होणारे विनोदी प्रसंग उल्लेखिले आहेत. पण हा विनोद निव्वळ शृंगाराला आनुषंगिक आहे. तसेंच बिल्हण चरित्रांतहि शशिकला राजकन्या व तिचा गुरु बिल्हण यांमधील शृंगारयुक्त संभाषण चतुर विनोदाचें उत्तम उदाहरण आहे ( श्लो. २८, २९ व ३४ ). यांत कमलिनी व चंद्र ह्यांचें साम्य योजून एकमेकांनीं एकमेकांशीं स्वतांचा भाव व्यक्त करणारीं प्रश्नोत्तरें केलीं आहेत.

श्रीहर्षाच्या ' नैषधचरितां ' त कांहीं वितोदस्थळें सांपडतात. त्यावरून महाकाव्यांत तरी अधिक व चांगला विनोद लिहिणारा श्रीहर्षच असें म्हटलें पाहिजे. त्याच्या ५ व्या सर्गांत असें वर्णन आहे. यम, अग्नि व वरुण हे तिघे ' दमयंती आपल्यास वरील किंवा न वरील ' यासंबंधीं मनांत करीत असलेले विचार मोठे गमतीनें दाखविले आहेत. त्याहिपेक्षां इंद्र, यम, अग्नि व वरुण हे जेव्हां प्रत्यक्ष स्वयंवरासाठीं कुंडिनपुराला आले तेव्हां नळासारखें रूप धारण करतांना त्यांची जी त्रेधातिरपीट उडाली तिचें वर्णन कवीनें चांगल्या विनोदबुद्धीनें दिलें आहे ( सर्ग १०, श्लोक १८ ते २१ ). " कायरे, माझें तोंड आतां नळासारखें हुबेहुब दिसतें ना ? " असें ते आपले चेहरे एकसारखे पालपालटून विचारूं लागले. कोणी आरशांतच स्वतः आपलें तोंड आपण पाहत. प्रथम चंद्राची शोभा तोंडावर आणीत; पण तेंहि जमलें नाहीं म्हणजे उमललेल्या कमलाचें साम्य तोंडावर आणूं पाहत. पण कशानेंहि जमेना.

त्याचप्रमाणें " दमयंतीच्या स्वयंवरास आलेल्या राजपुत्रांत गर्दीमध्यें घुसून सर्वांत पुढें चालणारा ' आपल्यास दमयंती मिळालीच ' अशा ऐटीनें चालूं लागला, व मागच्यांची त्रेधा झाली ती पुसूंच नये. त्याला धड पुढें होऊन दमयंती मिळाल्याचा आनंदहि मिळाला नाहीं, व मागच्या रेट्यामध्यें फुकटच्या फुकट त्याची दामटी मात्र वळली. " ( सर्ग १०, श्लोक ५-६ ) असें वर्णन आहे.

सोळाव्या सर्गांत नलदमयंतीच्या विवाहानंतर राजानें जांवईबुवांस दिलेल्या मेजवानीचें वर्णन आहे ( श्लोक ४८ ते १११ ). यांत वरपक्ष व वधूपक्ष यांमधील मंडळींनीं केलेल्या एकमेकांच्या चेष्टांचें वर्णन आहे. सुंदर स्त्रियांच्या पायांत सरडे सोडून त्यांची फजिती करणें ( ५२ ), कूर्माकाराच्या काष्ठासनावर पुरुषास बसवून त्याची थट्टा करणें ( ५३ ), जेवतांना शाकाहारी व सोंवळ्या लोकांना मांसाशनाची शंका उत्पन्न होईल असे पदार्थ वाढून त्यांची चेष्टा उडविणें ( ८१ ), असे मस्करीचे प्रकार त्यांत सांगितले आहेत. शिवाय लाडू, पायस वगैरे पक्वान्नें पोटांत रिचविलीं जात असतां व सुंदर तरुणी वाढीत असतां जे थट्टेचे प्रकार विलासी पाहुणेमंडळींना सुचणें साहजिक आहे त्यांचेंहि विनोदी वर्णन ( थोडी मर्यादा सोडून ) येथें केलें आहे.

तसेंच १७ व्या सर्गांत पुढील विनोदी स्थल आहे. नलविवाहानंतर देव परत स्वर्गांत चालले असतां त्यांस काम वगैरेच्या कळपांत गुप्तपणें शिरून धर्मनिन्दा करणाऱ्या चार्वाक, बौद्ध इत्यादिकांचे शब्द ऐकूं आले. येथून पुढें ( ३७–८३ ) वेद, ब्राह्मण्य, इंद्रियनिग्रह, मोक्ष, वैराग्य, वगैरे वैदिक धर्मांतील प्रमुख गोष्टी, वेदान्ती, नैय्यायिक, मीमांसकादि दर्शनकार व गंगास्नान करणारे, जपी, तपी इत्यादि धार्मिक यांची मोठी भेदकपणें निन्दा केली आहे. यांतील निन्दा विश्वगुणादर्शचम्पूंतील कृशानूनें केलेल्या निन्देप्रमाणेंच आहे. गङ्गेंत स्नान करून स्वर्गाला जाऊं पाहणाऱ्याची थट्टा पहा:—

"वर स्वर्गांत जाण्यासाठीं हे वेडे लोक **खालीं** प्रवाहांत बुडतात ! त्यामुळें टकरेंत जय मिळविण्यासाठीं प्रथम मागें सरणाऱ्या मेंढ्यांची उपमा यांना द्यावीशी वाटते ! !" ( श्लोक ७१ ) तसेंच पुत्रप्राप्तीसाठीं पुत्रकामेष्ठि करणाऱ्या याज्ञिकांचें वर्णन पहा--"पुत्रकामेष्टि यज्ञांमुळें सुदैवानें यजमानाला मुलगा झालाच तर हे धूर्त म्हणतात कीं, 'पहा आमच्या मंत्राचें सामर्थ्य !--' पण मुलगा झाला नाहीं तरीहि हे म्हणणार कीं, इष्टिला अवश्य असलेली सामग्री ( दक्षिणा वगैरे ) भरपूर नव्हती ! !'"

शृंगारापासून उत्पन्न होणाऱ्या विनोदाचा रघुवंशांतल्याप्रमाणें दुसरा सुंदर

नमुना ' अमरुशतकां 'त पाहावयास सांपडतो. हें शृंगारपर काव्य अमरुक नांवाच्या कवीनें रचलें आहे. संस्कृतांत खण्डकाव्यें म्हणतात तशांपैकीं हें असून यांत नायकनायिकांच्या शृंगाराचे निरनिराळे रमणीय प्रसंग कल्पिले आहेत. स्वतंत्र कथानक असें यांत कांहींच नाहीं. यांतील मुख्य रस शृंगार असून त्यांत स्थलविशेषीं विनोद व करुण यांच्या नाजुक छटा मिसळल्या आहेत.

त्यांतील सोळाव्या श्लोकांत पुढील नाजुक प्रसंग विनोदानें वर्णिला आहे. कोणा एका तरुण नवपरिणित जोडप्यानें एकान्तांत केलेले प्रेमालाप जवळच असलेल्या एका पिंजऱ्यांतल्या पोपटानें ऐकले व दुसरे दिवशीं सकाळीं वडीलधारीं माणसें बसलीं असतां त्यांच्या समोर तो रात्रीं ऐकलेलें जसेंच्या तसें म्हणून दाखवूं लागला. तें ऐकून नववधूला फार लाज वाटली व ह्या पोपटाचें पुढील बोलणें बंद करण्यासाठीं तिनें आपल्या कर्णभूषणांतील तांबडालाल पद्मरागमणि डाळिंबाचा दाणा म्हणून त्याच्या चोंचींत धरावयास दिला !

चवतिसाव्या श्लोकांत नायकानें नायिकेच्या सौन्दर्यामुळें आपल्यावर होणारे परिणाम विनोदानें व प्रांजलपणें सांगितले आहेत. तो म्हणतो, " वास्तविक पाहतां वयानें लहान ती ( बाला ); पण ( तिच्या सौंदर्यानें वेडे होऊन ) पोरकटपणा करतों आम्ही ! ती स्त्री, पण आम्हीच लाजाळू जास्त ! ती पीनपयोधर धारण करते, पण श्रम होतात आम्हांला ! तिचें जघनस्थळ भारदार, पण चालतां येत नाहींसें होतें आम्हांला ! आश्चर्याची गोष्ट ही कीं, दुसऱ्याच्या ठिकाणीं असलेल्या दोषांमुळें आमचे ठायीं व्यंग किंवा न्यून उत्पन्न होतें !" यांतील विनोदाची मौज अशी आहे कीं, जेथें कारण तेथेंच कार्य व्हावयास पाहिजे तें न होतां नायिकेचे ठिकाणीं कारण, तर नायकाचे ठिकाणीं त्याचें कार्य अशी कार्यकारणांतील विसंगति येथें प्रामुख्यानें दाखविली आहे. त्याचप्रमाणें या विसंगतीचा उलगडाहि नायिकेच्या ठिकाणीं असलेल्या नायकाच्या आसक्तीमुळें होतो. या ठिकाणींहि प्रेमाचे आपल्यावर झालेले परिणाम सांगणारा नायकाचा प्रांजलपणा विनोदास कारणीभूत होतो, कीं, ' असंगति ' नांवाच्या वर सांगितलेल्या सुंदर मांडणीनेंच होतो हें वाचकांनींच ठरवावें.

तसेंच, शठ नायकानें मुग्ध नायिकेस फसविण्यासाठीं केलेल्या सर्व हिकमती

हें या काव्यांतील कांहीं श्लोकांतील विनोदाचें बीज आहे. उदाहरणार्थ, ‘**सुप्तोऽयं सखि सुप्यतां**...इत्यादि’ ३७, १९ व ४६ हे श्लोक पाहावे.

सेहेचाळिसाव्या ‘**कान्ते सागसि शापिते**....’ या श्लोकांत तर प्रसंग-निष्ठ विनोद आहे. नायकानें अन्य स्त्रीवर प्रेम दर्शविल्यानें नायिकेचा अप-राध केला. त्यामुळें त्याला तिनें आपल्या घरांतून काढून लाविलें होतें. रात्रीं तो नायिकेकडे तिच्या प्रियसखीच्या वेषांत आला. नायिकेनें नायकास आपल्या घरीं येण्याची बंदी केली ती उगीच रागाच्या भरांत. पण नंतर तिला पश्चात्ताप होऊन ती आपल्या ( नामधारी ) सखीला आपलें खरें मन उलगडून सांगते. त्यावर ती सखी बळेंच म्हणते, “ छे छे ! इतका अपमान केल्यावर तो आतां कसचा अनुकूल होतो ! हें आतां अशक्यच ! ” हें ती सखी ( ? ) म्हणत असतां तिला हसें आवरेनासें झालें व ( तिचा तो होऊन ! ) त्यानें तिला आलिंगिलें तेव्हां तिला खरा प्रकार समजला ! !

अशाच तऱ्हेचा विनोद इतर पुष्कळ स्फुट प्रकरणांमध्यें दिसून येतो. उदाहरणार्थ, पाणपोईवरील तरुणी व रंगेल प्रवासी, कामातुर घरमालकीण व तिचे घरीं रात्रीं उतरावयास आलेले हौशी पांथस्थ, यांच्यांतील शृंगारिक भाषणें मोठ्या विनोदी पद्धतीनें रचिलीं आहेत. त्या सर्वांत अर्थातच श्लेष असतो. आपल्यास प्यावयास पाणी घालणारी तरुणी अधिक वेळ पाणी घालीत उभी राहावी म्हणून पाणी पिणारे गृहस्थ वर डोळे करून पसा पोकळ करून आंत पडलेलें पाणी खालीं सोडून देतात, तर या तरुणानें आपल्याकडे अधिक वेळ वर पाहावें म्हणून तरुणी पाण्याची धार अधिकच बारीक करते ! !

‘ चम्पू ’ म्हणून गद्यपद्यमिश्रित वाङ्मयप्रकार संस्कृतांत आहे. त्यांत नांव घेण्यासारखी विनोदाची छटा ‘ विश्वगुणादर्शचम्पू ’ तच आहे. याचा कर्ता ‘ वेंकटाध्वरि. ’ सदर चम्पूच्या मांडणीवरूनच त्यांत कसल्या प्रकारचा विनोद आहे याची कल्पना येईल. सदर कवीनें जगाकडे दोन भिन्न दृष्टींनीं पाहण्या-साठीं दोन गंधर्व कल्पिले आहेत. ते विमानांत बसून सबंध विश्वाचें अव-लोकन करीत चालले आहेत. त्यांतील ‘ कृशानु ’ नांवाचा गंधर्व दोषैक-

दृष्टि असून दुसरा ‘ विश्वावसु ’ मात्र यच्चयावत् वस्तूचें गुणग्रहण करणारा आहे. नुसती दोषदृष्टि ही विनोदास फारशी उपकारक नाहीं हें खरें. पण दोष दाखविण्या-दाखविण्यांतहि तऱ्हा असतात व ते दाखविण्याच्या पद्धती-मुळेंच विनोद उत्पन्न होतो. तसला विनोद येथें आहे.

पुढील व्याजस्तुतीमधील विनोदाची छटा पहा. कृशानु म्हणतो, “ गंगेच्या पाण्याची काय स्तुति करतोस ? या पाण्याचा उगम हिरण्य चोरणाऱ्याच्या ( १ सोनें, २ हिरण्यकश्यपु ) पायापासून आहे, व ब्रम्ह्याचें डोकें फोडणाऱ्या शंकराचे डोक्यावर गुरु गौतमाच्या स्त्रीशीं ( अहल्येशीं ) दुर्वर्तन करण्याचे कामीं जो इंद्राचा विट झाला त्या दोषानें भरलेल्या चन्द्राच्या बरोबर तें राहतें व अखेरीस समुद्रांत जाऊन पडतें. ” यांत गंगेची वरून निन्दा पण आंतून स्तुतीच आहे ( श्लोक ७५ ).

वैद्यांचें पुढील वर्णन पहाः—“ यांना धातूंची ओळख नाहीं. वैद्यक-ग्रंथाचें यांनीं तोंड पाहिलेलें नाहीं. रोगचिकित्सा यांच्या गांवींहि नाहीं. औषधींच्या गुणधर्माचें ज्ञान असेल तर शपथ ! तरी आपण वैद्यपंचानन आहोंत असें अडाणी लोकांस भासवून यमाच्या दूताप्रमाणें रोग्यांचें धन व प्राण या दोघांचेंहि हरण करतात ! ”

रुद्राभिषेक करणाऱ्या शैवास कृशानु म्हणतो :—“ शंकराचे डोक्यावर गंगेच्या लाटा नेहमीं उसळत असतां व चंद्राच्या अमृताचे लोट चालले असतां अभिषेकाची धार त्याच्या मस्तकावर हे लोक कां धरतात हें समजत नाहीं. ” ( ३२२ )

याच पद्धतीनें नैयायिक ( श्लोक ५५३-५५५ ), वैयाकरण ( ५७० ) राजसेवक ( ५७९ ) इत्यादि लोकांना घेतलेले मार्मिक चिमटे पाहावे. तसेंच महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र इत्यादि देशांचें वर्णनहि चमत्कृतिजनक आहे.

नृसिंहचम्पूमध्यें पुढील अतिशय विनोदी श्लोक आहे. कोणीएक दैत्य प्रल्हादासमोर विष्णूची पुढीलप्रमाणें थट्टा करीत आहे. तो म्हणतो, “ जेव्हां वन्ध्यासुताचा पुत्र नपुंसकाच्या नातीशीं लग्न करील, जेव्हां आंधळा आकाशकमलवन पाहूं शकेल, जेव्हां मुक्याचें गाणें सर्प आपल्या कानानें आनन्दानें ऐकेल ( सापाला कान नसतात ! ) तेव्हांच कदाचित् तुझा विष्णु ज्याला तूं अत्यन्त प्रकाशमान् समजतोस, तो दिसूं लागेल. ”

येथें सर्वच पदार्थ अभावात्मक आहेत, व त्यांची सांगड मात्र मोठ्या मार्मिक तऱ्हेनें घातली आहे. विष्णु प्रगट होईल हें म्हणणें ह्यापेक्षां अधिक हास्यास्पद ठरवितां आलें नसतें. हा श्लोक विशेष चांगला असल्यामुळें खालीं दिला आहे.

**वन्ध्यासूनुसुताङ्गजः परिणयेत् क्लीबात्मजानन्दिनीं**
**व्योमांभोरुहवाटिकां यदि पुनर्व्यालोकयेदधकः ।**
**कर्णाभ्यां यदि मूकगीतमुरगः सानन्दमाकर्णयेत्**
**सर्वालोकशिरोमणिस्तव हरिः स्पष्टः कदाचित् भवेत् ॥**

—नृसिंहचम्पू, तृ. स्तबक, पद्य २.

भारतचम्पू, रामायणचम्पू वगैरे चपूंतूनहि क्वचित् क्वचित् अशा प्रकारचा विनोद आढळतो. पण तो फारच विरळ.

‘ काव्यमाले ’ मध्यें उत्प्रेक्षावल्लभ कवीनें रचिलेलें ‘ भिक्षाटण ’ काव्य छापिलेलें आहे. तोहि एक विनोदी काव्याचा नमुना आहे. शंकर विचित्र वेषानें इंद्राच्या नगरींत भिक्षा मागण्यासाठीं गेलेले आहेत, त्यांस पाहून तेथील सुंदरींच्या मनांत आलेल्या कल्पना बऱ्याच प्रकरणांतून दिल्या आहेत. नंतर पार्वती व गंगा यांच्याशीं आलेले शंकराचें क्वचित् शृंगारिक व विनोदी प्रसंगवर्णन केलेलें आहे. अशींच इतरहि कांहीं बारीक सारीक काव्यें संस्कृतांत अनेक असतील. पण केवळ प्रसिद्ध आणि प्रतिनिधिभूत अशाच काव्यांचा विचार सदर ठिकाणीं करावा लागला.

‘ माहीष- शतक ’ नांवाचें एक काव्य संस्कृतांत आहे. तें बाळशास्त्री नांवाच्या पंडितानें लिहिलेलें असून त्यांत उपरोधिक विनोदाचा उत्तम नमुना पाहावयास मिळतो. काव्यांत रेड्यांची स्तुति शंभर पद्यांत केली आहे. त्यांतून मूर्ख राजे व त्यांभोंवतालचे शतमूर्ख मंत्री यांची उपहासगर्भ निंदा सूचित केली आहे. कवीला हें काव्य रचण्यास कोणती परिस्थिति कारण झाली हें त्यानेंच आपल्या काव्यांत व्यक्त केलें आहे, तें असें:— सदर बाळशास्त्री हा भोंसल्याच्या नागपूर नांवाच्या राजधानींत राहणारा

असून लहानपणींच सर्व विद्येंत पारंगत होता. त्याची कीर्ति ऐकून श्रीरंगपट्टणच्या राजानें त्यास एकदां आपल्या नगरास नेलें. तेथें आपल्या गांवांतील पंडित बोलावून त्यानें त्यांच्याशीं याचा वाद करविला. त्यांत यानें सर्व पंडितांचा तात्काळ पराभव केला. त्यामुळें त्या राजानें सदर कवीस आपल्या दरबारीं ठेवून घेतलें. त्याचें वर्चस्व सहन न झाल्यामुळें तेथील अधिकाऱ्यांनीं त्याच्याबद्दल राजाजवळ चुगल्या करून व राजाचे कान भरून त्यास तेथून हुसकावून लावलें. त्यामुळें कवीस उद्वेग येऊन त्या मूर्ख लोकांच्या राज्याचा त्यानें त्याग केला व तेव्हांपासून तो शेतकी करूं लागला. त्याची शेतकी चांगली चालूं लागली. तेथेंहि येऊन त्या अधिकाऱ्यांनीं त्याचें शेत लुटलें. ह्या त्यांच्या छळाबद्दल कवीला त्यांचें पारिपत्य करण्याचा एकच मार्ग मोकळा होता, तो म्हणजे काव्य रचण्याचा. त्याप्रमाणें आपली चीड त्यानें सदर माहीष-शतकांत उपरोधिकपणें व्यक्त केली आहे. ( पहिल्या १५ श्लोकांत हा कथाभाग कवीनेंच वर्णिला आहे. )

"हे रेड्या, मूर्ख राजे, अन्यायी अधिकारी व मत्सरग्रस्त पंडित यांच्या ठिकाणीं असणारे दुर्गुण तुझ्या ठिकाणीं नाहींत; तसेंच त्यांचें दर्शन तुला होत नाहीं, म्हणून, हे रेड्या, तूं धन्य आहेस." इत्यादि स्तुति करून बाळशास्त्री त्याला म्हणतात, "आपल्या देहाला नाना कष्ट देऊन तूं पिकविलेलें धान्य अधिकारी लोक येऊन एकदम घेऊन जातात. त्यावर अगदीं घरच्यासारखा हक्क दाखवितात. याचा हेतु, हे महिषा, माझ्या लक्षांत आला. इतक्या हक्कानें मुलेंच बापाच्या घरचें नेतील !" ( २६ श्लोक ) प्रत्यक्ष कठोर दंडापेक्षां वाग्दंड किती तीक्ष्ण व चिरपरिणामी असतो याचें हा श्लोक चांगलेंच उदाहरण नाहीं काय ?

यानंतर कवीनें राजाची रेड्याशीं तुलना करून राजापेक्षांहि त्यास श्रेष्ठ ठरविला आहे. तो म्हणतो, "मूर्ख राजांना राज्याभिषेक करून त्यांच्याकडून प्रजेनें त्रास सोसण्यापेक्षां तुलाच जर तो अभिषेक केला ( धुतलें ) तर तूं प्रजेचें अधिक चांगलें रक्षण करशील. तुला राजा म्हणावयास कोणतीच हरकत नाहीं. तुझ्याभोंवतीं राजाप्रमाणें 'महिषी' असतात, तुलाहि

'अभिषेक' करण्यांत येतो. तुझ्यावरहि 'चवऱ्या' (शेंपट्यांच्या) ढाळण्यांत येतात. तूंहि जग राजाप्रमाणेंच 'तृणप्राय' समजतोस. (राजे उन्मत्तपणें प्रजेला तुच्छ लेखतात व रेड्यास जगांत आपलें भक्ष्य गवत हेंच दिसतें.)"

यानंतर कवीनें श्लेषालङ्काराच्या जोरावर रेड्यास, यजुर्वेद म्हणणाऱ्या ब्राह्मणाची, तप्त मुद्रा धारण करणाऱ्या मध्वाचार्यांची, कोळशाची रेषा लावणाऱ्या वैष्णवांची, यज्ञांतील यजमानाची वगैरे ज्या उपमा दिल्या आहेत त्या विनोदाच्या दृष्टीनें फारच मनोहर आहेत. कवीनें रेड्यास याच पद्धतीनें इन्द्र ठरविलें आहे, मदन कल्पिलें आहे. शाळिग्राम मानिलें आहे, पण त्या सर्वांत परब्रह्माशीं दाखविलेलें रेड्याचें साम्य विशेषच आहे. (श्लोक ४०) ब्रह्म श्रवणमननादिकांनीं कळतें, तें सत्य आणि ज्ञानमय आहे, बृहदारण्यकांत त्याची चर्चा केली आहे व तैत्तिरीयोपनिषदांत आनन्दमय वाक्यामध्यें 'ब्रह्मपुच्छं प्रतिष्ठा' म्हणजे ब्रह्मावर दृश्य जगाचा अध्यारोप केला आहे असे उपनिषदांतील सर्व उल्लेख ध्यानांत घेऊन श्लेषानें हेंच वर्णन कवीनें रेड्यास लाविलें आहे. कारण रेडाहि श्रवणानें (कान धरून) साध्य होतो. तोहि बृहदारण्याकांत (मोठ्या अरण्यांत) आढळतो. त्यासहि पुच्छ आहे.

याप्रमाणें ठिकठिकाणीं रेड्याचा मोठेपणा व त्याच्या तुलनेनें राजा आणि मंत्रिमंडळ यांची क्षुद्रता प्रकट केलेली आहे. एका ठिकाणीं तर (श्लोक ९८) राजमंदिराची रेड्याच्या गोठ्याशीं, कस्तुरीची शेणाशीं, बुक्याची गोठ्याच्या धुळीशीं, तुलना केली आहे. रेड्यानें लोकांवर निर्हेतुक उपकार केलेले असल्यामुळें त्याला मिळालेला मोठेपणा राजाला मिळालेल्या मोठेपणापेक्षां अधिक असतो असें सांगितलें आहे. अखेरीस हे क्रुद्ध कविराज उपरोधानें म्हणतात, "एखाद्या राजाचें दर्शन घेण्यापेक्षां, पुढें वर्णन केलेला रेडाच माझ्या नेत्राला अधिक आनंद देईल." सदर महिषराज कुरणामध्यें महिषीजनांसमवेत प्रणयक्रीडा करीत असतां आपल्या जातीला योग्य अशा प्रकारच्या—हुंगणें, दांत विचकणें, खुरांनीं

जमीन उकरणें, रेकणें, इत्यादि–क्रिया करीत आहे; व यथेच्छ विलास करीत आहे. ( श्लोक १०४ ) या श्लोकांत ' स्वभावोक्ति अलङ्कार ' अतिशय उत्कृष्ट साधला आहे. यांत जी थोडी अश्लीलतेची छटा दिसतें तिचें कारण कवीला अश्लील वर्णन करावयाचें होतें असें नसून असल्या कर्मांत गुंतलेला रेडाहि माझ्या नेत्रांना राजापेक्षां अधिक आनन्द देतो असें म्हणावयाचें आहे हें होय.

संस्कृतांत ज्याला ' अन्योक्तिप्रकरण ' म्हणतात त्यांतहि वरीलप्रमाणेंच उपरोधगर्भ विनोद असतो. उदाहरणार्थ, सिंहाची बरोबरी केवळ बाह्य वेषानें करूं पाहणाऱ्या कुत्र्याची निन्दा एका श्लोकांत केली आहे, व त्यांतील अधिक मौज ही कीं, त्या कुत्र्याच्या अप्रस्तुत वर्णनापासून प्रस्तुत जो तसला मनुष्य त्याचा उपहास या ठिकाणीं केलेला आहे. ' **आबद्धकृत्रिमसटा...** ' इत्यादि श्लोक पहा. स्वतंत्रपणें व एकत्र दिलेल्या अशा अन्योक्ति जगन्नाथ राय पंडितांच्या भामिनीविलासांत सांपडतात. त्यांत कांहीं विनोदीहि आहेत. उदाहरणार्थ, त्यांनी माकडांच्या सभेचें केलेलें वर्णन पहाः " माकडांच्या सभेंत झाडांच्या फांद्या हींच मृदु आसनें, दातांनीं आणि नखांनीं एकमेकांस ओरखडणें हाच स्वागतादि आदरसत्कार, व चींचीं शब्द करणें हेंच वक्तृत्व ! ! " इतरहि पुष्कळ स्फुट अन्योक्ति आहेत.

हत्तीची खरी किंमत न ओळखतां खेडेगांवांतील कांहीं अडाणी धंदेवाले लोक हत्तीवर पुढील शेरे मारीत आहेतः " धनगर--अरे ! याच्या अंगावर लोंकर नाहीं " " कुंभार--हा ओझीं वाहून नेण्याच्या किंवा बसण्याच्याहि लायखीचा नाहीं ! " ( त्यापेक्षां त्याचें वाहनच त्याला आपलें बरें ! ) " एक हिशेबी कंजूष गृहस्थ–याच्या पोटांत गवताचे भारेच्या भारे रिचविले तरी पत्ता लागावयाचा नाहीं–शिवाय याच्या पाठीवर गोणी चढवावयाची म्हटलें तरी कोण त्रास !! " सर्वांचा एकमतानें निर्णय – " उगीच कां वेळ घालवतां या चर्चेंत ? याला कवडीला सुद्धां कोणी घेणार नाहीं. " हा त्या हत्तीचा उपहास आहे कां त्या गांवढेकरांचाच, हें वाचक ठरवतीलच ! ( या श्लोकाचा आरंभ " **ऊर्णां नैष बिभर्ति** " असा आहे. )

याचप्रमाणें राजहंसाचा उपहास करतां करतां आपल्यासच हास्यास्पद करून घेणाऱ्या बगळयाबद्दलची अशीच एक विनोदी अन्योक्ति प्रसिद्ध आहे. ( तिचा आरंभ " **कस्त्वं लोहितलोचनास्य** " असा आहे. )

अन्योक्तीच्या खालोखाल काव्यशास्त्रविनोदाचा एक नमुना पाहावयास सांपडतो. या विनोदप्रकारांत थोडी बुद्धीची कसरत आवश्यक असते. उदाहरणार्थ, समस्याप्रकरणच घ्या. यांत वरून दिसावयास अत्यंत हास्यास्पद, अनुभवाला विरोधी व क्वचित् निरर्थक असा एक श्लोकाचा शेवटचा चरण देतात व त्या शेवटच्या असम्बद्ध चरणाला साजेल, म्हणजे तो सार्थ होईल अशा अर्थाचे पहिले तीन चरण रचून कोणीतरी घालावयाचे असतात. सर्व प्रकार विनोदमिश्रित बौद्धिक आनन्द देणारा आहे. उदाहरणार्थ, ' मांजरानें शंकरास खाल्लें ' ( **ओतुना भक्षितः शिवः** ) हें चमत्कारिक विधान कसें संभवनीय आहे तें दाखवा, असा प्रश्न. त्यावर पुढील उत्तर—

कोणी एका शिवभक्तानें पार्थिवपूजेसाठीं लोण्याचें शिवलिङ्ग केलें व तें पाटावर ठेवून पूजासामग्री आणावयास तो जरा पलीकडे गेला. त्याच्या या थोड्याशा दुर्लक्षाचा फायदा घेऊन येथें टपून बसलेल्या बोकोबानें शिवलिङ्ग मटकालें ! झाली समस्या पूर्ण ! !

**नवनीतमयं लिंगं पूजार्थं केनाचित् कृतम् ।**
**पूजकस्य प्रमादेन ओतुना भक्षितः शिवः ॥**

एकदां भोजराजाच्या पंडितसभेंत पंडितांसमोर पुढील समस्या टाकिली गेली : ' **अम्भोधिर्जलधिः पयोधिरुदधिर्वारांन्निधिर्वारिधिः** ' हीं तर उघड समुद्राचीं सहा नांवें आहेत. पण इतरांनीं हात टेकले असतां कालिदासानें यांस जुळतील असे पहिले तीन चरण घालून दाखविले आहेत, असें भोजप्रबन्धांत वर्णन आहे. त्याचा तात्पर्यार्थ असा—

एकदां षडानन शंकरास म्हणाला, " बाबा, आई फार रागावते. तेव्हां तुमच्या डोक्यावर असलेली ही गंगा एकदांची टाकून द्यानात. " मुलानें

आपणांस अशा तऱ्हेनें शिकवावें याचा शंकरांना थोडासा राग आला. पण ही गोष्ट समजावून सांगितली तर समजेल इतका मुलगा मोठा आहे असें समजून शंकर म्हणतात, " अहो विद्वान्, ही गंगा मजवर बरेच दिवस अनुरक्त आहे. तिला जर मी आपण म्हणतां तशी टाकून दिली तर तिला गति काय ? " तिची गति काय याचें साधें उत्तर आपल्या वडिलांना सुचूं नये किंवा तिच्या आसक्तीमुळें त्यांनीं वेड पांघरावें याचा राग येऊन षडानन दर तोंडानें एक एक असें सहाहि तोंडांनीं उद्गारले, "गंगेची गति सागर !"

**अम्बा कुप्यति तात मूर्ध्नि विधृता गङ्गेयमुत्सृज्यतां**
**विद्वन्षणमुख सन्ततं मयि रता तस्या गतिः का वद ।**
**कोपावेशवशादशेषवदनैः प्रत्युत्तरं दत्तवान्**
**पाथोधिर्जलधिः पयोधिरुदधिर्वारांनिधिर्वारिधिः ॥**

समस्येप्रमाणेंच ' प्रहेलिका ' म्हणजे मराठींत मुली एकमेकींना कांहीं मौजेचे उखाणे घालतात त्यासारखा कांहीं मौजेचा प्रकार संस्कृतांत आहे. उदाहरणार्थ, दांत नसून खडे खातो, निर्जीव असून बडबडतो, आणि गुण असून दुसऱ्याच्या पायानें चालतो तो कोण ?–जोडा !

**दन्तैर्हीनः शिलाभक्षी निर्जीवो बहुभाषकः ।**
**गुणस्यूतिसमृद्धोऽपि परपादेन गच्छति ॥**

' अपन्हुति म्हणून एक असाच मौजेचा प्रकार आहे. यांत श्लिष्ट शब्दांच्या योजनेनें अशी खुबीदार रचना केलेली असते कीं, श्लोक ऐकल्याबरोबर तें अमक्याचें वर्णन असावें असा अदमास वाचकाच प्रथम होतो. पण वर्णन करणारा त्यांतूनच वेगळेंच उत्तर सांगतो. उदाहरणार्थ,

एक तरुणी आपल्या सखीस म्हणते, " अगे, तो फार रागी ( अनुरक्त ) आहे. माझी झोंप मोडतो. अंथरूण सोडून कसा तो दूर जातच नाहीं. आणि निष्ठुरपणानें दंशहि करतो. ". वरील वर्णनावरून सखीच्या मनांत सदर तरुणीच्या हौशी नवऱ्याची कल्पना आली, व तिनें तिला विचारलें,

" अग, चतुर पोरी, हें सर्व करणारा तुझा वल्लभच ना ? " त्यावर हंसून ती तरुणी तिला म्हणते, " हा वेडे, भलतेंच समजलीस ! अग, मी ढेंकणांच्या समुदायाचें वर्णन करीत होतें ! "

तसेंच कांहीं विनोदी कूटें ( कोडीं ) अंतरालाप व बहिरालाप, विनोदी प्रश्नोत्तरें, मात्रच्युतकें, बिंदुच्युतकें वगैरे प्रकार संस्कृतांत आहेत, पण त्यांत विनोदापेक्षां शोधक बुद्धीस व चतुरतेस अधिक वाव असल्यामुळें त्यास पूर्णपणें विनोदी म्हणतां येत नाहीं. कोटीबाज प्रश्नोत्तरांचें एकच उदाहरण पुढें देतों :—कोणीएक नायक एका मानिनी नायिकेस विचारतो, " तुझी अशी ही दारुण ( निष्ठुर ) बुद्धि कोणीं उत्पन्न केली ? " यावर दुसऱ्या चरणांत ती उत्तर करते, " मी आजपर्यंत सात्त्विक, राजस व तामस अशी त्रिगुण बुद्धि ऐकिली आहे, पण दारुमयी ( लाकडाची ) बुद्धि मी ऐकिली नाहीं. "

**अहो केनेदृशी बुद्धिर्दारुणा तव निर्मिता।**
**त्रिगुणा श्रूयते बुद्धिर्न तु दारुमयी क्वचित्** ॥

असाच शृङ्गाराश्रित विनोद जयदेवाच्या सुप्रसिद्ध ' गीतगोविंद ' या काव्यांत आहे. वञ्चिता, मुग्धा हे जे नायिकाप्रकार तेथें वर्णिले आहेत त्यांत अशा तऱ्हेचा विनोद आढळतो. तसेंच वैद्यक ग्रंथ लिहीत असतांहि ज्यांची रसिकता व विनोदी वृत्ति उचल खाते असे लोलिंबराज नांवाचे एक वैद्य व कवीहि होऊन गेले. त्यांनीं ' वैद्य जीवन ' नांवाच्या आपल्या ग्रंथांत रोगांवर औषधें सांगतां सांगतां शृंगारमिश्रित विनोदाच्या मात्रेचे वळसे त्यांत उगाळले आहेत. ते म्हणतात, " हें आम्हीं सांगितलेलें औषध रोग्यानें घेतलें तर त्याचा रोग तात्काळ पळून जाईल. कसा ? तर एकाद्या लावण्यवतीला पाहिल्याबरोबर एकाद्या संभावित म्हणविणाऱ्याचा सभ्यपणा किंवा आत्मसंयम ( साधुभावः ) जसा क्षणांत लयाला जातो त्याप्रमाणें ! ! " हा सबंध ग्रंथच त्यांनीं आपल्या प्रियेस उद्देशून लिहिला आहे व जागोजाग वर दाखविल्याप्रमाणें शृंगारिक उपमा-दृष्टान्त देऊन विनोद उत्पन्न केला आहे. वैद्यकासारख्या गंभीर विषयांत असले दृष्टान्त आणण्याची ही कल्पनाच मुळीं विनोदी आहे.

अगदीं अलीकडे होऊन गेलेल्या विठोबा अण्णा दप्तरदारांच्या ‘ सुश्लोक लाघवां’तील कांहीं सुभाषितें विनोदी आहेत, पण त्यांतील विनोद श्लेषाच्या किल्लीनेंच उघडावा लागतो. उदाहरणार्थ, जर्दा ( तंबाखू ) याचें पुढील वर्णन पहाः—

**जनार्दनो नरहितो भूत्वाऽऽकार-विपर्ययात् ।**
**अवतीर्ण इव प्रायः स जर्दैत्यभिधीयते ॥**

जर्दा हा माणसांच्या हितासाठीं पृथ्वीवर अवतीर्ण झालेला जनार्दनच आहे. फक्त त्यांतील ‘ न ’ वगळावें व ‘ आ ’काराची उलटापालट करावी म्हणजे ‘ ज आर्द ’ याचें ‘ जर्दा ’ करावें.

मांजराचें पुढील वर्णन पहाः—

**अमृतैकलालसात्मा, विगतस्नेहः स्वकार्भकेष्वपि यः**
**गिरिकाननासनोऽयं, मार्जारः संयमीव मे भाति ॥**

मांजर ( बोका ) हा एक मोठा योगीच असतो. योगी हा अमृताची म्हणजे मोक्षाची आशा धरतो. स्वतःच्या अपत्यावरहि त्याची आसक्ति नसते व तो गवतांतून व अरण्यांतून राहतो. त्याचप्रमाणें बोकोबाहि अमृतावर म्हणजे दुधावर टपलेले असतात. स्वतःच्या जातीचीं पोरें ते मटकावतात व ‘ गिरिका ’ म्हणजे उंदराचीं पोरें वगैरेंचा नाश करतात.

या दोन नमुन्यांवरून ‘ सुश्लोक लाघवांतील श्लिष्ट, लेखनपद्धतीची वाचकांस कल्पना होईल.

स्फुट सुभाषितें हें संस्कृत वाङ्मयाचें मोठें वैभव आहे. ‘ सुभाषित ’ असा वाङ्मयाचा स्वतंत्र प्रकार तीं रचणाऱ्या कवींनीं जरी कल्पिला नसला तरी हल्लीं तो एका स्वतंत्र व उच्च पदवीस पोहोंचला आहे. यांतील कांहीं सुभाषितें काव्य-नाटकादिकांतून ओघाओघानें आलीं आहेत तर कांहीं क्वचित् प्रसङ्गानुरूप स्वतंत्रहि रचलीं असतील. पण सामान्यतः सुभाषितांच्या स्वरूपाकडे पाहिलें तर त्यांस संस्कृत वाङ्मयवृक्षाचा मनोहर फुलोरा म्हणावयास हरकत नाहीं. शिवाय सुभाषितें हीं स्वयंपूर्ण, सुटसुटीत व हरतऱ्हेच्या

प्रसङ्गीं उपयोगी पडणारीं असल्याकारणानें तीं खिशांतल्या बॅटरीसारखीं आहेत. बॅटरी जशी जरूर तेथें जरूर तेवढाच प्रकाश पाडते व तिला वाळगावयाचे श्रमहि फार लागत नाहींत त्याप्रमाणें सुभाषितांचें आहे. काव्यांतील असा एकहि रस नाहीं, व्यवहारांतील असा एकहि विषय नाहीं कीं जो संस्कृत सुभाषितांतून रमणीय तऱ्हेनें व्यक्त झालेला नाहीं. सुभाषितांत बोध आहे, मोद आहे, करमणूक आहे, मनःसमाधान आहे, ज्ञान आहे, काय नाहीं हेंच सांगतां येत नाहीं.

सुभाषितें हा स्वतंत्र वाङ्‌मयप्रकार नव्हे असें वर सांगितलेंच. त्यामुळें त्याचें स्वतंत्र लक्षण कोठेंहि केलेलें नाहीं. बाणाच्या कादंबरींत एकदोन ठिकाणीं पोपटास उद्देशून व उज्जयनींतील लोकांसंबंधानें "ते सुभाषितांचें अध्ययन करणारे होते" असें म्हटलें आहे. म्हणून सर्व सुभाषितें नजरेसमोर धरून बनविलेलें सुभाषितांचें व्यापक लक्षण आम्ही पुढें देत आहींत :

**वाक्यं हृद्यरसं विभिन्नविषयं बुद्धेः समुद्भासकं**
**सिद्धान्तोहनतत्परं सुचतुरं वक्रोक्तिरम्यं लघु।**
**गुर्वर्थं व्यवहार-पाटव-घनं श्लिष्टं स्वयं-बोधकम्**
**संकीर्णं सुपदं सुभाषितमिति प्राहुः पुरावेदिनः ॥ १ ॥**

अशा तऱ्हेच्या असंख्य बहुगुणी व व्यापक सुभाषितांत विनोदाच्या वांट्याला आलेलीं सुभाषितें कांहीं थोडींथोडकीं नाहींत. त्यांतील कांहीं वक्रोक्तीनें रम्य वाटणारीं, मार्मिक व विनोदी सुभाषितें नमुन्यासाठीं पुढें देतों.

केवळ 'अम्बर' (वस्त्र व आकाश) या शब्दावरील श्लेषामुळें केवढी विनोदी कल्पना पुढील श्लोकांत कवीस सुचली आहे पहाः—

सूर्य आणि चन्द्र यांच्या दारिद्र्याबद्दलची गोष्ट मोठ्या लोकांपुढें काय बरें सांगावी ? दोघेजण मिळून एकच वस्त्र ( अम्बर ), दिवसा एक व रात्रीं दुसरा असें आळीपाळीनें वापरतात.

**किं वाच्यं सूर्यशशिनोः दारिद्र्यं महतां पुरः ।**
**दिनरात्रिविभागेन परिधत्तो यदम्बरम् ॥**

खोंचक उपरोधाचा पुढील नमुना पहा.

श्रीमंत लोक मूर्ख असतात, यावर सुभाषितकारानें पुढीलप्रमाणें संभावित चिमटा कसा घेतला आहे पहा:-लक्ष्मीची पतिभक्ति केवढी जाज्वल्य म्हणून सांगूं ? लहानपणीं आपल्या पतीनें ( कृष्णानें ) गाईबैलांसमवेत क्रीडा केली म्हणून अजूनहि ती गाईबैलांइतपतच ज्यांची बुद्धि आहे अशांच्या संगतींत रमत असते.

**गोभिः क्रीडितवान कृष्ण इति गोसमबुद्धिभिः ।**
**क्रीडत्यद्यापि सा लक्ष्मीः अहो देवी पतिव्रता ॥**

एका तमाखुभक्तानें मारलेली लोणकडी थाप. तो म्हणतो, "पूर्वीं इन्द्रानें ब्रह्मदेवाला विचारलें कीं, 'काय हो, त्रिभुवनांत अत्यन्त श्रेष्ठ अशी वस्तु कोणती ?' तेव्हां एकदम चारी तोंडांनीं ब्रह्मदेव उत्तर करतात, 'तमाखुच, तमाखुच !!'"

कोणत्याहि वस्तूचें माहात्म्य वाढविण्यास तिचा संबंध देवादिकांशीं आणण्याची जी आमची प्रवृत्ति, तिजवरहि ही कदाचित् विनोदी टीका असेल.

**बिडौजाः पुरा पृष्टवान् पद्मयोनिं**
**धरित्रीतले सारभूतं किमस्ति ।**
**चतुर्भिर्मुखैरित्यवोचद्विरिञ्चिः-**
**स्तमाखुस्तमाखुस्तमाखुस्तमाखुः ॥**

याच पद्धतीनें एकादा पारकरच्या फौंटनपेनाचा एजंट म्हणेल कीं, "गणेश जेव्हां व्यासांनीं सांगितलेलें महाभारत लिहीत होते त्या वेळीं त्यांनीं हेंच पेन वापरलें व तें सर्वश्रेष्ठ म्हणून संतोषानें मोठा चीत्कारशब्द केला."

स्वतःचें दुःख गिळून त्यावर विनोद करण्याइततप मनाची शान्ति ठेवणाऱ्या एका दरिद्र्याचे पुढील उद्गार पहा.

हे दारिद्र्या, तुला नमस्कार असो. तुझ्या प्रसादानें मी गूढविद्या जाणणारा सिद्ध बनलों आहें. मला सगळें जग दिसतें, पण मी मात्र कोणासच दिसत नाहीं.

**भो दारिद्र्य नमस्तुभ्यं सिद्धोऽहं त्वत्प्रसादतः ।**
**पश्याम्यहं जगत् सर्वं न मां पश्यति कश्चन ॥**

थोडासा अतिशयोक्तिपूर्ण उपहासाचा एक नमुना. थोडक्या विद्येवर झटपट रंगारीपणा करून महापण्डित म्हणून मिरविणाऱ्या गृहस्थांची पुढील अध्ययनपद्धति पहा—

हे आले कुक्कुटमिश्र नांवाचे परमपूज्य जाडे विद्वान् ! यांच्या अध्ययना-विषयीं म्हणाल तर यांनीं गुरुगृहीं तब्बल पांच दिवस राहून तें केलें आहे. वेदान्तशास्त्राच्या अध्ययनांत पुरे तीन दिवस घालविले आहेत व तर्क-शास्त्राचा दुरून चांगला वास घेतला आहे. (त्यामुळें तर्कशास्त्राचा गंध यांना नाहीं असें म्हणण्याची कोणाची छाती नाहीं !)

**गुरोर्गिरः पञ्च दिनान्यधीत्य वेदान्तशास्त्राणि दिनत्रयं च ।**
**अमी समाघ्राय च तर्कवादान् समागताः कुक्कुटमिश्रपादाः ॥**

रात्रभर ढेंकणाच्या चावण्यामुळें वैतागलेल्या एका गृहस्थानें आपला राग विनोदानें पुढीलप्रमाणें व्यक्त केला आहे. तो म्हणतोः—" लक्ष्मी कमलावर राहते, शंकर हिमालयाचा आश्रय करतो व विष्णु क्षीरसागरांत शेषावर पहुडला आहे. या सर्वांनीं गार पाण्याचा आश्रय आवर्जून केला याचें कारण माझ्या मतें त्यांना ढेंकणांनीं सतावून सोडलें असावें."

आपल्या पित्याच्या मरणाबद्दल शोक करतांनासुद्धां आपल्या वेषभूषेंत बिघाड होईल म्हणून अधिक दक्षता बाळगणाऱ्या एका वेश्येचा पुढील उपहास पहा.

कुणी एका वेश्येनें नुकताच विडा खाऊन ओंठ रंगविले होते. इतक्यांत तिचे वडील वारल्याचें तिला समजलें व ती त्यांच्याबद्दल शोक करूं लागली. पण तिनें अशी दक्षता घेतली कीं, 'पितः' (हे बाबा) हा ओष्ठवर्णी शब्द वापरण्यापेक्षां शोकाचे वेळीं 'हे तात' (दन्त्य) असेंच म्हणावें. कारण 'पितर्' शब्दाचे उच्चाराचे वेळीं ओठ एकमेकांस लागून ओंठाच्या रंगाचा नाश व्हावयाचा !

**उपभुक्तखदिरवीटकजनिताधररागभङ्गभयात् ।**
**पितरि मृतेऽपि हि वेश्या रोदिति ' हा तात तातेति ॥ १ ॥**

तसेंच व्याकरणपरिभाषेचा उपयोग करून केलेला विनोद पुढील सुभाषितांत आहे.

पाणिनीनें ' मनस् ' ( मन ) हा शब्द नपुंसकलिंगी म्हणून दिला. त्यामुळें मोठ्या विश्वासानें त्यास आम्हीं प्रियेकडे धाडलें. पण तें बेटें तेथेंच रमून राहिलें. काय करावें ? पाणिनीनें आमचा विश्वासघात कीं हो केला ! !

**नपुंसकमिति ज्ञात्वा प्रियायै प्रेषितं मनः ।**
**तत्तु तत्रैव रमते, हताः पाणिनिना वयम् ॥**

कोणी दरिद्री कवि आपलें व राजाचें साम्य मोठ्या चमत्कृतिपूर्ण पद्धतीनें सांगतो आहे. तो म्हणतो, " राजा, तूं व मी दोघेहि ' लोकनाथ 'च आहों. फरक एवढाच कीं, माझ्या वेळीं लोकनाथ हा समास ' लोक आहेत नाथ ज्याचे ' ( म्हणजे भिकारी ) असा बहुव्रीहि समजून सोडवावयाचा व तुझ्या वेळीं मात्र तो ' लोकांचा नाथ ' असा षष्ठी तत्पुरुष म्हणून सोडवावयाचा ! ! "

**अहं च त्वं च राजेंद्र लोकनाथावुभावपि ॥**
**बहुव्रीहिरहं राजन् ! षष्ठीतत्पुरुषो भवान् ॥**

या तऱ्हेनें अनेक प्रकारचीं मनोरम सुभाषितें संस्कृतांत आहेत. कोठें शब्दश्लेष, कोठें अर्थश्लेष, कोठे सभंग श्लेष तर कोठें अभंग श्लेष अशीं श्लेषावर आधारलेलीं कोटीवजा सुभाषितें तर फार आहेत. वर कांहीं नमुनेच दाखविले आहेत. यापेक्षां या प्रकरणाचा अधिक विस्तार करतां येत नाहीं.

' **कलिविडम्बन** ' म्हणून एक छोटेंसें शंभर श्लोकी काव्य **नीलकण्ठ दीक्षितानें** रचलेलें आहे. तें आकारानें जितकें लहान तितकेंच तें अन्तर्गत गुणांमुळें मोठें आहे. यांत कवीनें भोंवतालच्या व्यवहारावर मर्मभेदी, खोंचदार

विनोदी टीका केली आहे. हें काव्य वाचीत असतां वाचकांच्या मनश्चक्षूंपुढें जगांतील दंभाचा, गौप्याचा व असत्याचा स्फोट मिस्किलपणें व हंसत हंसत करणारी, डोळे मिचकावून वक्रोक्तीनें बोलणारी, कोणास शालजोडी तर कोणास शालजोडींतला अहेर करणारी दीक्षितांची मूर्ति स्पष्टपणें उभी राहते !

आपल्या बाजूस सत्य किंवा शहाणपण याचा लवलेशहि नसतां केवळ गुंडगिरीनें सभा कशी जिंकावी याचा उपदेश दीक्षित धीट चळवळयांना पुढीलप्रमाणें करीत आहेतः—

**न भेतव्यं, न बोद्धव्यं, न श्राव्यं वादिनो वचः**
**झटिति प्रतिवक्तव्यं सभासु विजिगीषुभिः ॥ १ ॥**

" कोणासहि डरूं नये, प्रतिपक्षाचें म्हणणें आडमुठेपणाच्या बहाण्यानें समजूनच घेऊं नये. इतकेंच नव्हे, तर तें धड ऐकूनहि घेऊं नये ! कांहींहि उत्तर तात्काळ ठोकून द्यावें म्हणजे सभेंत जय ठेवलेला ! ! " तसेंच ते पुढें म्हणतात, " मोठ्यानें बोलावें, टर उडविण्यास मोठ्यानें हंसावें म्हणजे आपण विजयी झालों असें भासतें ! "

वरील पद्धतीची उपरोधिक टीका सदर काव्यांत सर्ववर्गावर केली आहे. त्यांत वैद्य, ज्योतिषी, मांत्रिक, कवि, शिष्य, गुरु, वगैरे झाडून साऱ्यांची हजेरी घेतली आहे. बुवाबाजीवरचा दीक्षितांचा हल्ला तर हल्लींच्या दम्भ-स्फोटाचे काळीं प्रत्येकानें वाचण्यासारखा आहे. " तोंडांत ' ब्रह्मवाद, ' हातांत रुद्राक्षमाला, अंगाला भस्म, व डोक्यावर जटा असल्यावर कोणत्याहि मूर्खाला कशाचाहि जगांत तोटा पडणार नाहीं. " " ज्याला वाटेल त्या प्रसंगीं हटकून गर्हिवर आणतां येईल त्याला तर दुसऱ्या कोणत्याच साधनांची गरज नाहीं. राजेहि त्याच्या मुठींत राहतील ! ! "

मूर्ख व ढोंगी गुरूला पुढील प्रकारचा शिष्य मोठ्या भाग्यानेंच लाभतो असें दीक्षितांचें म्हणणें : " या शिष्याची गति अशी कशांतच नाहीं, गुरु सांगेल त्यावर अतिश्रद्धा, व ज्ञानाच्या केवळ आभासानें तृप्ति ! ! "

या चमकदार छोट्या उपरोधी काव्याची दुसरी मौज अशी आहे कीं, यांतील विनोदाचे विभाव केवळ कलियुगांत किंवा एखाद्या विशिष्ट परिस्थितींतच आढळून येणारे नसून ते मनुष्यस्वभावांत नित्यच सांपडणारे घटक आहेत.

मग तें कलियुग असो कीं सत्ययुग असो ! !

एखाद्या उथळ व असंस्कृत माणसास अधिकार व पैसा नुकताच मिळालेला असला म्हणजे तो आपल्याकडे व जगाकडे कोणत्या दृष्टीनें पाहतो याचें दीक्षितांनीं केलेलें मार्मिक वर्णन सर्व कालीं व सर्व देशांत लागू पडणारें नाहीं असें कोण म्हणेल ?

**प्रामाण्यबुद्धिः स्तोत्रेषु, देवताबुद्धिरात्मनि ।**
**कीटबुद्धिर्मनुष्येषु नूतनायाः श्रियः फलम् ॥ १ ॥**

" आपल्या स्तुतिपाठकाच्या तोंडपुजेपणावर वेदवाक्यासारखा विश्वास, स्वतः आपण देवच आहों अशी दृढ श्रद्धा व भोंवतालचीं माणसें केवळ किडे आहेत अशी पक्की समजूत, हीं सर्व नुकत्याच मिळालेल्या वैभवाचीं ताजीं फळें होत ! ! "

**क्षेमेंद्राचें ' कलाविलास '** नांवाचें एक काव्यहि असेंच मोठें विनोदी आहे. यांत दहा सर्ग आहेत. त्यांतून दम्भ, लोभ, काम, मोह, मद वगैरे विकारांचें मोठें उत्तम वर्णन आहे. त्यांची मौज अशी कीं, वरील विकार मुख्यत्वेंकरून ज्याच्यामध्यें असतात असे लोक घेऊन त्यांचीं कृत्यें विनोदानें सांगितलीं आहेत. उदाहरणार्थ, वाणी, सोनार, वेश्या, कायस्थ, चोरांचे निरनिराळे प्रकार इत्यादि. " सोनारांना भिऊनच मेरुपर्वत मनुष्यवस्तीपासून फार लांब जाऊन राहिला !" " वाणी हे खोटी तागडी, ठेव ठेवून घेणें, क्रय-विक्रय इत्यादि साधनांनीं लोकांना लुबाडणारे दिवसाचे चोर ( दिवसचौरा ) होत ! " वगैरे मौजेचीं विधानें यांत सर्वत्र सांपडतात. या काव्याच्या कर्त्याची विनोदबुद्धि बऱ्याच वरच्या दर्जाची आहे यांत शंका नाहीं.

कलिकालाचें विलसित विनोदानें वर्णन करणारीं लहान लहान काव्यें ( कांहीं मुद्रित व कांहीं अमुद्रित ) आढळतात. उदाहरणार्थ, ' कलियुगाचार्यस्तोत्र ', ' कलियुगप्रतापवर्णन ' इत्यादि. यांतून कर्त्यांच्या विनोदबुद्धीबरोबरच त्यांची धार्मिक तळमळहि दिसून येते.

इंग्रजींत ज्याला Parody म्हणजे ' विडम्बन-काव्य ' म्हणतात. अशा

तऱ्हेचीं संस्कृतांत एक दोन आढळतात, पण तीं आधुनिकांनींच लिहिलीं आहेत. कांहीं वर्षांपूर्वीं कुरुंदवाडचे वाटवेशास्त्री यांनीं 'कलिवृत्तादर्शपुराण' म्हणून एक विडम्बनात्मक पुस्तक लिहिलें आहे. यांत पुराणपद्धतीचा अवलम्ब केला असून ऋषि, सूत, गुरुशिष्य वगैरे सर्व सामग्री दरोबस्त आणून उभी केली आहे. या पुराणाचा मुख्य विषय म्हणजे सुधारकांनीं जे जे नवे आचार व ज्या ज्या नवीन पद्धती त्या वेळीं चालू केल्या होत्या त्यांचा भरपूर उपहास. हे जे नवीन आचार रूढ होत आहेत हें 'कलिविलसित' होय, असें सुचविण्याचा लेखकांचा उद्देश व तो साधण्यासाठीं त्यांनीं अतिशयोक्तीचा अवलम्ब करून खूप विनोद उत्पन्न केला आहे. पण तसें करण्यांत त्यांनीं मराठींतील व इंग्रजीमधील शब्द आपल्या संस्कृत श्लोकांत पहिल्यापासून खेंचून भरले आहेत. या व इतर गोष्टींमुळें विडम्बनात्मक काव्य म्हणूनहि या पुराणाचा दर्जा असावा तितका उंच नाहीं. पुढील श्लोकांतील त्यांच्या धेडगुजरी भाषेचा नमुना पहा.

**'सुधारकेषु' ये मुख्याः 'सभालेक्चरझोडिणः'।**
**पण्डितास्ते ब्रुवन्त्येव वयं 'प्रोफेसरा' इति ॥**

अध्याय ४ मधील सुधारकांचें वर्णन, अ. १७ मधील बर्चीबहाद्दराचा शेंदाडशिपाईपणा वगैरे प्रकरणें अतिशयोक्तिपूर्ण विनोदाचीं उदाहरणें होत. त्यांचें क्लीबांचें विवेचन बीभत्स आहे. विनोदानें प्रतिपक्षास हैराण करावें, पण तो करतांना नसते दोष त्याचे माथीं न मारतां जे खरे दोष असतील त्यांतील विसंगति मार्मिकपणें उघड करून त्यास फजित करावें. तितकी उच्च विनोदबुद्धि सदर शास्त्रीबुवांमध्यें दिसत नाहीं. सरमिसळीची भाषा, गैरसमजाची व अत्युक्तीचीं विधानें, आणि फटकळपणा यांवरच त्यांनीं आपल्या विनोदाची उभारणी केली आहे.

'विडम्बन' या दृष्टीनें अधिक चांगला प्रयत्न धारवाडचे सहस्रबुद्धेशास्त्री यांनीं केला आहे. त्यांचीं असलीं दोन काव्यें प्रसिद्ध आहेत. तीं म्हणजे 'चहागीता' व 'काकदूतम्' चहागीतेंतील संस्कृत भाषा बऱ्याच ठिकाणीं वरील कलिवृत्तादर्शांतील भाषेसारखीच इंग्रजी-शब्दमिश्रित असली तरी ती अधिक

चमकदार वाटते. भारदस्त संस्कृत श्लोकांत इंग्रजी शब्द वापरले म्हणजे एक प्रकारचा विनोद होतो, त्यावरच संतुष्ट न राहतां चहागीतेच्या मांडणींतहि लेखकानें चांगल्या प्रकारची विनोदबुद्धि दर्शविली आहे. 'कलिवृत्तादर्श-पुराणा'प्रमाणेंच यांतील विषयहि आधुनिक शिक्षणानें व आचरणानें धर्म-भ्रष्ट झालेल्या नवशिक्षितांचा उपहास हाच आहे.

सदर गीतेंत भगवद्गीतेची ठेवण, तिची विषयमांडणी व शब्दप्रयोग या तिहींचेंहि फार उत्तम प्रकारें विडम्बन केलें आहे. भगवद्गीतेप्रमाणें या चहागीतेलाहि न्यास आहे, विनियोग आहे, ध्यान, एवढेंच नव्हे, सर्व कांहीं आहे. ध्यानांतील शेवटचे दोनच चरण देतों.

**मूर्खाणां विषवर्षिणीं भगवतीं वंशाचलाध्यायिनीं ।**
**अंब त्वामनुसंदधामि खलु टीगेते ! पयोद्वेषिणीम् ।**

वंशाचल म्हणजे सात.

हा श्लोक 'पार्थाय प्रतिबोधिताम्' या गीताध्यानाचें विडम्बन आहे. गीताध्याय संपला कीं शेवटीं जो समाप्तिदर्शक संकल्प असतो त्याचें पुढील विडम्बन पहाः—

**"इति श्रीमच्चहागीतासूपनिषत्सु रथ्याकुल्यायां पतनशास्त्रे श्रीचहा-तद्भक्तसंवादे अनर्थपरंपरा नाम षष्ठोऽध्यायः ॥"**

आतां गीतेंतील "यत्र योगेश्वरः कृष्णः" या उदात्त श्लोकाचें पुढील विडम्बन पहाः—

**यत्र पेयेश-टी-देवो यत्र कप्पधरा नराः ।**
**तत्राल्पायुर्विपद् रोगा ध्रुवाऽनीतिर्मतिर्मम ॥**

यांत ब्रह्मदेव आहेत; 'लिप्टन' नामें चहाचे व्यापारी आहेत; चहा, विड्या, दारू इत्यादि व्यसनांत तरबेज झालेले, तरतरीत बुद्धीचे विद्यार्थी आहेत; पेय-देव चहा आहे, सर्व काहीं आहे. व्यसनानें बिघडून घरीं आल्यावर व्यसना-सक्त विद्यार्थ्याचा आपल्या बापाशीं झालेला पुढील मनोरंजक संवाद पहाः—

**पिता—धूम्रपानं कुतो वत्स ?**
**पुत्रः—जलं तेन न बाधते ।**

**पिता—कस्मात क्रॉप ?** ( केस कां ठेवतोस ? )
**पुत्रः—वर्तते तेन मस्तिकं शीतलं सदा ।**
**पिता—कुतः क्यापम् ?**
**पुत्रः—रुमालस्य भारेन व्यथते शिरः ।**
**पिता—चहापानेन किम् ?**
**पुत्रः—तेन तंद्रालुर्न नरो भवेत् ।**
**पिता—टाइट्-कोटादिभिः किम् ?**
**पुत्रः—न स्यान्नरस्तेन तुंदिलः ।**
**पिता—सेवसे मदिरां कस्मात् ?**
**पुत्रः—सा प्लेगप्रतिबंधिका ।**

विस्तारभयास्तव यांपेक्षां अधिक अवतरणें घेतां येत नाहींत. शेवटीं चहा-गीताकाराच्या भाषेंतच तिचा निरोप घेऊं:—

**टिये नमः टिये नमः टिये नमः ।**
**नमो बिडीस्वामिने टिये झुर झुर भुस ।**
**सोडावॉटराय फट् ।**

त्यांच्याच ‘ **काकदूतम** ’ या काव्यांत कालिदासाच्या प्रसिद्ध ‘ मेघदूत ’ काव्याचें विडंबन केलें आहे. मेघदूताचीच श्लोकसंख्या, तेंच मंदाक्रांतावृत्त, तेच पूर्व आणि उत्तर असे दोन भाग, तसेंच प्रवासांचें वर्णन व संदेश-कथन इत्यादि सर्व गोष्टी या विडंबनांत उत्तम तऱ्हेनें साधल्या आहेत. तिकडच्या मेघाबद्दल इकडे कावळा घातला आहे व तिकडच्या यक्षाबद्दल इकडे एक दुराचारी, मद्यपी व अपराधामुळें कारागृहांत पडलेला भडजी घातला आहे. सदर कैदी, पायांत बेड्या व खांद्यावर खोरेंकुदळ अशा थाटांत ( विरही स्थितींत ) उभा असतां, त्याला उकिरड्यावर एक कावळा दिसला. त्याची त्यानें पुढीलप्रमाणें स्तुति केली आहे:—

“ हे काका ! पिण्ड खाणाऱ्यांच्या प्रसिद्ध वंशांत तूं उत्पन्न झालेला आहेस हें मी जाणतों. त्याचप्रमाणें तुमची जात नेहमीं परहिततत्पर असते असा माझा दृढ विश्वास आहे; कारण माझ्या बापाच्या दहाव्या दिवशीं तुमच्यापैकीं एकानें

माझ्या बापाच्या पिंडाला स्पर्श करून ‘ तुझ्या बापाची आतां कांहीं इच्छा राहिली नाहीं ’ असें मला आश्वासन दिलें. ”

सदर विडंबन “ जातं वंशे भुवनविदिते ” या श्लोकाचें आहे. येथून पुढें कावळ्याच्या प्रवासाचा मार्ग सांगितला आहे. त्यास वाटेंत लागणारीं स्थळें, त्याचे आवडते पदार्थ, खालीं पडलेले मांसाचे घाणेरडे तुकडे, मधून-मधून लागणारीं हॉटेलें इत्यादि गोष्टींचें मेघदूतानुसार उत्तम वर्णन केलें आहे. ज्या नगरींत ( दारूच्या गुत्त्यांत ) सदर कैद्याची पत्नी ( दारू ) राहत होती, तिचें वर्णन अलकावतीप्रमाणेंच मोठें थाटानें केलें आहे. त्या नगरीमध्यें मारामारी, जोडाजोडी व धक्काबुक्की यांचे ध्वनि कानांवर येत आहेत; गर्दभराजांना लाज वाटेल अशा कर्णमधुर (?) ताना निघत आहेत; कोणी पिऊन गटारांत लोळत आहेत; कोणी धर्मपत्नी आपल्या पतीस यदेच्छ शिव्या हासडीत आहेत, इत्यादि वर्णन करून कैदी कावळ्यास म्हणतो कीं, “ या नगरीचें सौंदर्य दोन्ही डोळ्यांनीं तुला पाहतां येत नाहीं हें तुझें दुर्भाग्य आहे व तुझ्याहि तोंडांतून आपल्यास एकाक्ष केल्याबद्दल ब्रह्मदेवास शिव्याशाप आपोआप निघतील. ”

अखेरीस कैद्याच्या पत्नीचें वर्णन आहे. ही पत्नी कोण म्हणाल तर खुद्द मदिरा ( दारू ) हीच आहे.

यक्ष ज्याप्रमाणें आणखी चार महिन्यांनीं आपण शापमुक्त होऊं असें आपल्या पत्नीस सांगतो , तसा हा कैदीहि आपल्या वारुणीस सांगतो कीं, “ मला जेलर आणखी दोनतीन महिन्यांनीं सोडणारआहे, तोंपर्यंत तूं कसे-तरी दिवस कंठ. ”

अखेरीस कैद्यानें कावळ्यास शेवटची विनंति केली आहे: “ हे काका ! एवढा माझा संदेश माझ्या वाटेकडे डोळे लावून बसलेल्या माझ्या पत्नीस सांगून मग तुला जिकडे उकिरडे उकरावयाचे असतील तिकडे तूं खुशाल जा. ”

इतकें सुंदर विडम्बन खुद्द संस्कृतांतच काय पण हिंदुस्थानांतील कुठल्याहि भाषेंत उतरलें नसावें. श्री. सहस्रबुद्ध्यांच्या ठिकाणीं असामान्य भाषाप्रभुत्व

व उत्तम प्रकारची विनोदवृत्ति असल्यानें त्यांचें लिखाण आमूलाग्र रमणीय वठलें आहे.

त्यांच्या ' अब्दुल्लमर्दन ' व शिवकालीन प्रसंगावर आधारलेल्या आणखी एका नाटकांत कांहीं चांगले विनोदी प्रवेश आहेत. आज संस्कृत भाषा जिवंत असती तर इंग्रजींतील सर्व वाङ्मयप्रकार जसे मराठींत हल्लीं आले आहेत तसे तिच्यांतहि येण्यास कांहींच अडचण पडती ना. ह्याची साक्ष सहस्रबुद्ध्यांचे सदर ग्रंथ देतील.

दारव्हा येथील वकील रा. माधवराव दाऊ यांनीं ' विनोदलहरी ' नांवाचें एक रमणीय काव्य नुकतेंच लिहिलें आहे. त्यांत शङ्कर व त्याच्या कुटुंबांतील मण्डळी आणि विष्णु व त्याची चञ्चल पत्नी लक्ष्मी यांच्यांतील संभाषणप्रसंगांवर विनोदाची उभारणी केली आहे. मागें सांगितल्याप्रमाणें शङ्कराच्या कुटुंबीयांत विनोदाला विषय होतील अशीं रूपें व व्यवहार यांस तोटा नाहीं. तीच स्थिति विष्णूची. त्यामुळें रा. दाऊंनीं कल्पिलेले पुष्कळ विनोदी प्रसंग चांगले वठले आहेत. पण त्यांची लेखनपद्धति महाकाव्याच्या सरणीप्रमाणें थोडी भारदस्त असल्यामुळें या विनोदी काव्यांत यावा तितका प्रसाद आलेला नाहीं.

काश्मीर देशच्या रत्नाकर नांवाच्या कवीनें ' वक्रोक्तिपञ्चाशिका ' म्हणून एक विनोदी काव्य लिहिलें आहे ( काव्यमाला १ ). त्यांत ५० श्लोकांमध्यें शिवपार्वतीचा संवाद असून तीं दोघें पतिपत्नी एकमेकांचा श्लेषानें, कोट्या करून, मुद्दाम वांकड्यांत शिरून ( म्हणजे वक्रोक्तीनें ) बोलण्यांत पराभव करण्याचा प्रयत्न करीत आहेत. यांतील विनोदाचा सर्व भर सभंग व अभंग श्लेषावर असल्यानें सामान्य माणसास त्यांतील विनोद सहज कळण्याजोगा नाहीं. तो पंडितांसाठीं आहे.

तसेंच त्रिविक्रम कविकृत ' व्याजोक्ति-शतक ' नांवाचें एक प्रकरण ( काव्येतिहाससंग्रह १३ ) आहे. त्यांत कांहीं विनोदी व्याजोक्ती आहेत. हें प्रकरण अन्योक्तिप्रकरणांतच मोडण्यासारखें आहे. त्याप्रमाणें लक्ष्मी-सरस्वती-संवाद, लक्ष्मी-पार्वतीसंवाद इत्यादि कांहीं छापील व कांहीं हस्तलिखित प्रकरणें असून त्यांतून या देवतांनीं एकमेकींच्या उखाळ्यापाखाळ्या काढून तंटे केले आहेत !

'सुवर्ण मुक्ता संवाद' म्हणून एक फार विनोदी संभाषणात्मक प्रवेश काव्येतिहाससंग्रहांत ( खंड १३ ) छापलेली आहे. त्यांत सोनें व मुक्ता ( मोत्यें ) यांचें खडाजंगीचें भांडण वर्णन केलें आहे. आपापल्या पक्षाचें स्तुतीनें मंडन व परपक्षाचें निन्देनें खण्डन दोन्ही बाजूंनीं करण्यांत आलें आहे. या भांडणांत ऐकणारे सभ्यहि मध्येंमध्यें तोंड घालीत आहेत. रजत ( रुपें ), हिरा वगैरे मंडळी स्वपक्षमंडणास आली आहेत. अखेरीस सर्वांनीं एकदिलानें वागावें व मोठी शोभा निर्माण करावी असा गोड उपदेश एक राजेसाहेब करतात असें सांगून हें सुंदर प्रकरण समाप्त करण्यांत आलें आहे.

सोमदेवाचा ' कथासरित्सागर,' क्षेमेंद्राची बृहत्कथामंजरी वगैरे पद्य-कथासंग्रहांतून ब-याच विनोदी कथा आढळतात. त्यांतील विनोद अनलंकृत, सरळ व साधाभोळा आहे. कारण या कथांचा प्रत्यक्ष लोकचरितांशीं संबंध होता. त्यावर पांडित्याची छाप नाहीं. त्यांत सहजोद्गाराची मौज असली तरी तो थोडा ग्राम्यहि आहे. तसेंच यांत येऊन गेलेल्या पशुपक्ष्यांच्या व जारजारिणींच्या युक्तिप्रयुक्ती वर्णन करणाऱ्या ब-याच कथा पुढें पंचतंत्र व हितोपदेश यांमध्येंहि घेतल्या आहेत. ( उदाहरणार्थ, कथासरित्सागर—शक्तियशोलंबक १० पहा. )

यांतील पांचव्या तरंगांत प्रधानानें नरवाहनदत्तास पुष्कळ मूर्खांच्या गोष्टी सांगितल्या आहेत, त्या फार विनोदी आहेत.

कोणीएक मूर्ख व्यापारी आपल्या जहाजांत अगरु चंदन भरून व्यापारासाठीं कटाह द्वीपाला गेला, तेथें त्याला चंदनाला गिऱ्हाईक मिळेना. पण त्यानें एक गोष्ट पाहिली ती ही कीं, पुष्कळ लोक कोळसे मात्र विकत घेत होते. व्यापारी म्हणाला, "कांहीं हरकत नाहीं. जो माल खपेल तो विकावा." त्यानें लगेच चंदनाचे ( व त्याबरोबर आपल्या भांडवलाचेहि ) कोळसे केले. पुढें काय झालें हें सांगावयास नकोच. साध्या कोळसाच्या भावानें काय किंमत हातीं पडली असेल ती असेल. हें वाचून व्हिकार ऑफ वेकफील्डमधील मोझेजच्या जत्रेंतील सौद्याचीच आठवण होते !

तसेंच देवपूजेसाठीं आपल्याला अभिषेकास जल व धूपास अग्नि लागतो म्हणून हे दोन पदार्थ एकत्र ठेवले कीं एकदम सांपडतील या भोळ्या

भावनेनें विस्तव व पाणी एकाच भांड्यांत ठेवणार मूर्ख, भाजलेले तीळ अधिक गोड म्हणून तशीं झाडें एकदम उगवावीं यासाठीं तीळ भाजून पेरणारा शेतकरी वगैरे मूर्खांच्या पुष्कळ गमतीच्या कथा येथें आहेत.

कथासरित्सागरांतील व्यभिचाराच्या गोष्टींना नाग, विद्याधर, गंधर्व यांतील स्त्री-पुरुषांचा संबंध आणून अद्‌भुतपणा आणला आहे. त्या सर्व गोष्टींत कुंटिणीचा किंवा जारजारिणीचा चतुरपणा दिसतो व त्यांत विनोदहि आहे, पण त्यांत सद्‌भिरुचि नाहीं.

पञ्चतन्त्रहितोपदेशांतील यासंबंधींची एकच गोष्ट नमुन्यास देतों. एक वणिक्-स्त्री आपल्या घरीं ठेवलेल्या नोकराशींच चोरटा व्यवहार करी. एकदां खुद्द पतीनें त्या दोघांस चुम्बन घेतांना पाहिलें. त्याबरोबर त्या धूर्त स्त्रीनें नवऱ्यास त्वेषानें सांगितलें : “ हा नोकर आपल्या घरांतील कापूर दररोज चोरून खातो असा मला हल्लीं संशय येऊं लागला, म्हणून मीं आज त्याच्या तोंडाचा प्रत्यक्ष वासच घेऊन पाहिला. ” हें ती सांगते आहे तोंच नोकरहि रागानें म्हणतो, “ महाराज, मला यापुढें या घरांत नोकरी करावयाची नाहीं. भलताच चोरीचा आळ घेऊन माझी अशी बेअब्रू शंकेखोर मालकीणच करूं लागली तर काय होईल ? आतां हेंच पहा आजचें ! एकाद्यास चटदिशीं भलताच संशय यावयाचा. मी आपला याच पावलीं चालता होतों ! । ” झालें. अशा तऱ्हेनें तीं दोघेंहि नामानिराळीं झालीं व मालकच मूर्ख ठरला.

वेताळपंचविशी, शुकबहात्तरी वगैरे कथासंग्रहांतून ज्या जारकर्माच्या एकीपेक्षां एक गोष्टी संकृतांत व मराठींतहि आहेत, त्यांची मूळ जागा ‘ कथासरित्सागर ’ च होय.

याव्यतिरिक्त कथापीठलंबक तरंग ६ मध्यें एका सामवेदी भोळ्या ब्राह्मणाची एका वेश्येच्या घरीं कशी फजिती उडाली याची एक विनोदी गोष्ट आहे. तसेंच याच लंबकांत तरंग ७ मध्यें सातवाहन राजाला संस्कृत

व्याकरण येत नसल्यानें त्याची “ **मोदकैः सिञ्च** ” याचा बरोबर विग्रह न केल्यामुळें राणीकडून कशी मानहानि झाली याचें वर्णन आहे.

पञ्चतन्त्रहितोपदेशांतील कांहीं विनोदी गोष्टी अनीतीच्या म्हणून सोडून दिल्या तरी इतर पुष्कळ गोष्टींत चांगला विनोद आहे. कोल्ह्याचा धूर्तपणा क्वचित् त्याचीहि फजिती ( नीलिभाण्डे पतितस्य जम्बूकस्य ), गाढवाचा मूर्खपणा, कावळ्याची चतुराई वगैरे बाबी फार विनोदी आहेत. या पशुपक्ष्यांच्या सर्व गोष्टींचा अन्योक्तीसारखा उपयोग केला आहे. त्यासाठीं त्यांतील वाघ, कोल्हा, गिधाड इत्यादिकांच्या तोंडीं जें धर्मशास्त्र व जे व्यवहार-नियम घातले आहेत ते वाचून फारच मौज वाटते. वाघानें हातांत सोन्याचें कंकण घेऊन वैराग्यानें दानस्तुति करावी व गिधाडानें मानभावीपणानें अतिथिसत्काराचे नियम म्हणून दाखवावे ही कल्पनाच मुळीं विनोदी आहे.

आपल्या पत्नीस ( मगरीस ) भक्ष्य म्हणून एका वानराला घेऊन चाललेल्या मगराची गोष्ट तर फारच हास्योत्पादक आहे. एक वानर मगरास नदीकांठच्या जांभळीचीं जांभळें देई. तीं गोड जांभळें तो मगर आपल्या मगरीस देई. तिनें त्रैराशिक मांडलें कीं, “ जांभळें जर इतकीं गोड तर तीं देणाऱ्या आपल्या पतीच्या मित्राचें अंतःकरण किती गोड असावें ? ” मग तिच्या सांगण्यावरून मगरानें वानरास फसवून आपल्या पाठीवरून घरीं चालविलें व तो माकड आतां निसटून जाऊं शकत नाहीं असें पाहून त्यानें त्यास वधाची गोष्ट सांगितली. यावर माकडानें प्रसंगावधान राखून जें उत्तर दिलें तें पुष्कळ चतुर माणसांसहि सुचावयाचें नाहीं. तो म्हणाला, “ माझें काळीज तुझ्या बायकोस पाहिजे काय ? कांहीं हरकत नाहीं. पण तें मी झाडावर ठेवून आलों. तूं मला आधीं कां नाहीं सांगितलेंस ? ” मूर्ख मगरानें त्यास माघारें आणिलें. येथें माकडाच्या धूर्तपणानें गम्मत वाटते कां मगराच्या भोळेपणानें, तें वाचकांनींच पाहावें.

संस्कृत गद्यांत तुरळक ठिकाणीं विनोद आलेला आहे. बाणाच्या कादंबरींतील कांहीं ठिकाणचे विनोदी प्रसंग प्रथम पाहूं. मागें अनेक ठिकाणीं सांगितल्याप्रमाणें कादंबरींतहि शृंगारानुषंगिक विनोदालाच अधिक वाव

आहे. तारापीडाची राणी विलासवती बहुत दिवसांनीं गरोदर झाली, ही बातमी राजास कळतांच तो आपल्या शुकनास नांवाच्या प्रधानाबरोबर तिच्या महालांत गेला व " मला मिळालेली बातमी खरी आहे काय ? " असें तिला विचारूं लागला. ती बिचारी काय बोलणार ? अति आग्रहानंतर ती एवढेंच म्हणाली, " इश्श ! मला नाहीं कांहीं माहीत," व लाडक्या रागानें त्याच्याकडे पाहूं लागली. यावर राजेसाहेब उत्तर करतात: " जर तूं आपल्या तोंडानं याचं उत्तर दिलं नाहींस तर या अवस्थेचीं इतर चिन्हें मला कांहीं दिवसांनीं ती गोष्ट सांगतीलच, त्यांना तूं प्रतिबंध कसा करणार ? "

शृंगारिक विनोदाचा उत्तम मासला कादंबरी आणि चंद्रापीड यांच्या भेटीच्या वेळीं बाणानें वर्णिला आहे. कादंबरीची कालिंदी नांवाची एक मैना ( सारिका ) होती. तिचा कादंबरीनें परिहास नांवाच्या एका पोपटाशीं पाणिग्रहणपूर्वक सशास्त्र विवाह लावून दिला होता. एके दिवशीं त्या कालिंदी सारिकेनें आपल्या पतीस ( पोपटास ) कादंबरीच्या तमालिका नांवाच्या दासीबरोबर एकांतांत बोलतांना पाहिलें. झालें ! मैनेच्या मनांत असूया उत्पन्न झाली, व तिनें आपल्या पतीशीं व इतर दासीशींहि मौनप्रत्याग्रह आरंभिला. मैनेनें मानवी स्त्रीजातींतील तमालिकेशीं असा मत्सर दाखवावा हीच मुळीं मोठी गंमतीची गोष्ट आहे; पण त्यांतहि रसिक चंद्रापीडानें टाकलेली विनोदाची भर फारच चित्ताकर्षक आहे.

कालिंदीचा वरील वृत्तान्त ऐकून चंद्रापीड मोठयानें हंसून म्हणाला, " होय बुवा ! आपण सुद्धां या जंगी तंटयाची हकीगत बाहेर ऐकिली आहे खरी. सबंध राजवाडयांतील लोक हेंच कुजबुजत आहेत. शिवाय शहरांत हीच वार्ता चालू आहे व दूरदेशींहि याच गोष्टीची वाटाघाट चालली आहे; व त्यांतच आम्हीं असेंही ऐकिलें आहे कीं, कादंबरीच्या दासीवर प्रेम करणारा तो पोपट कामज्वरानें अगदीं हैराण झाला आहे ! लोक असें म्हणत आहे कीं, कादंबरी आपल्या दासीला या भानगडीबद्दल चापीत कसें नाहीं ? ती गरीब बिचारी कालींदी काय बरें करील ? सवतीमत्सर या बायकांच्या अंगचा दाह करणारा एक मोठा अग्नीच आहे ! त्यामुळें त्यांना आपला मोठा अपमान झाल्यासारखा वाटतो. तरी बरें, कालिंदी मोठ्या धीराची ! नाहींतर एखादीने विष पिऊन किंवा अग्नींत उडी

टाकून एव्हांना स्वर्ग गांठला असतां ! ”

चंद्रापीडानें या भाषणानें मूळ तंट्याचें स्वरूप मुद्दाम फार मोठें करून दाखविलें आहे. कारण त्याला या प्रकारची मनातून थट्टाच करावयाची होती हें उघड आहे. कारण असें दर्शविणारी शब्दयोजना त्यानें मुद्दाम केलेली आहे असें दिसतें. हें जाणून तेथील सर्व स्त्रिया हंसल्या व खुद्द परिहास पोपटसुद्धां चंद्रापीडास म्हणाला, “ युवराजसाहेब, आपण मानतां तितकी आमची कालिंदी भोळी नाहीं बरें ! तिला हीं तुमचीं बोलणीं समजतात.

यावर आणखी एकदां हंशा झाला.

तसेंच, कादंबरीच्या वाड्यांतील तरुण दासी एकमेकींच्या शृंगारविषयक थट्टा करीत आहेत, हाहि प्रसंग ( कालिदासाच्या शाकुंतलांतील शकुंतला, अनुसया आणि प्रियंवदा यांच्यांतील पहिल्या अंकांतील संभाषणप्रसंगा-प्रमाणेंच ) विनोददृष्ट्या मजेशीर आहे.

पण बाणानें आपली स्वतंत्र विनोदी दृष्टि चंडिकेच्या देवळांतील म्हाताऱ्या द्रविड ब्राह्मणाच्या वर्णनांत दाखविली आहे. त्यानें या म्हताऱ्या पुजाऱ्याच्या रूपवर्णनांत जेवढी मौज केली आहे तितकीच किंवा त्याहूनहि अधिक त्याचा स्वभाव रंगवितांना केलेली आहे : “ या म्हाताऱ्याच्या काळयाकुट्ट पोटऱ्यांवर अशुद्ध रक्तवाहिन्यांचीं जाळीं उभीं राहिलेलीं दिसत होतीं. त्यामुळें असें वाटे कीं, याचा पाय म्हणजे एक जळलेल्या लाकडाचा खुंट असें समजून त्यावर सरडे चढून बसले आहेत ! चंडिकेच्या पायांवर मस्तक आपटतां आपटतां त्याच्या कपाळाला घट्टे पडले होते. हातांत एकतारी घेऊन एक डोळयानें आंधळा झालेला हा म्हातारा आपल्या द्राविडी भाषेंत कांहींतरी गाणीं माना हालवून नेहमीं गुणगुणत असे. ‘ दक्षिणेचें राज्य तुला मिळवून देईन’ अशी त्याची कोण्या मांत्रिकानें समजूत करून दिली होती व त्यामुळें तो चंडिकेजवळ त्याच मागण्याचें धरणें धरून बसला होता. कांहीं यक्षसुंदरींची आपल्याला प्राप्ति व्हावी म्हणून तो कांहीं तंत्र-मंत्र नेहमीं करीत असे. तो इतका रागीट, व डोक्यांत राख घालणारा कीं, तेथें उतरावयाला आलेल्या प्रवाशांबरोबर फुलांसाठीं तो नेहमीं

भांडावयाचा ! इतकेंच नव्हे, तर एकादे वेळीं चंडिकेच्या डोक्यावर यानेंच बरोबर न बसविलेलें फूल वरचेवर खालीं पडूं लागलें तर आपलीं तोंडें वेडीं-वांकडीं करून उलट तिच्यावरच तो संतापावयाचा ! कधीं याच्या मागें पोरें लागावयाचीं, तर कधीं मोठीं माणसेंहि शिमग्याच्या दिवसांत याला एका मोडक्या खाटल्यावर एका म्हातारीसह बसवून या विचित्र जोडप्याची ते मिरवणूक काढीत.''

बाणानें हें सबंधच वर्णन पहिल्यापासून शेवटपर्यंत मोठ्या बहारीचें केलें आहे. त्यांतील कांहीं भाग वर दिला आहे.

इतर वर्णनाच्या अंगभूत म्हणून कांहीं विनोदाच्या मनोहर छटाहि बाणानें दाखविल्या आहेत. आपल्यास मुलगा व्हावा म्हणून बायका कसले विचित्र नवस करतात, त्याचप्रमाणें राजवाड्यांतील मुलें कंचुकींच्या तोंडांना अळिता फासून त्यांची कशी थट्टा उडवीत, इत्यादि प्रकारांचेहि त्रोटक उल्लेख त्यानें केलेले आहेत. त्याचप्रमाणें परिसंख्या अलंकार वापरून त्यानें केलेली आश्रमाचीं आणि शहराचीं वर्णनें मोठीं मजेदार आहेत. उदाहरणार्थ, शूद्रकाच्या राज्यांत करग्रहण कोठें होत असेल तर तें विवाहांतच, बडबडत कोण असतील तर पैंजणच, धनुष्याचा आवाज जर झाला असेल तर तो मदनाच्या धनुष्याचाच व्हावयाचा ! जाबालीच्या आश्रमवर्णनांतील पुढील मौज पहाः-- "तेथें ब्राह्मणांचा अधःपात ( द्विजपतन ) ही गोष्ट फक्त म्हातारपणींच व्हावयाची !" ( त्यांचे दांत ( द्विज ) पडत. )

विरोधाभास अलंकार साधतांनाहि श्लेषाच्या जोरावर बाण अशीच मौज करीत असतो. हारित नांवाच्या ऋषिकुमाराचें वर्णन करतांना तो म्हणतोः—

"हारिताला दोन्ही डोळे असूनहि ( **संनिहितनेत्रद्वयोऽपि** ) त्याचा डावा डोळा बाद झाला होता ! ! ( **परित्यक्तवामलोचनः** ) पण वामलोचना म्हणजे सुंदर स्त्री असा अर्थ घेतल्यास ह्या विनोदी विरोधाचा एकदम परिहार होतो. तारापीडाच्या राजवाड्याचें वर्णन पहाः—"तो राजवाडा अवंति देशांत असूनहि त्यांत मगध देशांतील लोक राहिले होते. ( येथें मागधजन म्ह० भाट. ) तसेंच हा राजवाडा अत्यंत संपन्न असूनहि त्यामध्ये हिंडणारे लोक दारिद्र्यानें नागडे-उघडे होते. ( यांत कांहीं नग्न साधू हिंडत होते. )" याच पद्धतीच्या बाणाच्या कांहीं उपमाहि मोठ्या विनोदी असतात.

सावरीच्या वृक्षाला दिलेली केवळ शब्दसाम्यावरील दुर्योधनाची पुढील उपमा पहाः " **दुर्योधन इव उपलक्षितशकुनिपक्षपातः ।** "

बाणाच्या हर्षचरितांत विनोदाला कादंबरीइतकाहि अवसर नाहीं. तरी यशोमतीच्या गरोदरपणाच्या वर्णनाचा शेवटचा भाग ( उच्छास ४ ), तिला पुत्र झाल्यावर लोकांनीं ( विद्वान् लोक व गंभीर ऋषि इत्यादींनींहि ) प्रगट केलेला उन्मत्त आनंद, व राजसेवक राजाला कसे फसवितात त्याचें वर्णन इत्यादि ठिकाणीं विनोदी छटा आहेत. विशेषतः धूर्त सेवकांनीं राजेलोकांना फसवून त्यांस हास्यास्पद करण्याच्या विनोदी कल्पनेचें बीज जें येथें बाणानें नुसतें दिग्दर्शित केलें आहे, त्याचा विस्तार कादंबरींत शुकनासाच्या उपदेशांत फार छान केला आहे.

सुबंधूच्या वासवदत्तेंतहि एकदोन ठिकाणीं असा विनोद आहे. वासवदत्तेच्या वाड्यांतील तरुण दासी एकमेकींची शृंगारिक थट्टा करीत आहेत. पण येथील वर्णन सुबंधूच्या नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें फारच श्लिष्ट असल्यामुळें त्यांतील विनोदाची प्रतीति लवकर होत नाहीं व त्यामुळें रसहानि होते.

तसेंच शृङ्गारशेखर राजानें आपली मुलगी जी वासवदत्ता तिचें स्वयंवर आरंभिलें. त्या वेळीं तेथें जमलेल्या राजपुत्रांचें वर्णनहि सुबंधूनें विनोदानें केलें आहे. त्या राजपुत्रांपैकीं कांहीं व्याधासारखे शकुन ऐकून शुभ वेळेवर निघून आलेले होते. ( व्याधसुद्धां पक्ष्यांना मारण्यापूर्वी त्यांचा शब्द सावधानपणें ऐकतात. )

बाणाप्रमाणें याची शब्दयोजनाहि श्लेषांमुळें कांहीं ठिकाणीं वरूनवरून मोठी चमत्कारिक दिसते. चिंतामणि राजाचें वर्णन करीत असतांना तो म्हणतोः—"आजपर्यंत होऊन गेलेले इतर राजे चिंतामणीच्या मानानें कमी योग्यतेचे." पण मौज ही कीं, हें कमीपण खरें नसून तें श्लेषानें त्यानें दर्शविलें आहे. उदाहरणार्थ,

**राघवः परिहरन्नपि जनकभुवं जनकभुवा सह वनं विवेश ।**
**भरतो रामे दर्शितभक्तिरपि राज्ये विराममकरोत् ।**
**नलस्य दमयन्त्या मिलितस्यापि पुनर्भूपरिग्रहो जातः ।**

दण्डीच्या दशकुमारचरितांत आलेले विनोदी प्रसंग शृंगाराशीं व अनीतीशीं संलग्न होऊन आलेले आहेत. असा मागें उल्लेख आलेलाच आहे. त्याचें प्रत्यंतर पुढील एकदोन स्थळांवरून विशद होईल.

दुसऱ्या उच्छ्वासांत एका ऋषीला एका वेश्येनें व तिच्या आईनें कसें फशीं पाडलें आहे याची एक कथा दिलेली आहे. काममंजिरी नांवाची एक वेश्या रडत रडत या ऋषीकडे आली. तिच्या मगोमाग तिची आई तिला नेण्यासाठीं धांवत येते. लहानपणापासूनच वेश्याव्यवसायाला योग्य अशी शिकवण मुलींना कशी दिली जाते याचें तिच्या आईनें केलेलें वर्णन बरेंच विनोदी आहे. ज्योतिषांकडून वेश्येच्या शुभलक्षणाबद्दल गांवांत कसा बोभाटा करण्यांत येतो; विट, चेट, विदूषक, भिक्षु इत्यादिकांकडून तिच्या रूपाची आणि गुणांची महती मुद्दाम कशी वर्णविली जाते; एकाद्या श्रीमान् तरुण पुरुषावरच आपण कशा आसक्त आहोंत असें वेश्येस कसें दाखवावें लागतें व त्याच वेळीं दुसऱ्यास फशीं पाडण्यासाठीं कसे प्रयोग चाललेले असतात ह्याचें वर्णन सदर ठिकाणीं केलें आहे. इतक्यावरहि ती वेश्या घरीं जावयास तयार होत नाहीं. ती आश्रमांत राहण्याचाच आपला निश्चय ठाम करते. आईचाहि तिच्या विचारापुढें नाइलाज (?) होऊन ती घरीं निघून जाते. यानंतर सदर वेश्या या भोळ्या ऋषिवर्यास सेवारूपानें आपल्या जाळ्यांत ओढूं लागते. ती त्यांस आपलें तत्त्वज्ञान समजावून सांगते. देवादिकांत घडलेलीं व्यभिचाराचीं उदाहरणें ती त्या ऋषिवर्यासमोर मांडते, व त्यास आपल्या चांगलेंच नादीं लावून आपल्या नगरास नेते. तेथें नेल्यावर ती त्याच्याशीं तुसडेपणानें वागूं लागते. तेव्हां आश्चर्यचकित झालेले हे भोळसट गृहस्थ तिला त्याचा खुलासा विचारतात. तेव्हां ती म्हणते, " अहो ! कुठलें प्रेम नि काय ? तुम्हांस फसवून येथें आणण्याबद्दल आमची पैज लागली होती ! ती आपल्या प्रसादानें (?) मीं जिंकली आहे. "

तसेंच आठव्या उच्छ्वासांत चंद्रपालित नांवाच्या एका व्यसनी गृहस्थानें राजपुत्रांस आपल्या नादीं लावण्यासाठीं दुर्गुणांची मुद्दाम अवास्तव स्तुति केली आहे.

राजेलोकांनीं जीं व्यसनें टाळावयाचीं असतात तीं म्हणजे स्त्रिया, द्यूत, मदिरासेवन इत्यादि. पण ह्याच व्यसनांचें मंडन सदर गृहस्थानें केलें असल्यामुळें यांत साहजिकच विनोद उत्पन्न झाला आहे. ठळक दोषांस गुणरूप देण्याच्या प्रयत्नानें या विनोदाची उत्पत्ति झाली आहे. द्यूतांतील दोषांचें पुढील गुणीकरण पहाः—

" केवढ्याहि धनराशीस कस्पटासारखें लेखण्याचें औदार्य द्यूतामुळें येतें. मग जय येवो अथवा पराजय होवो. त्यांत हर्षविषाद कसा मानतां कामा नये त्याचें शिक्षण मिळतें. द्यूतांत अनेक वेळां दांडगाई करावी लागत असल्यामुळें अंगांत साहसबुद्धि उत्पन्न होते. इतकेंच नव्हे, तर मानापमानास तुच्छ लेखून मरणहि पत्करण्याचें शिक्षण यांत आपोआप मिळतें. "

मदिरापानांत दाखविलेले पुढील गुण पहाः—

" दारूमुळें नानाप्रकारचे रोग हटतात. अहंकारादि चित्तवृत्ति व दुःखाच्या कांचण्या यांबद्दल बेफिकिरी उत्पन्न होते. कोणताहि अपराध केलेला असला तरी त्याची टोंचणी म्हणून लागत नाहीं ! कोणत्याहि माणसावर विश्वास ठेवण्याची उदारता अंगी बाणते ! "

अशा प्रकारचीं मतें विनोदासाठीं गडकऱ्यांच्या 'एकच प्याल्यां'त तळिरामाच्या तोंडीं घातलीं आहेत. नमुन्यासाठीं हीं दोनच स्थळें दाखवून दशकुमारचरिताचा निरोप घेण्यास हरकत नाहीं.

☆ ☆ ☆

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 35635 वि: निबंध
क्रमांक ........ नों दि 20-11-65
72305

# उपसंहार

आतांपर्यंत विनोदाच्या शोधार्थ संस्कृत वाङ्मयाच्या वैदिक उगमापासून तों त्याच्या सध्यांच्या चालू रूपापर्यंत फार मोठा प्रवास अल्पावकाशांत केला. त्यांत आर्षवाङ्मय, महाभारत, पञ्चमहाकाव्यें, नाटकें येथपासून तों ४०।५० श्लोकांच्या छोटेखानी गद्यपद्य प्रकरणांपर्यंत सर्व लहानमोठीं स्थळें धुंडाळलीं. वाङ्मयाचे शास्त्रीय व ललित असे दोन्हीहि प्रान्त पालथे घातले, व जेथें जेथें म्हणून विनोदी उद्गार पाझरतांना दिसले—मग ते धबधबे असोत कीं झुळवे असोत—तेथून त्यांस हेरून वाचकांना त्यांचें ओझरतें दर्शन घडविलें. या सर्व प्रवासाचा निष्कर्ष एकत्रितपणें पुढीलप्रमाणें आहे:—

१. ऋग्वेदसंहितेपासून तों भरतमुनीच्या नाट्यशास्त्रापर्यंतच्या काळांत झालेल्या वाङ्मयांत फारच त्रोटक पण अकृत्रिम विनोद आढळतो. तेथें तो आपल्या साहजिक स्वरूपांत असून ओघानें आला आहे. त्यांत स्वाभाविकता व जिवंतपणाची टवटवी आहे. त्यावर पांडित्याची कुरघोडी झालेली नाहीं.

२. मागेंपुढें व भोंवतालीं चांगल्या विनोदाची निर्मिति झाली व होत असून बहुतेक सर्व साहित्यशास्त्रकारांनीं मात्र विनोदास फारसा अभिलषणीय मान दिला नाहीं. नाट्यशास्त्रापासून तों रसगङ्गाधरापर्यंतच्या साहित्यदर्पणादि सर्व ग्रंथांमधून हास्याचा रस म्हणून उल्लेख आहे, पण त्याचें स्वरूप हीन, प्रपञ्च अपुरा व उदाहरणें एकदेशी दिलीं आहेत. सर्व नाटकांतील विदूषक किंवा शाकुन्तलांतील धीवर, मृच्छकटिकांतील दर्दूरक हीं विनोदी पात्रें त्यांस दिसलीं नाहींत. पात्रनिष्ठ व प्रसङ्ग-निष्ठ किंवा प्रकरणनिष्ठ विनोदाची त्यांना कल्पनाच आली नव्हती. इतकेंच नव्हे, तर हास्य हा स्वतंत्र रसहि नव्हे, त्याची उत्पत्ति केवळ शृंगारापासून आहे, असें भरतमुनीचें मत होतें. तें संस्कृत वाङ्मयांतील बऱ्याच मोठ्या विनोदाच्या भागाला लागू पडतें ही गोष्ट खरी असली तरी शृंगाराव्यतिरिक्त इतर विभावांपासून विनोदोत्पत्ति होत नाहीं हा जो त्यांतून ध्वनि निघतो तो बरोबर नाहीं हें आतांपर्यंत दाखविलेल्या कांहीं उदाहरणांवरूनच परस्पर सिद्ध होईल. ‘कलिविडम्बन,’

'कलाविलास,' 'माहीषतक,' 'चहागीता' यांतील विनोद काय शृंगाराश्रित आहे ?

पण संतोषाची गोष्ट ही कीं, साहित्यशास्त्राची संकुचित अटक कवि, नाटककार, विडम्बनकर्ते व उपरोधक यांनीं फारशी मानली नाहीं व निरनिराळ्या प्रकारचा उच्च विनोद उत्पन्न केला. पण त्यांत थोडी कृत्रिमता, बोजडपण, पांडित्य व संकेत हे आले तरी त्याचें क्षेत्र व घटक हे फार विस्तार पावले.

३. संस्कृतांतील विनोदाचा जवळजवळ तीन-चतुर्थांश भाग शृंगाराधिष्ठित आहे. संस्कृत वाङ्मयांत नाटकांतच त्यांतल्या त्यांत विनोद जास्त. तो विनोद बहुधा विदूषकनिष्ठ. हीं नाटकें प्रायः शृंगारप्रधान व विदूषक तर राजाचा शृंगारासचिव. त्यामुळें शृंगाराश्रित विनोदाचें आधिक्य ओघानेंच आलें.

संस्कृत हास्य-विनोदाचा दुसरा घटक धर्म. यांत ईश्वरविषयक भावना, आचार, संस्कार व तत्त्वज्ञान यांचा समावेष होतो. शिव, विष्णु, पार्वती, सरस्वती इत्यादि देवदेवतांच्यावर आदरपूर्वक विनोद, धर्मपंथ, आचार, तत्त्वज्ञान यांच्या खण्डनमण्डनानें झालेला विनोद, ब्राह्मण, कापालिक यांच्यावर उपरोधी टीका इत्यादि प्रकार यांत आलेले आहेत.

याच्या खालोखाल, कुरुपता, खादाडपणा, दम्भ, मत्सर, धूर्तता वगैरे मानवस्वभावाच्या नित्य व चिरंतन घटकांवर आधारलेला विनोद आहे.

४. इंग्रजीप्रमाणें संस्कृतांतहि सर्व प्रकारचा विनोद आहे. मात्र तो स्वतंत्र, धाराप्रवाही, सलग, केवळ विनोदासाठीं लिहिलेला असा प्रायः नाहीं. त्याचा उपयोग पात्रांत वाढलेल्या कोशिंबिरीप्रमाणें चव येण्यास मधूनमधून केला आहे. तरी कांहीं स्वतंत्र विनोदी प्रकरणें आहेतच. त्यांत स्वभावनिष्ठ, प्रसंगनिष्ठ, कल्पनानिष्ठ व शब्दनिष्ठ असे सर्व प्रकार आहेत. त्यांत कोटिबाजपणा ( Wit ) आहे व विनोद ( Humour ) आहे. त्यांत उपरोध, विडंबनें, टीकेसाठीं लिहिलेलीं लहानसहान विनोदी प्रकरणें ( Skits ) आहेत मर्मभेदक व मार्गदर्शक टीका आहे. मानवास दोषदर्शनानें सुधारावें हा उच्च हेतु संस्कृत विनोदाचा आहे. पण त्यांत केवळ कलेसाठीं किंवा आनंदनिर्मितीसाठीं विनोद नाहीं असेंहि नाहीं. "सूर्य चंद्र इतके दरिद्री कीं ते दोघांत मिळून एकच वस्त्र ( अम्बर ) वापरतात. एक दिवसां व दुसरा

रात्रीं. " या विनोदांत कसला हेतु व कुठला बोध ? नुसता आनंदच यांत आहे हें कोणीहि सांगेल.

संस्कृत विनोद प्रायः पंडितांच्या हातीं गेल्यानें त्यांत श्लेष हा फार मोठा घटक होऊन बसला. त्यामुळें संस्कृत विनोद कांहीं ठिकाणीं क्लिष्ट, कृत्रिम, बटबटीत व संकेतरूप झाला. विदूषकाचें एकच पात्र सगळ्यांनीं वापरल्यानें त्यांत ठराविकपणा फार आला. त्यामुळेंच कांहीं ठिकाणीं विनोदाला आचरटपणाचेंहि स्वरूप प्राप्त झालें आहे. तसेंच शृंगारिक विनोदांत ( नाटकांत व काव्यांतहि ) कांहीं ठिकाणीं ग्राम्यता व अश्लीलता हे दोष आले आहेत.

५. संस्कृत वाङ्मयाच्या अफाट विस्ताराशीं विनोदाच्या क्षेत्राची तुलना केल्यास त्याचें प्रमाण $\frac{१}{१००}$ हि भरणार नाहीं. आपल्या धर्मांत इंद्रियसंयम, सात्त्विकता, तत्त्वज्ञानप्रवणता व इतर भक्तिभावादि गोष्टींचा अतिरक असल्यानें आपल्या वाङ्मयावर विचाराची छाप जास्त पडली. इंद्रियप्रवृत्तीच्या खुल्या वापराला जागा असल्यावांचून व नसत्या ठिकाणीं चिंतनशीलता दाखविणें सोडल्यावांचून खरा विनोद उत्पन्न होणें नाहीं. त्यामुळें आपल्यामध्यें हंसणें हा अगदीं गुन्हा नसला तरी पोरकटपणा मानला जाऊं लागला. कारण विनोदाबद्दलची प्रवर्तकांची मूळ भूमिकाच शुद्ध ( healthy ) नव्हती. इतकें असूनहि वर दर्शविलेली विनोदनिर्मिति झाली हा सहज स्फूर्तीचा नियंत्रणावरील विजय होय !! तरीपण वरील गळचेपीमुळें विनोदाला इतर पाश्चात्य राष्ट्रांत जें एक खुलें, मोकळें, खेळकर, सहानुभूतीच्या वृत्तीनें सुखकर ( genial ) व दिलदार स्वरूप दिसतें तितकें संस्कृतांतील विनोदाला आलें नाहीं. पंडितांनीं पंडितासाठीं केला तो विनोद फार कठिण व कृत्रिम झाला; व अगदीं खालच्या दर्ज्याच्या लोकांसाठीं जो विनोद निर्माण केला गेला तो ग्राम्य झाला. पण याच्यामधलें जें रम्य, सहनशील, उदार असें विनोदाचें मोठें क्षेत्र तें संस्कृतांत फारसें आलेंच नाहीं. वास्तविक विनोदाचे विभाव इतर कोणत्याहि रसाच्या विभावांपेक्षां विपुल व हृद्य. व विनोदाचा आस्वादहि आबालवृद्धांस, स्त्रिपुरुषांस सर्व अवस्थांवर घ्यवयास सांपडतो. शृंगार व वात्सल्य हे केवळ तारुण्य व प्रौढपणा या अवस्थांवर अवलंबून आहेत तसें विनोदाचें नाहीं. यासाठीं त्याला खुलें क्षेत्र पाहिजे होतें. तें संस्कृतांत त्यास

मिळालें नाहीं. कारण वाङ्मयाच्या किल्ल्या ज्यांच्या हातांत ते गंभीरपणाचे चहाते! ते ज्या वाटा मोकळ्या ठेवतील त्याच द्वारांनीं विनोदास बाहेर पडावें लागलें. नाहींतर जो उठला त्यानें शिवपार्वतीवर विनोद करीत बसण्याचें कारण नव्हतें. घरोघरीं काय शिवपार्वत्या कमी आहेत? त्यांच्याहि व्यवहारांत विसंगती काय कमी भरल्या आहेत? पण वाणी खर्चावी ती देवासाठींच, हा नियम. म्हणून विनोदहि देवतांशींच करण्यांत आला.

राजकारण, समाजकारण, व्यक्तिविषयक टीका इत्यादि क्षेत्रांत इंग्रजी वाङ्यांतील विनोदी लेखकांनीं आपल्या लेखण्या चालविल्या; उदाहरणार्थ, शेक्स्पिअर, पोप, स्विफ्ट, वगैरे अनेक लेखक. तशी स्थिति संस्कृतांत नाहीं. कारण संस्कृत वाङ्मयाचा असल्या लौकिक बाबींशीं निकट संबंध फारसा आला नाहीं, व विनोदाचा तर त्याहून कमी आला. त्यामुळें धार्मिक बाब सोडल्यास संस्कृत विनोदाचा इतर कोणतीहि सुधारणा करण्यास उपयोग करून घेतलेला दिसत नाहीं. म्हणून कांहीं किरकोळ अपवाद सोडून दिल्यास संस्कृत विनोदाचा हेतु केवळ कलाविलास किंवा आनंद हाच प्राधान्येंकरून मानला पाहिजे.

प्रत्येक राष्ट्राच्या विनोदांत त्या त्या राष्ट्राच्या त्या काळच्या स्थायी वृत्तींचें स्पष्ट प्रतिबिम्ब पडलेलें असतें असें म्हणतात. याचें प्रत्यन्तर कोणास पाहावयाचें असल्यास, वर जें संस्कृत विनोदाचें—फार विस्तृत व सर्वंकष नसलें तरी पूर्णपणें प्रातिनिधिक-- स्वरूप दाखविलें आहे त्यावरून अभ्यासकांनीं त्यांत बिंबित झालेल्या आमच्या तत्कालीन वृत्तीविषयीं आपापलें मत बनवावें.

☆ ☆ ☆

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
क्रमांक ...३५९३८... दि: ...
... नों: दि: ...२८·१२·८३

# परिशिष्ट

## संस्कृत हास्य-विनोदाची उपपति

येथपर्यंत संस्कृतांतील हास्यविनोदाचें स्वरूप उदाहरणांनीं दाखविलें. आतां संस्कृत साहित्यशास्त्रकारांनीं या हास्यविनोदाची तात्त्विक चर्चा करून ज्या उपपत्ती मांडल्या आहेत त्यांचें स्वरूप दाखवितों.

हास्याची उपपत्ति लावणें म्हणजे माणूस कशाला किंवा कशानें, कां आणि कसा हसतो हें सांगणें होय. संस्कृतांत हास्याला नवरसांपैकीं एक रस मानण्यांत आलें आहे; आणि या हास्यरसाची मांडणी भरतमुनीनें पहिल्यांदा आपल्या नाट्यशास्त्रांत केली आहे. रसाची मांडणी करतांना त्या रसाचे विभाव, अनुभाव व व्यभिचारी भाव सांगावे लागतात; आणि या सामग्रीनें जागृत होणारा हंसणाऱ्या रसिकाचा स्थायीभावहि द्यावा लागतो. विभाव म्हणजे कारणें. म्हणजे नाटकांतील ज्या व्यक्ती किंवा जी परस्थिति पाहून ( किंवा काव्यादि ललित वाङ्मयांतील ज्या व्यक्तींचीं किंवा ज्या परिस्थितीचीं वर्णनें वाचून ) रसिकाला हसावयास येतें त्यांना किंवा तिला विभाव म्हणतात. यांतच रसिक कशाला किंवा कशानें हंसतो याचें उत्तर येतें.

भरतानें हास्याचे पुढील विभाव दिले आहेत. विकृत वेष अलंकारादि धारण करणें, धिटाई, लोभीपणा, कपट, खोटें बोलणें, मानसिक किंवा शारीरिक व्यंगें, इतर दोष दर्शन, विकृत आचार, विपरीत नांवें, विपरीत हावभाव, विकृत बोलणें इत्यादि इत्यादि. ( ना. शा. ६-५६-५९ ) या सर्व विभावांत एक गोष्ट समान आहे. ती म्हणजे व्यक्ती व परिस्थिति मुळांत देश काल-वय इत्यादींच्या बाबतींत जशी असावयास पाहिजे तशी नसणें. म्हणजेच तिच्यांत कांहीं विकृति किंवा विपरीतता असणें. जगाची जी मूळ प्रकृति ( the norm ) किंवा उचितता ती सोडून कांहीं निराळें, उपराटें किंवा

विपरीत असणें. यावरून विकृति किंवा अनुचितता हें भरताच्या मताप्रमाणें हास्याचें कारण ठरतें. वुइलियम् हॅझलिट्चेंहि मत असेंच आहे. तो म्हणतो मनुष्य प्राणीच हंसणारा प्राणी आहे. कारण माणसालाच जगाची मूळ प्रकृति किंवा उचितता ( the ought to be of things ) आणि तिच्यांत उत्पन्न झालेली विकृति किंवा अनुचितता ( the is of things ) यांतील फरक कळतो.

भरतानें ह्यांपुढें हास्याचे अनुभाव दिले आहेत. अनुभाव म्हणजे क्रोध, भय, आश्चर्य या सारखी एकादी उत्कट भावना मनांत आली असतां शरीरावर जीं चिन्हें किंवा जे विकार दिसतात ते Expressions of the emotion. हास्याची भावना उत्कटपणें मनांत आली कीं तिचा आविष्कार भरत मताप्रमाणें पुढील गोष्टींनीं होतो:—

ओंठ, नाक, गाल थरथरूं किंवा स्पंदूं लागणें, डोळे आकुंचन पावणें किंवा विस्तारणें, घाम येणें, तोंड तांबडें होणें, पोट किंवा बरगड्या फार हालणें व त्यामुळें त्या धरावयास लागणें, नाका तोंडांतून कांहीं आवाज ( ही ही असा ) निघणें इत्यादि इत्यादि. यांत भरतानें माणूस कसा हसतो म्हणजे हंसतांना त्याची शारीरिक हालचाल काय होतें याचें थोडक्यांत वर्णन केलें आहे. मॅगडुगल सारखे मानसशास्त्रज्ञ हीच प्रक्रिया अधिक तपशिलानें देतात. त्या पैकीं डोळे चकाकणें, डोळ्यांतून पाणी येणें, व उल्हसित होणें वगैरेचीं भर वरील यादींत घालावी.

हास्याची भावना मनांत उदित झाली असतां तिचा परिपोष करण्यासाठीं ज्या दुय्यम, अस्थिर आणि तात्पुरत्या भावना येतात आणि जातात त्यांना व्यभिचारी किंवा संचारी भावना म्हणतात. असे व्यभिचारी भाव हास्याच्या बाबतींत भरत पुढील देतो– चेहेऱ्यावर दिसणारे विकार दडविणें (अवहित्थ), असूया, आळस, निद्रा, स्वप्न, जागे होणें इत्यादि. विनोदी नटाच्या निरनिराळ्या अभिनयांशीं ज्या शारीरिक वा मानसिक गोष्टी संबद्ध असतात त्या भरतानें व्यभिचारी भावांत येथें दिलेल्या दिसतात.

हंसणाऱ्या रसिकाचा स्थायी भाव भरतानें 'हास' हा दिला आहे. हास्यरसांत रसिकांचाच हास हा स्थायी भाव असतो. काव्यगत किंवा नाटक-

गत पात्रांचा तो असेलच असें नाहीं. कारण काव्यगत विनोदी पात्र रडत असेल, रागावत असेल, भ्यालेलें असेल, शृंगारी बनलें असेल, सारांश, दुसऱ्या कोणत्याहि भावनेचा अनुभव घेत असेल. पण आपण रसिक मात्र त्या परिस्थितींतील त्या पात्राचा तो तो भावनानुभव पाहून हंसत असतो. याचें कारण असें कीं मूळ नाटककार किंवा कवि यानें ती व्यक्ति अशा परिस्थितींत खुबीनें वर्णिलेली असते कीं तें वर्णन वाचून आपल्यास हसूं येतें. म्हणजे कवि व रसिक यांच्या भावना सारख्या. पात्रांच्या याच भावना असतील असा नियम नाहीं. 'हास' म्हणजे काय याची फोड संस्कृत साहित्य शास्त्रकारांनीं केलेली नाहीं. तथापि इतर स्थायी भावांच्या रूपावरून असें वाटतें कीं, जिच्यामुळें विकृत दर्शनानें माणसास हंसावयास येतें अशी माणसाची मूलभूत व सहजात भावना म्हणजे हास. मॅगडुगल यानें Laughter ही एक सहज प्रवृत्ति मानलेली आहे.

आणि या सहज प्रवृत्तीच्या सहचर भावनेला तो 'Amusement' 'Merriment' किंवा 'Gaiety' म्हणतो. हिला संस्कृतात (व मराठींतहि) विनोद किंवा विनोदन भावना म्हणावें. 'हास' या संज्ञेपेक्षां हें नामकरण अधिक अर्थबोधक आहे. कारण हास किंवा हास्य यावरून हंसण्याच्या बाह्य आणि शारीरिक क्रियेचा (म्हणजे अनुभवाचा) बोध होतो. अंतर्गत भावनेचा होत नाहीं. या भावनेची फोड पुढील विवेचनाच्या वेळीं येईल. हास ही एक सहज प्रवृत्तीच असल्यानें तिच्या प्रेरणेवरूनच माणूस हंसतो हें माणूस कां हसतो याचें उत्तर आहे.

भरत म्हणतो कीं हास्यरस हा विशेषतः स्त्रिया आणि नीच प्रकृतीचे लोक यांमध्येंच दिसून येतो. पुरुष व उच्च पातळीवरचे लोक या रसाचा आस्वाद घेणें कमीपणाचें मानतात. असेंच हास्याबद्दलचें मत प्लेटो, अरिस्टॉटल्, सिसरो आणि क्विंटिलियन् यांचें आहे- प्लेटो म्हणतो 'दुष्टबुद्धि आणि असूया हीं हास्यविनोदांच्या बुडाशीं असतात.' अरिस्टॉटल्चें मत असें कीं 'मनुष्याची थट्टा करणें म्हणजे त्याच्यावर दुष्ट बुद्धीचा किंवा हीनतेचा आरोप करणेंच होय.' हावरेपणा, खोटेपणा, दोषदर्शन इत्यादी जे हास्याचे विभाव

भरतानें दिले आहेत त्या सारखींच हास्याचीं कारणें सिसरो आणि क्विंटिलियन् देतात. या सर्वांचा अर्थ असा कीं, वरील हास्य मीमांसकांच्या काळीं विनोदाला आजचें खेळकर, सहनशील, संयमी आणि कलात्मक स्वरूप आलेलें नव्हतें.

भरत हास्याचे प्रकार दोन मानतो :–( १ ) आत्मस्थ, ( २ ) परस्थ जेव्हां विभावांच्या प्रत्यक्ष दर्शनानें हसें येतें तेव्हा आत्मस्थ हास्यप्रकार; आणि जेव्हा विभावांचें ज्ञान किंवा दर्शन एखाद्यास झालेलें नसतें, केवळ दुसरे हंसतात, म्हणूनच त्याला हंसें येतें तेव्हा तो परस्थ हास्य प्रकार समजावा. तसेंच विभावांचें ज्ञान झालें तरी गंभीरतेमुळें किंवा आपल्या पोक्तपणाला किंवा भारदस्तपणाला बाध येईल म्हणून एकादा माणूस हंसत नाहीं, पण दुसरे हंसू लागले म्हणजे मात्र हंसतो. हा प्रकारहि परस्थ हास्याचाच मानावा असें अभिनवगुप्त म्हणतो. आपल्याच ठिकाणच्या विभावांनीं आपण आपल्याला हंसणें ( आपल्याच विसरभोळेपणाला, भित्रटपणाला वगैरे ) हा आत्मस्थ प्रकार व इतरांच्या विभावांना हंसणें म्हणजे परस्थ हास्य-प्रकार असा कोणी अर्थ करतात. पण तो अभिनव गुप्ताला मान्य नाहीं. तो म्हणतो हे हास्याचे प्रकार न होतां विभावांचे प्रकार आहेत. आपण आपल्याच हंसणें हा एक आत्मस्थ हास्यप्रकार म्हणून अभिनवगुप्ताला मान्य नसला तरी तें उच्च दर्ज्याचें सुसंस्कृत हास्य आहे. कारण यांत माणूस स्वतांची अहंकारबुद्धि आणि दुसऱ्या विषयींची तिरस्कारबुद्धि टाकून देऊन नीट आत्मपरीक्षण करतो, स्वतःचे दोष पहातो आणि दोषाच्या जाणिवेनें दुःखी न होतां ते सुसह्य करण्यासाठीं खेळकरपणानें हंसतो. या प्रकाराला मॅगडुगल खरा विनोद म्हणतो.

भरतानें उत्तम सुसंस्कृत आणि सभ्य माणसापासून तों अधम असंस्कृत माणसापर्यंत हास्याचे सहा प्रकार कल्पिले आहेत. ते असे—स्मित, हसित, विहसित, उपहसित, अपहसित आणि अतिहसित. त्यांपैकीं पहिले दोन श्रेष्ठ लोकांत, दुसरे दोन मध्यम लोकांत आणि शेवटचे दोन कनिष्ठ लोकांत आढळून येतात असें त्याचें म्हणणें आहे. ( ना. शा. ६. ६०-६९ )

ज्यामध्यें गाल किंचित् विकसलेले दिसतात, कटाक्ष सुंदर दिसतात. ज्यांत दांत दिसत नाहींत व जे संयमित असतें त्याला स्मित म्हणतात. या

प्रमाणें भरतानें सहाहि हास्यप्रकारांचीं लक्षणें दिलीं आहेत. त्यावरून हास्याचे अनुभाव–म्हणजे माणूस हसतांना त्याच्या चेहऱ्यावर व अवयवांत काय काय बद्दल होतात ते–देतांना भरतानें कमालीची सूक्ष्म दृष्टि आणि समाजाचे सूक्ष्म निरीक्षणें दाखविलें आहे हें सहज स्पष्ट होईल. आजच्या एकाद्या सराईत मानसशास्त्रज्ञाला सुद्धा वर्णनाच्या येवढा बारकावा दाखवतां येईल कीं नाहीं तें सांगतां येत नाहीं.

भारतानें नाट्यांत आठ रस मानले आहेत. त्यांपैकीं पहिल्या चारांपासून इतर चार रस निघाले असें त्याचें म्हणणें आहे. शृंगार, रौद्र, वीर आणि बीभत्स या चार मूळ उत्पादक रसांपासून अनुक्रमें हास्य, करुण, अद्‌भुत आणि भयानक हे उत्पाद्य चार रस निघाले. ( ना. शा. ६-४३-४६ ) शृंगारांतून हास्य, रौद्रापासून करुण, वीरापासून अद्‌भुत, आणि बीभत्सांतून भयानक रस निघाला. याचा अर्थ असा दिसतो कीं, शृंगारादि पहिल्या चार रसांचा परिपोष झाला कीं त्याच विभावांपासून हास्यादि पुढचे चार रस निर्माण होतात. पण मग शंका अशी येते कीं पहिल्या चार रसांच्या परिपोषा-खेरीज दुसरे विभावच पुढल्या चार रसांना नाहींत काय ? आणि तसे ते नसतील तर ते निराळे रस म्हणून तरी कां देण्यांत आले आहेत ?

हास्य हे क्वचित् शृंगारांतून निघतहि असेल. पण नेहमींच तें शृंगारां-तून निघेल असें नाहीं. ढेरपोट्या, वक्रदंत, तिरळा, विसरभोळा, खादाड अशा कोणत्याहि माणसाच्या दर्शनानें आणि उक्तीनें हास्य निर्माण होतेंच. पण तें शृंगारजन्य खासच नव्हे. तसेंच वीराच्या अचाट पराक्रमदर्शनानें विस्मय वाटून अद्‌भुतरस निर्माण होईल हें खरें, पण तेवढ्यानेंच तो होतो असें नव्हे. कारण, विमानदर्शन, जादूटोणा, अचानक द्रव्यलाभ किंवा प्रिय माणसाची भेट यांसारख्या कारणांनीं तो अद्‌भुत रस उत्पन्न होतो. तेथें वीररस परिपोषाचा संबंध असतोच असें नाहीं. तीच गोष्ट इतर रसाच्या उत्पादक–उत्पाद्यभावाबद्दल समजावी. या प्रमाणें भरतानें कोणत्या अभिप्रायानें रसांत हा जन्यजनक भाव कल्पिला आहे हें नीट समजत नाहीं. खुद्द भरतानेंच हास्य, करुण, अद्‌भुत आणि भयानक या उत्पाद्य रसाचे निराळे विभाव दिले आहेत. त्यावरून ही विसंगति त्याच्या ध्यानांत

आली नसेल असें नव्हे. पण या कोड्याचें उत्तर तूर्त सांपडत नाहीं म्हणून तें सोडून देऊं. पहिल्या चार उत्पादक रसांच्या परिपोषजन्य विभावांनींहि पुढील चार उत्पाद्य चार रस निर्माण होतात. असा त्यांचा संबंध भरतानें आपल्या नजरेस आणला येवढेंच समजावें.

पण सुदैवानें हास्यरसाच्या निर्मितीबाबत भरतानें जो खुलासा केला आहे त्यांतून हास्यरसाबाबत एक उपपत्ति सूचित होते. आणि ती सूचना घेऊन भरताचा टीकाकार अभिनवगुप्त यानें एक नवी उपपत्ति बसविली आहे. तिचाच आतां विचार करूं.

भरतानें म्हटलें आहे कीं, 'जें शृंगाराचें अनुकरण तो हास्यरस' ( शृङ्गारानुकृतिर्या तु स हास्य इति संज्ञितः ॥ ना. शा. ६.४५ ) या कल्पनेचा शाब्दार्थ घेऊन एकदोघांनीं जी हास्याची उपपत्ति दिली आहे ती प्रथम देऊन नंतर अभिनव गुप्ताची उपपत्ति पाहूं.

शारदा तनय म्हणतो 'त्रिपुरदाह' नाटकांत सर्व रस आहेत. जटा व अजिन धारण करणारा, सर्पाचीं भूषणें घालणारा, तीन डोळ्यांचा, विचित्र वेशधारी शंकर पार्वती सारख्या सुंदर व सुकुमार वधूशीं प्रेमलीला करूं लागतो हें पाहून तिच्या सख्यांची हासतां हासतां पुरे वाट झाली. अशा तऱ्हेनें शंकरपार्वतीच्या शृंगारांतून हास्याची उत्पत्ति झाली असें सांगितलें आहे. ( तदा सखीनां देव्याश्च हासः समुदभून्महान् । तस्माद् हास्यसमुत्पत्तिः शृंगारादिति कथ्यते । भा. प्र. ३ पृ. ५७ ) येथील विभावांतल्या विपरीततेमुळें किंवा विसंगतीमुळें हास्य उत्पन्न झालें आहे. पण हें असलें हास्य कोणत्याहि रसाच्या विसंगत विभावांनीं होईल. त्याला शृंगाराचेच विभाव काय करावयाचे ?

शारदा तनय दुसरी एक उपपत्ति देतो. 'योगमाला संहिते'च्या आधारें तो म्हणतो 'जेव्हां अहंकार आपली अभिमानवृत्ति आणि इंद्रियें यांच्या द्वारां बाह्य विषयाशीं संबद्ध होतो तेव्हां तो रसरूप पावतो व त्याच्या सत्त्व, रज व तम या गुणांमुळें शृंगार, वीर, करुण इत्यादि रसप्रकार संभवतात. मनाला अनुकूल अशा पदार्थांबद्दल सुखकारक संवेदना निर्माण करणारी इच्छा ती रति. ती दोन प्रकारची. एक रति व दुसरी प्रीति. ( मनोऽनुकूलेष्वर्थेषु सुखसंवेदनात्मिका । इच्छा रतिः सा द्विधा स्यात् रति प्रीतिविभागतः । द्वितीय

अधिकार, पृ. ३४ ) त्यांपैकीं प्रीतिरूप असा जो चित्ताचा विकास तोच हास होय ( प्रीतेर्विशेषश्चित्तस्य विकासो हास्य उच्यते । भा. प्र. २–२१ ) ' योगमाला संहिते'च्या कर्त्याचेंहि मत हास्याचा उगम शृंगारापासून आहे असेंच होतें. शृंगाराचे विभाव ललित असतात. याच ललित विभावांचे आभास दाखविले जाऊन त्यांपासून स्थायी भाव परिपुष्ट झाला की रसिकाच्या मनाला रज आणि तम यांचा स्पर्श होतो. अशा अवस्थेंत निर्माण होणारा जो रस तो हास्यरस हें भरतमताचें समर्थन अधिक सोदपत्तिक असलें तरी पूर्ण समधानकारक नाहीं. हास्यांत प्रीति ( आनंद ) आहे ही गोष्ट खरी. पण प्रीति उत्पन्न करणारीं कारणें हास्याप्रमाणें इतर रसांतहि आहेत. रति, भक्ति, वात्सल्य, राग आणि विस्मय हे प्रीतीचे विभाव होऊं शकतील. विसंगतिदर्शनानें किंवा अनौचित्यानें उत्पन्न होणारी प्रीति हास्याची दर्शक आहे अशी मुरड घातली तरच ही उपपत्ति विचारार्ह होईल. आतां अभिनव गुप्ताची उपपत्ति पहावयाची.

शृंगाराचें अनुकरण म्हणजे हास्य ( शृङ्गारानुकृतिर्या तु स हास्य इति संज्ञितः । ना. शा. ६-४५ ) या भरताच्या वचनावर व्याख्यान करतांना अभिनवगुप्त म्हणतो ' शृंगारांतून हास्यरस निघतो हें भरताचें म्हणणें शृंगाराभास ( म्हणजे अनुचित शृंगार ) असेल त्यावेळीं किंवा शृंगाराचें जेथें वर वर बाह्य अनुकरण असेल त्या वेळीं खरें आहे. याच प्रकारें आभासानें किंवा बाह्य अनुकरणानें इतरहि रसांतून हास्य निर्माण होतें ही गोष्ट भरतानें शृंगाराच्या उदाहरणानें सूचित केली आहे. ( तदाभासत्वेन तदनुकाररूपतया हेतुत्वं शृंगारेण सूचितम् । ) विभाव, अनुभाव आणि व्यभिचारी भाव यांच्या आभासाच्या योगानें शृंगाराच्या रति या स्थायी भावाचा आभास प्रतीत झाला कीं त्यापासून शृंगाराभास निर्माण होतो. ( यतो विभावाभासात्, अनुभावाभासात्, व्यभिचार्याभासात् रत्याभासे प्रतीते चर्वणाभाससारः शृंगाराभासः । ) शृंगाराभासांत औचित्यपूर्ण रति स्थायिभावाचा परिपोष न होतां ती रति केवळ एकाची कोणाची तरी नुसती अभिलाषा असते. म्हणजे प्रेम चालू असतां स्त्री किंवा पुरुष यांपैकीं कोणी तरी एक दुसऱ्याची केवळ अभिलाषा करतो पण या प्रेमाला आपण पात्र आहों किंवा नाहीं याचा मुळींच विचार करीत नाहीं.

रतिभावनेची उचितता प्रेमांतील व्यक्ती–वय, रूप, दर्जा, कुल, जात आणि परस्परानुरक्ति इत्यादी दृष्टींनीं–एकमेकांवर प्रेम करण्यास पात्र असण्यावर अवलंबून असते. तसें नसेल तर हें अनुचित प्रेमप्रकरण व्यक्तिपरत्वें संतापजनक, बीभत्स आणि घृणास्पद तरीं होतें किंवा हास्यांत तरी पर्यवसान पावतें. उदाहरणार्थ रावण सीतेच्या विरहदुःखानें आपण पोळलों आहों. ' तिची माझी भेट केव्हां होणार ? वगैरे उद्गार कामपीडित होऊन जर काढूं लागला तर हा शृंगाररस न होतां शृंगाराभास होईल. कारण रतिभावनेच्या औचित्याचीं जीं गमकें वर दिलीं त्यांपैकीं एकहि येथें नाहीं. म्हणून हा रसाभास संताप, घृणा, तिरस्कार, जुगुप्सा अशां सारख्या गंभीर भावनेंत पर्यवसान पावतो. पण हें प्रकरण जर सौम्य स्वरूपाच्या अनौचित्याचें असेल ( इंदु बिंदु आणि कामण्णा किंवा भद्रायु भाडघर आणि त्रुपरी या प्रेमिकांच्या जातीचें असेल ) तर तेथें हास्यरस निर्माण होईल. रसाभासांतून गंभीर भावना केव्हां उत्पन्न होतात आणि हास्यरस केव्हां उत्पन्न होतो हें त्या त्या प्रकरणाच्या संदर्भात मार्मिक रसिकांनीं ओळखावयाचें असतें असें अभिनव गुप्तानें सांगितलें आहे. ( रावण वाक्ये रत्याभासतैव न तु हासः स्फुरति । )

इतकें विवेचन करून अभिनव गुप्त हास्यरसाची पुढील व्यापक उपपत्ति सारांश रूपानें देतो. तो म्हणतो, ' भरतानें शृंगाराभासांतून हास्यरस निर्माण होत असल्याचें एक विशिष्ट उदाहरण म्हणूनच दिलें आहे. असें समजावें· वास्तविक हा नियम सार्वत्रिक आहे. म्हणजे कोणत्याहि रसांच्या आभासांतून हास्यरस निर्माण होऊं शकतो. करुण, वीर, भयानक इत्यादी सर्व रसांच्या आभासांतून हास्यरस निर्माण होईल. कारण हास्याचे विभाव अनौचित्य प्रवृत्तीनेंच बनलेले असतात. अनौचित्य हें सर्व रसांच्या विभावानुभाव व्यभिचारिभावांत संभवतें. म्हणून सर्वरस, अनौचित्यामुळें, हास्यरसांत अन्तर्भूत होतात म्हणजे पर्यवसान पावतात. ( एवं तदाभासतया प्रकारः शृङ्गारेण सूचितः । तेन करुणाद्याभासेष्वपि हास्यत्वं सर्वेषु मन्तव्यम् । अनौचित्यप्रवृत्तिकृतमेव हि हास्यविभावत्वं, तच्च अनौचित्यं सर्वरसानां विभावानुभावादौ सम्भाव्यते । एवं यो यस्य न बन्धुः तच्छोके करुणोऽपि हास्य एव इति सर्वत्र योज्यम् । पृ. २९७ । एतेन सर्वे रसा हास्ये अन्तर्भूता

इति दर्शितम्। पृ. ३१४)

ही अभिनव गुप्ताची उपपत्ति अधिक स्पष्ट करण्यास आतां कांहीं उदाहरणें देतों. शृंगाररसांत नायकनायिकेंची परस्परानुरक्ति व तीं एकमेकांस योग्य असणें, हें औचित्य आहे. तें कोणत्याही कारणानें बिघडलें तरी तेथें हास्यरस निर्माण होतो. भवभूतीच्या मालतीमाधवांत असाच एक विनोदी प्रसंग आहे. राजाची इच्छा मालतीचा नन्दनाशी विवाह व्हावा. तिनें माधवाशीं लग्न करूं नये अशी त्याची इच्छा. हा राजाचा बेत म्हणून पाडण्यासाठीं माधवाचा मित्र मकरन्द यानें मालतीचा वेष घेतला. व तो नन्दनाच्यापुढें त्याची नवी नवरी म्हणून उभा राहिला. येथें उत्पन्न होणारें हास्य शृंगाररसाच्या विभावांतील अनौचित्यामुळेच होते. मालतीच्या वेषांत मकरन्द नन्दनाशी लग्न लावावयास जात असतां एऱ्ही गंभीर असणारी कामन्दकी त्याला उद्देशून म्हणते, " वा! मालती तर फक्कड सजली ! राजशेखरच्या विद्धशालभंजिकेतहि अशाच तऱ्हेचा शृंगाराधिष्ठित विनोद आहे. तों मागें दिलाच आहे.

पराक्रमाला अवश्य असें शौर्य अंगीं असणें व शूराशीं लढावयास योग्य असा त्याचा प्रतिस्पर्धी असणें हें वीररसाचें औचित्य. तसें नसेल तर वीर रसाच्या अनुचित विभावांतून हास्यरस निर्माण होतो. खाडिलकरांच्या ' मानापमान ' नाटकांतील ' लक्ष्मीधर ' किंवा संस्कृतांत रूढ असलेला ' गेहेशूर ' हीं याचीं उत्तम उदाहरणें आहेत. क्षुद्र वस्तूचे ठिकाणीं अनुचित वीर रसाची भावना उययोजिली असतां होणाऱ्या वीर रसाचे हास्यपर्वसायी उदाहरण पुढील सुभाषित आहे–

' एक खादाड भटजी ( भट्ट ) आपण खऱ्या योद्धायापेक्षां ( भट ) कसें अधिक शूर आहोंत हें पुढील प्रमाणें सांगतो. तो म्हणतो, " घृताचे समुद्र शोषून घेण्यांत आम्ही अगस्त्यासारखे आहोंत. वड्यांचा पर्वत फोडून टाकण्यामध्यें आमची शक्ति वज्राप्रमाणेंच आहे. भाज्यांचें रान फडशा पाडण्यांत आम्ही प्रत्यक्ष अग्नीच आहोत. त्यामुळें आम्ही काय ते खरे भट्ट आणि तुम्ही ज्यांना भट म्हणतां ते साधे एक टकारयुक्त भट आहेत "––

तें सुभाषित असें—

"**अगस्त्यतुल्याश्च घृताब्धिशोषणे, दंभोलितुल्या वटिकाद्रिभेदने ।
शाकावलीकाननवन्हिरूपाः त एव भट्टा इतरे भट्टाश्च ॥**"

मृताबद्दल किंवा वियुक्ताबद्दल प्रेम असणें व त्या प्रेमामुळेंच प्रिय माणसाचा विरह दुःसह होणें ही शोकरसाची उचितता. ती जेथें नसते तेथें दुःखाचे सोंग करण्याची वेळ येते. तेव्हां करुणांतून हास्यरस उत्पन्न होतो. 'सासू मेली रडे सून डोळे धूरावर धरून', हा तुकोबांचा अभंग ह्या हास्यरसाचा उत्तम मासला आहे. मालविकाग्निमित्राच्या चौथ्या अंकांत तेथील विदूषक मालविकेची सुटका करण्यासाठीं व त्याला आवश्यक असणारी धारिणी राणीची आंगठी मिळविण्यासाठीं आपल्यास साप चावला आहे व आपण आतां मरणार आहोंत असा बहाणा करतो. हा विदूषकाचा कट ज्या राणीसारख्या व्यक्तींना माहीत नाहीं त्यांना येथें भयानक किंवा करुण रसाची प्रतीति येते. पण राजाला तो सर्व प्रकार पाहून हांसेंच कोसळतें. याचप्रमाणें इतर रसांतील हास्यकारक अनौचित्य दाखवितां येईल. साध्या टेकडीला हिमालय मानून आश्चर्यचकित होणें किंवा डबक्याला महासागर समजून विस्मयस्तिमित होणें ही अद्‌भुत रसांतून हास्य रस उत्पन्न झाल्याचीं उदाहरणें आहेत.

वरून तरी ही उपपत्ति इंग्रजीतील Parody सारखीं म्हणजे विडम्बन काव्यासारखी दिसते. उत्कट व उच्च भावनांमध्यें अनुचितता आणून त्याचें हास्यांत पर्यवसान करणें एवढ्या पुरतें या दोहोंत साम्य आहे. पण हें हास्याचें पर्यवसान प्रसिद्ध कवीच्या प्रसिद्ध व उत्कट भावनांच्या काव्याचे तेच शब्द व तेंच वृत्त वापरून विकृतानुकरण करणें हा प्रकार अभिनवगुप्तास माहित किंवा मान्य होता असें दिसत नाहीं. अत्र्यांच्या 'झेंडूच्या फूलांतील' विडम्बनें हे इंग्रजीतील Parady चें उत्तम उदाहरण होय. विकृतानुकरण हा यांतील भाग सोडला तर Parody चें खरें रहस्य अभिनव गुप्तानें सांगितलेलेंच आहे.

आतां अभिनवगुप्ताची ही हास्याची उपपत्ति पुरेशी व्यापक आहे कीं नाहीं तें पाहूं. अभिनवगुप्ताच्या मताप्रमाणें सर्व रस हास्यांत अंतर्भूत होतात. म्हणजे जेथें भावनेची उत्कटता आहे अशाच ठिकाणीं हास्य उत्पन्न होतें

असा त्याच्या म्हणण्याचा अर्थ दिसतो. पण काव्यांत सर्वच ठिकाणीं सारखा उत्कट रस नसतो. उदाहरणार्थ शब्दनिष्ठ विनोदांत रसाचा आढळ होत नसून हांसें मात्र येतें. एकदा एका जेवणाच्या पंक्तींत एक गृहस्थ बराच वेळपर्यंत श्लोक म्हणत होते. त्यावेळीं गडकऱ्यांनीं विचारलें, " अहो, या गृहस्थाच्या श्लोकाला किती चरण आहेत ते तरी विचारा." त्यावर कोल्हटकर म्हणाले, " त्यापेक्षां त्याला स्वतःलाच किती चरण आहेत त्याची चौकशी करा." येथील शब्दनिष्ठ विनोद शब्दश्लेषावर आधारलेला आहे व येथें उत्कटरसाचा स्पर्शहि नाहीं. तसेंच सूर्य व चंद्र किती दरिद्री आहेत पहा. ते दिवस व रात्र असा विभाग करून एकच अम्बर ( वस्त्र ) दोघांत मिळून वापरतात. त्याचप्रमाणें कल्पनानिष्ठ विनोदहि रसावांचून असू शकतो. उदाहरणार्थ मृच्छकटिकांतील विदूषक मैत्रेय वसंतसेनेच्या गलेलठ्ठ व जाडजूड आईला पाहून म्हणतो, " अहो, या डाकिणीच्या पोटाचा काय हा विस्तार. हिच्या ह्या विशाल देहाकडे पाहिलें म्हणजे मला असें वाटतें कीं, जशी एखादी महादेवाची प्रचण्ड मूर्ति प्रथम स्थापन करून नंतर तिच्यावर देऊळ किंवा त्या देवळांचे दार तरी बांधतात त्याप्रमाणें हिला प्रथम आंत बसवून मग हें घर बांधलें आहे कीं काय, अशी शंका येते.'

तसेंच प्रसंगनिष्ठ विनोदालाहि अभिनवगुप्ताची उपपत्ति लागू पडणार नाहीं. तथापि रसस्थलांतील अनौचित्यापुरती तरी अभिनवगुप्ताची उपपत्ति पूर्णपणें लागू पडते. अभिनवगुप्ताची उपपत्ति किंचित् अपुरी पडली तरी त्यांत त्याला कमीपणा नाहीं. हास्यांत जेथें अभिनवगुप्ताला अनुचितता दिसते तेथे शोपेनहोअरला अपेक्षाभंग दिसतो. म्हणून रसाचा उल्लेख न करतां अनुचितता ही हास्याची जनक आहे असें म्हटलें तर अभिनवगुप्ताची उपपत्ति व्यापक होईल असें वाटतें.

आपण नेहमीं हास्यरसाच्या उपपत्तिसाठीं हॅझलिट्, मॅक्स इस्टमन्, बर्गसॉ, हॉब्ज्, प्रो. जेम्स सली, इत्यादी पाश्चात्य टीकाकारांचा उल्लेख करतों. पण आपल्या देशांतहि हास्याची उपपत्ति पूर्वी कुणीतरी बसविली आहे याची आपल्याला दखल नसते. त्यांच्या उपपत्तींच्या शेजारीं मानानें बसवितां येईल अशी ही अभिनवगुप्ताची उपपत्ति आहे. आणि या उपपत्तीचें वैशिष्ट्य असें आहे कीं, ती वाङ्मयाच्या म्हणजे रसाच्या परिभाषेंतच मांडली आहे.

पाश्चात्य देशांतील विद्वानांनीं सर्व सामान्य हास्याची उपपत्ति लाविली आहे तर अभिनवगुप्ताची उपपत्ति वाङ्मयांतीलच आहे. अभिनवगुप्ताचार्य हा प्रसिद्ध रसिकाग्रणी काश्मिरांत इ. स. च्या १० व्या शतकांत होऊन गेला. त्यानें भरतमुनीच्या नाट्यशास्त्रावर 'अभिनवभारती' नांवाची टीका लिहिली आहे. तिच्यामध्यें भरतांच्या श्लोकावर टीका करतां करतां त्यानें ही उपपत्ति लाविली आहे. आपलीं मतें स्वतंत्र व मूळ ग्रंथकाराहून अधिक ग्राह्य असलीं तरी त्यांच्याबद्दल तसा अभिनिवेश न धरतां पूर्वाचार्यांच्या मतांतूनच तीं निघतात असें दाखविण्याची आमच्या टीकाकारांची एक शालीन पद्धत आहे. तिला अनुसरूनच अभिनवगुप्तानेंहि आपल्या उपपत्तीच्या नवीनपणाचा गाजावाजा न करतां जशी काहीं ती भरतालाच सुचली होती अशा नम्र भूमिकेनें त्यानें दिली आहे हें तिचें वैशिष्ट्य होय.

☆ ☆ ☆

REFBK-0012305

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 35834 वि: निबंध
क्रमांक ........ नों: दि: 20-11-63

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
92304